सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
४० वा वर्धापन दिन
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शनिवार, ३ ऑगस्ट २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३८ वे अंक २७४ | पाने १२+८ | किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
४० वा वर्धापन दिन
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शनिवार, ३ ऑगस्ट २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३८ वे अंक २७४ |
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## महत्त्वाचे

### विक्रमी ७.२८ कोटी लोकांनी भरले आयकर विवरण

**नवी दिल्ली :** आयकर विवरण भरणाऱ्यांनी यावेळी नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. ३१ जुलै रोजी संपलेल्या मुदतीपर्यंत ७.२८ कोटी लोकांनी त्यांचे आयकर विवरण सादर केले आहे, अशी माहिती आयकर विभागाने शुक्रवारी दिली. मागील वर्षी याच कालावधीत ६.७७ कोटी लोकांनी त्यांचे आयकर विवरण जमा केले होते. यावर्षी मात्र त्यात प्रचंड वाढ झाली आहे. या ७.२८ कोटी लोकांपैकी ५.२७ कोटी लोकांनी नव्या आयकर व्यवस्थेनुसार आणि उर्वरित २.०१ कोटी लोकांनी नव्या आयकर व्यवस्थेनुसार त्यांचे विवरण दाखल केले आहे. विवरण भरण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजे ३१ जुलै रोजी ६९.९२ लाख लोकांनी त्यांचे आयकर विवरण सादर केले आहे. प्रथमच आयकर विवरण भरणाऱ्यांची संख्या ५८.५७ लाख इतकी होती.

### निर्देशांक, निफ्टीत मोठी घसरण

**मुंबई :** जागतिक बाजारांतील कमकुवत संकेतांमुळे देशांतर्गत बाजारातील आठवड्याचा शेवट मोठ्या घसरणीने झाला.



राष्ट्रीय बाजारातील निफ्टी २५ हजाराखांली तर निर्देशांक ८१ हजारांखाली येऊन बंद झाले. आयटी आणि वाहन क्षेत्रातील शेअर्समध्ये विक्रीचा सपाटा लावल्याने ही मोठी घसरण झाली. मुंबई बाजारातील निर्देशांक ८८६ अंकांनी खाली तर ८०,९८२ वर बंद झाला. तसेच राष्ट्रीय बाजाराचा निफ्टी ३११ अंकांच्या घसरणीसह २४,६९९ वर बंद झाला. मुंबई बाजारातील ३० पैकी केवळ पाच शेअर्स तेजीत होते. यातही एचडीएफसी बँकेच्या शेअर्समध्ये सर्वाधिक १.१० टक्क्यांनी वाढ झाली. यानंतर सन फार्मा, नेस्ले इंडिया, एशियन पेण्ट्स आणि कोटक महिंद्रा बँकेचे शेअर्स सर्वाधिक वाढले. मुंबई बाजारातील घसरणीमुळे भांडवल ४५७.०६ लाख कोटी रुपयांवर घसरले. यापूर्वी १ ऑगस्टला ते ४६१.६२ लाख कोटी रुपये होते. म्हणजेच बीएसईमध्ये कंपन्यांचे बाजार भांडवल सुमारे ४.५६ लाख कोटी रुपयांनी कमी झाले आहे.

### केंद्रीय कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता वाढणार?

**नवी दिल्ली :** केंद्रीय कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता वाढणार असल्याचे वृत्त आहे. लेबर ब्युरोने एआयसीपीआय निर्देशांकाची मेपर्यंतची आकडेवारी जाहीर केली आहे, ज्यामध्ये महागाई भत्त्याविषयी माहिती दिली आहे. आगामी वाढ तीन टक्क्यांची राहणार असल्याचे बोलले जात आहे. दोन वर्षांत पहिल्यांदाच तीन टक्के वाढ होणार आहे. गेल्या चार वेळा महागाई भत्त्यात चार टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे.

### इंटेलमधून १८ हजार कर्मचाऱ्यांना नारळ

**न्यू यॉर्क :** अमेरिकेची सर्वात मोठी चिप उत्पादक कंपनी इंटेलला मंदीचा सामना करावा लागत आहे. अशावेळी कामाची घडी बसविण्यासाठी कंपनीने १८ हजार कर्मचाऱ्यांना कमी करण्याची घोषणा केली आहे. इंटेलला कंपनीच्या खर्चात वर्षभरात एकूण २० अब्ज डॉलर्सची बचत करायची आहे.

### छत्रपती संभाजीनगर, धाराशिववर सुप्रीम कोर्टाचे शिक्कामोर्तब

**नवी दिल्ली :** औरंगाबाद आणि उस्मानाबादचे नामांतर छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव करण्याचा राज्य सरकारचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरवला. नामांतराला काही जणांचा विरोध आणि काहींचा पाठिंबा असणारच, असे सांगून न्यायालयाने नामांतर प्रक्रियेत हस्तक्षेपास नकार दिला. या. हृषिकेश रॉय आणि न्या. भाटी यांच्या न्यायासनाने हा निर्णय देत मुंबई उच्च न्यायालयाने या अनुषंगाने दिलेला निर्णय योग्य असल्याचे म्हटले आहे. नामांतराच्या निर्णयामुळे कुठेही तणाव पसरला नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. या नामांतराला काही नागरिकांनी विरोध केला होता. या संदर्भात हस्तक्षेप करण्याची याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. नामांतर करण्याचा अधिकार हा कायद्याने सरकारला दिलेला आहे,

# नीट-यूजी परीक्षा रद्द होणार नाही

● परीक्षा पद्धती मजबूत करण्यासाठी प्रगत तंत्रज्ञान स्वीकारा ● सुप्रीम कोर्टाची सूचना

◆ **नवी दिल्ली, २ ऑगस्ट**

नीट-यूजी परीक्षा कदापि रद्द करण्यात येणार नाही. पेपर फुटीचा प्रकार देशपातळीवर झालेला नसून, तो दोन ते तीन भागांपुरताच मर्यादित आहे. त्यामुळे नीट-यूजी परीक्षेचे पावित्र्य भंग झाले असे म्हणता येणार नाही, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला.



न्यायालयाने यापूर्वी २३ जुलै रोजीच्या निकालातही ही बाब स्पष्ट केली होती. आज आपला सविस्तर निकाल वाचून दाखविताना न्यायालयाने म्हटले आहे की, यावर्षीच्या परीक्षेत जो प्रकार उघडकीस आला आहे, तो विद्यार्थ्यांच्या मुळीच हितात नसल्याने ही परीक्षा हाताळणाऱ्या राष्ट्रीय परीक्षा संस्था अर्थात् एनटीएने अशा प्रकारांवर आळा घालण्यासाठी ठोस पावले उचलणे आवश्यक आहे.

या परीक्षेत जी काही गडबड झाली, ती केवळ हजारीबाग आणि पाटणा या दोन शहरांपुरतीच मर्यादित आहे. त्यासाठी देशपातळीवर परीक्षा रद्द करण्याचे काहीच कारण नाही, असेही न्यायालयाने नमूद केले.

नीट-यूजी परीक्षेत यावर्षी जी गडबड झाली, त्याची पुनरावृत्ती होणार नाही, याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्यासाठी इस्रोचे माजी प्रमुख के. राधाकृष्णन् यांच्या अध्यक्षतेखालील समितीने प्रगत तंत्रज्ञान स्वीकारण्यावर विशेष भर द्यायला हवा, अशी सूचना सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी केली.

**कोर्टाने सुचविले अनेक टप्पे**

कोणत्याही परीक्षेसाठी सुरुवातीच्या टप्प्यापासून ते निकाल जाहीर होईपर्यंत असे अनेक टप्पे न्यायालयाने सुचवले आहेत. समितीने या सर्व टप्प्यांचा अभ्यास करून आपल्या सूचना द्याव्या, असे न्यायालयाने म्हटले आहे. समितीने या दिशेने अभ्यास करून आपल्या सूचना द्याव्यात, असे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. जे. बी. पार्डीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या न्यायासनाने म्हटले आहे.

**मानक कार्यपद्धती तयार करा**

न्यायालयाने समितीला मानक कार्यपद्धती तयार करण्यास सांगितले. समितीने आपला अहवाल ३० सप्टेंबरपर्यंत केंद्र सरकारला सादर करावा. सोबतच परीक्षेच्या पेपरमध्ये फेरफार होऊ नये, यासाठी समितीने ठोस व्यवस्था सुचवावी, असेही न्यायालयाने सांगितले. (वृत्तसंस्था)

# मनू भाकरला तिसरे पदक जिंकण्याची संधी

◆ **पॅरिस,, २ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिकमधून भारतासाठी आनंदाची बातमी आली असून, युवा नेमबाज मनू भाकरने महिला २५ मीटर एअर पिस्टल प्रकारात अंतिम फेरीत गाठली आहे. तिला तिसरे पदक मिळवण्याची संधी आहे. अंतिम फेरीत तिने पदक जिंकल्यास मनू एकाच ऑलिम्पिकमध्ये तीन पदके जिंकणारी भारताची एकमेव खेळाडू म्हणून इतिहास घडवेल. अंतिम फेरीची लढत शनिवारी होणार आहे.



मनूने यापूर्वी दोन पदके जिंकली असून, तिने १० मीटर एअर पिस्टल प्रकारात भारताला पहिले कांस्यपदक मिळवून दिले. त्यानंतर सरबज्योत सिंगच्या साथीने १० मीटर एअर पिस्टल मिश्र दुहेरीत मनूने आणखी कांस्यपदक देशाला मिळवून दिले. दोन कांस्यपदकांवर नाव कोरल्यानंतर मनू भाकर आता सुवर्ण पदक जिंकेल, अशी आशा भारतीयांना आहे. एकाच ऑलिम्पिकमध्ये दोन पदके मिळवणारी मनू भाकर स्वातंत्र्यानंतरची पहिली खेळाडू ठरली आहे. (वृत्तसंस्था)

## केंद्रीय यंत्रणांनी राज्यांसोबत समन्वय साधावा : राष्ट्रपती

◆ **नवी दिल्ली, २ ऑगस्ट**

लोकशाही सुरळीत चालण्यासाठी देशातील सर्व केंद्रीय यंत्रणांनी राज्यांसोबत समन्वय ठेवत काम करण्याची आवश्यकता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज व्यक्त केली.

देशातील विविध राज्यांच्या राज्यपालांच्या परिषदेचे उद्घाटन करताना मुर्मू बोलत होत्या. राष्ट्रपती भवनात आयोजित या परिषदेत उपराष्ट्रपती जगदीप धनकड, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. संबंधित राज्यांचे घटनात्मक प्रमुख म्हणून केंद्र आणि राज्य यांच्यातील यंत्रणाचा समन्वय वाढवण्याला आपण कसा हातभार लावू शकतो, याचा राज्यपालांनी विचार करण्याचे आवाहन मुर्मू यांनी केले. देशाचा मोठा वर्ग अनुसूचित जाती व जमातीचा आहे. या वर्गालाही समावेशी विकासाचा फायदा कसा मिळेल, याचा विचार होण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादित केली.

उपराष्ट्रपती धनकड, पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांचेही यावेळी भाषण झाले. राज्यपाल घेत असलेल्या शपथेचे स्मरण करुन देत धनकड यांनी राज्यपालांनी आपले घटनात्मक दायित्व प्रामाणिकपणे पार पाडण्याचे आवाहन केले.

**राज्यपालांनी सेतू बनावे : नरेंद्र मोदी .**

केंद्र आणि राज्य यांच्यात राज्यपालांनी सेतू म्हणून प्रभावीपणे काम करावे, असे आवाहन पंतप्रधान मोदी यांनी केले. राज्यपाल हे महत्त्वपूर्ण पद असून, घटनात्मक चौकटीत राहूनही राज्यपाल जनतेच्या कल्याणात मोठी भूमिका पार पाडू शकतात, याकडे मोदी यांनी लक्ष वेधले. (तभा वृत्तसेवा)

# ईडीची प्रथमच लडाखमध्ये छापेमारी

**क्रिप्टो घोटाळा प्रकरण**

◆ **श्रीनगर, २ ऑगस्ट**

बेकायदेशीर सावकारी प्रकरणी आतापर्यंत विविध राज्यांमध्ये छापे मारत आलेल्या अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने शुक्रवारी आजवरच्या इतिहासात प्रथमच थेट केंद्रशासित प्रदेश लडाखमध्ये धडक दिली. क्रिप्टोकरन्सी घोटाळ्याशी संबंधित बेकायदेशीर सावकारी प्रकरणात ईडीने ही कारवाई केली आहे.

गुंतवणूकदारांची सात कोटी रुपयांनी फसवणूक केल्याप्रकरणी ईडीच्या विविध पथकांनी लडाखच्या लेह शहरात तसेच जम्मू आणि हरयाणाच्या सोनीपत येथे एकाचवेळी छापेमारी केली, अशी माहिती सूत्रांनी दिली.

इमॉलियन कॉईन लिमिटेड या नावाखाली सुरू असलेल्या बोगस क्रिप्टोकरन्सी व्यवसायात २५०८ गुंतवणूकदारांनी ७.३४ कोटी रुपयांची गुंतवणूक केली होती. मात्र, या गुंतवणूकदारांना त्यांचे पैसे परत मिळाले नाही. उलट, कंपनीच्या संचालकांनी या पैशातून जम्मू आणि आसपासच्या परिसरात जमिनी खरेदी केल्या आणि काळा पैसा पांढरा करण्याचा प्रयत्न केला. (वृत्तसंस्था)



बागपत येथील पुरा महादेव मंदिरात भगवान शिवशंकराच्या दर्शनासाठी आलेल्या शिवभक्तांवर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली

# आश्चर्यच! चंद्र पृथ्वीपासून चाललाय् दूर!

**पृथ्वीवरील दिवस होणार २५ तासांचा**

◆ **न्यू यॉर्क, २ ऑगस्ट**

हजारो वर्षांपासून चंद्र आकाशात आहे. कलाकार, साहित्यिक आणि लहान मुलांना चंद्राने सतत भुरळ घातली आहे. पण आता संशोधकांनी चंद्राबद्दल नवे संशोधन केले. चंद्र हा पृथ्वीपासून हळूहळू दूर जात आहे, असे संशोधकांचे म्हणणे आहे.

युनिव्हर्सिटी ऑफ विस्कोसिन-मॅडिसनमधील संशोधक चंद्रावरील नऊ कोटी वर्षांपूर्वीच्या खडकांचा अभ्यास केला असून, त्यातून हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. याचा पृथ्वीवर मात्र दूरगामी परिणाम होणार आहे.

संशोधकांनी काढलेल्या निष्कर्षांनुसार चंद्र दरवर्षी पृथ्वीपासून ३.८ सेंटीमीटर इतक्या वेगाने दूर जात आहे. त्यानंतर भविष्यात म्हणजे



२० कोटी वर्षांनंतर पृथ्वीवरचा दिवस हा २५ तासांचा होणार आहे. संशोधनातून असे दिसून आले आहे की, १.४ अब्ज वर्षांपूर्वी पृथ्वीवर दिवस फक्त १८ तासांचा होता. पृथ्वी आणि चंद्र यांच्यातील जे बदल होत आहेत, त्यामुळे असे घडत असल्याचे संशोधकांना म्हटले आहे.

जस जसा चंद्र दूर जाईल तस तसा पृथ्वीचा स्वतः भोवती फिरण्याचा वेग ही कमी होईल. स्वतःभोवती गिरकी घेणारे स्केटिंगपटू जेव्हा हात दूर करतात, तेव्हा त्यांची गती कमी होते, तसाच हा प्रकार आहे, असे या विद्यापीठातील प्राध्यापक स्टिफन यांनी म्हटले आहे.

आमचा उद्देश असा आहे की, प्राचीन जिऑलॉजिकल वेळा सांगू शकू. अब्जावधी वर्षं जुने असलेल्या खडकांचा अभ्यास करता यावा आणि त्याचा उपयोग आताच्या भूगर्भशास्त्राच्या अभ्यासात व्हावा, असे आम्हाला वाटते.

चंद्र पृथ्वीपासून दूर जात आहे हा काही नवा शोध नाही, पण या विद्यापीठातील संशोधकांनी भूगर्भाशास्त्राच्या दृष्टिकोनातून हा मांडणी केली आहे. प्राचीन काळातील भूगर्भीय रचनांचा अभ्यास करून संशोधकांनी पृथ्वी आणि चंद्र यांच्यातील सिस्टमचा अब्जावधी वर्षांचा अभ्यास संशोधकांनी मांडला आहे. संशोधकांनी चंद्राचे पृथ्वीपासून दूर जाण्याचा जो वेग आहे, ते स्थिर असल्याचेही म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# सुधा मूर्ती लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित




ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सुधा मूर्ती यांना नवी दिल्ली येथे लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी दीपक टिळक, ज्येष्ठ नेते शरद पवार तसेच खासदार श्रीमंत छत्रपती शाहू महाराज आणि टिळक परिवारातील सदस्य उपस्थित होते

◆ **नवी दिल्ली, २ ऑगस्ट**

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, लेखिका आणि राज्यसभा सदस्य सुधा मूर्ती यांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

राजधानी दिल्लीतील नवीन महाराष्ट्र सदनात पहिल्यांदाच झालेल्या या कार्यक्रमात टिळक स्मारक ट्रस्टचे दीपक टिळक यांच्या हस्ते आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार तसेच खासदार श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांच्या उपस्थितीत लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार सुधा मूर्ती यांना समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. १ लाख रुपये रोख, स्मृती चिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. सुधा मूर्ती यांनी पुरस्काराची राशी पुण्याच्या मेक यु लाईफ या स्वयंसेवी संस्थेला दिली.

२०२३ मध्ये हा पुरस्कार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देण्यात आला होता. १९८३ मध्ये पहिल्यांदा हा पुरस्कार एस. एम. जोशी यांना देण्यात आला. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी, डॉ. मनमोहनसिंग यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्राला मोठ्या परंपरेचा वारसा लाभला आहे, पैसे देऊनही असा गौरवशाली वारसा मिळत नाही. त्यामुळे हा वारसा आपण जपला पाहिजे, असे सुधा मूर्ती म्हणाल्या. महाराष्ट्रातील मराठी जनतेने मराठीचा अभिमान बाळगण्याचे आवाहनही त्यांनी केले. (तभा वृत्तसेवा)

# ईडी माझ्यावर छापा मारण्याच्या तयारीत

◆ **नवी दिल्ली, २ ऑगस्ट**

लोकसभेत चक्रव्यूहचा संदर्भ देत केलेल्या भाषणानंतर माझ्यावर छापा मारण्याची तयारी अंमलबजावणी संचलनालयाने (ईडी) केल्याचा आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज केला.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर राहुल गांधी यांनी म्हटले की, टु इन वन लोकांना माझे चक्रव्यूहचा संदर्भ असलेले भाषण



आवडले नाही, असे दिसते. त्यामुळे माझ्यावर छापा टाकण्याची तयारी सुरू झाली असल्याचे मला ईडीतील माझ्या सूत्रांकडून समजले आहे. ईडीचे मी खुल्या अंत:करणाने स्वागत करतो. ईडीला टॅग करीत राहुल गांधी म्हणाले की, चहा आणि बिस्किट माझ्याकडून.

हजारो वर्षांपूर्वी सहा जणांनी अभिमन्यूला चक्रव्यूहमध्ये घेरून मारले होते, असा आरोप राहुल गांधी यांनी अर्थसंकल्पावरील भाषणात लोकसभेत केला होता.

चक्रव्यूहात ज्याप्रमाणे अभिमन्यूला सहा जणांनी घेरले होते, त्याचप्रमाणे आताही मी या विषयाचा अभ्यास केला, तेव्हा मला समजले की, चक्रव्यूहला पद्मव्यूहही म्हटले जाते. (तभा वृत्तसेवा)

## टाटा प्लेच्या पॅकमधून सोनी हद्दपार

**मुंबई :** डायरेक्ट-टू-होम ऑपरेटर टाटा प्लेने त्याच्या क्युरेटेड पॅकमधून सोनी पिक्चर्स नेटवर्क्स चॅनेल काढून टाकले आहे. यामुळे पॅकच्या किमती कमी होतील. तथापि, जे ग्राहक काढून टाकलेले चॅनेल पाहू इच्छितात ते मिस्ड कॉल देऊन त्याचे सदस्यत्व घेऊ शकतात. ब्रॉडकास्टर सोनी चॅनल काढून टाकण्यासाठी कायदेशीर पर्यायांचा विचार करत आहे. सोनी म्हणाले की, वाहिन्या काढून टाकणे हे सूडाचे कृत्य आहे.

# 'श्रीं'च्या पालखीचे पंढरपूरहून जिल्ह्यात आज आगमन

**स्वागतासाठी भाविकांची जय्यत तयारी**

◆ **शेगाव, २ ऑगस्ट**

पंढरपूरला भगवान पांडुरंगाच्या दर्शनासाठी गेलेल्या संतश्रेष्ठ शेगावीचा राणा संत गजानन महाराज यांच्या पालखी व दिंडीचे शनिवार ३ ऑगस्ट रोजी विदर्भात आगमन होत आहे. याप्रसंगी मराठवाडा व विदर्भाच्या सीमेवर बुलढाणा जिल्ह्यात सिंदखेडराजा तालुक्यातील माळ सावरगाव याठिकाणी संत गजानन महाराजांच्या पालखीचे भव्य स्वागत होणार आहे. यानिमित्त भाविकांनी पालखीच्या स्वागताची जय्यत तयारी सुरू केली आहे.

श्री गजानन महाराजांच्या पालखीचे मराठवाड्यातून विदर्भात आगमन झाल्यानंतर माळ सावरगाव सीमेवर वारकरी संप्रदायातर्फे भव्य सोहळा होतो. श्री पंढरपूरहून पुन्हा शेगावी येत असल्याने वारकरी एकमेकांना आलिंगन देतात, पेढा भरवतात, भजन म्हणून नाचून गाऊन आपला आनंद व्यक्त करतात. हरिनामाचा जयजयकार येथे केला जातो.

माळ सावरगाव ते सिंदखेड राजापर्यंत ठिकठिकाणी भाविक व वारकऱ्यांना चहा, पोहे, नाश्ता, फराळाचे वाटप इतर भक्त दरवर्षी करतात. या रस्त्याने गजानन महाराजांच्या पालखी स्वागताचे बॅनर ठिकठिकाणी झळकताना दिसून येत आहेत.

सिंदखेडराजा येथे श्री गजानन महाराजांच्या पालखीचे आगमन झाल्यानंतर मोती तलावमार्गे जिजामाता नगर, पुढे रामेश्वर मंदिर येथे जेवण, त्यानंतर महात्मा फुले शाळा मार्गाने जिजामाता शाळेमध्ये भाविकांसाठी दर्शन सोहळा कार्यक्रम पार पडेल. त्यानंतर इथेच पालखी मुक्कामी राहणार असून ४ ऑगस्ट रोजी सकाळी सिंदखेड राजावरून पालखी पुढे मार्गक्रमण करणार आहे. त्यानंतर बीबी, लोणार, मेहकर, जानेफळ, शिर्ला नेमाने, आवार, खामगाव मार्गे शेगाव येथे ११ ऑगस्ट रोजी पालखी पोहोचणार आहे. (तभा वृत्तसेवा)



# पूजा खेडकरच्या आईला जामीन

◆ **पुणे, २ ऑगस्ट**

वादग्रस्त माजी प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकरची आई मनोरमा खेडकर यांना जमिनीच्या वादाशी संबंधित गुन्हेगारी धमकी प्रकरणात पुण्यातील एका न्यायालयाने शुक्रवारी जामीन मंजूर केला.

अतिरिक्त सत्र न्यायाधीश ए. एन. मारे यांनी जामीन मंजूर केल्याचे मनोरमा खेडकर यांचे वकील सुधीर शहा यांनी सांगितले.

२०२३ मध्ये पुण्याच्या मुळशी तालुक्यातील धडवली गावात जमिनीच्या वादावरून काही लोकांना बंदूक दाखवून धमकावत असल्याचा व्हिडीओ समोर आल्यानंतर पुणे ग्रामीण पोलिसांनी मनोरमा आणि तिचे पती दिलीप खेडकर यांचा शोध सुरू केला होता.

रायगड जिल्ह्यातील महाडजवळील हिरकणीवाडी गावातील एका लॉजमधून मनोरमाला अटक करण्यात आली होती. या प्रकरणी दिलीप खेडकर यांना अटकपूर्व जामीन मिळाला आहे. यूपीएससीने बुधवारी सांगितले की, त्यांनी प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकरची तात्पुरती उमेदवारी रद्द केली आहे आणि तिला भविष्यातील सर्व परीक्षा किंवा निवडीतून बाद ठरविले आहे. (वृत्तसंस्था)

६२ वर्षांचा प्रवास लोकसेवेचा, निर्धार लढण्याचा!



सहकार क्षेत्र
साखर उद्योग
कृषी
पणन
बँकिंग
शिक्षण
वैद्यकीय
राजकीय
सामाजिक
बांधकाम
क्रीडा

आमचे मार्गदर्शक
# मा. श्री. दिलीप माने यांना
# वाढदिवसाच्या
## मन:पूर्वक शुभेच्छा!

शुभेच्छूक -

ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँक लि., सोलापूर
ब्रह्मदेवदादा माने इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर
ब्रह्मदेवदादा माने पॉलिटेक्निक, सोलापूर
ब्रह्मदेवदादा माने कनिष्ठ महाविद्यालय, सोलापूर
लिटिल हार्ट इंग्लिश मेडीयम स्कूल, सोलापूर
एस.पी. एम. पॉलिटेक्निक कुमठे, सोलापूर
कुमठे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, सोलापूर
राष्ट्रविकास प्राथमिक विद्या मंदिर, कुमठे, सोलापूर
लक्ष्मी ॲग्रो, ति-हे

आदर्श बालविकास मंदिर, कुमठे, सोलापूर
लिटिल स्टार इंग्लिश मेडीयम स्कूल, कुमठे, सोलापूर
डॉ. भैय्यासाहेब वळसंगकर प्रशाला, ति-हे सिध्दनाथ शुगर मिल्स लि., ति-हे
नर्मदा मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, सोलापूर
राजर्षी शाहू मेडीकल हॉस्पिटल, सोलापूर
ब्रह्मसुमित्रा नागरी सहकारी पतसंस्था मर्या.
सोलापूर सुमित्रा मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी, सोलापूर
सुखांजली मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी, सोलापूर
त्वम् ऍग्रोटेक प्रा. लि

निर्भिड व निपक्षपाती दैनिक तरूण भारतच्या वर्धापनदिनाला हार्दिक शुभेच्छा !

## अग्रलेख...

# कठोर कारवाई व्हावी

देशाच्या शिक्षण क्षेत्रात भारताची गौरवशाली प्राचीन परंपरा आणि संस्कृतीसोबत आधुनिकीकरणाचा संगम साधणाऱ्या नवीन शैक्षणिक धोरणाचा प्रवेश होत असताना काही हितसंबंधी आणि स्वार्थी वृत्तीचे लोक त्याला जाणीवपूर्वक गालबोट लावण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसते. शिक्षण क्षेत्राबद्दल मोदी सरकार विशेषत: पंतप्रधान नरेंद्र मोदी अतिशय संवेदनशील आहेत. विद्यार्थ्यांबद्दल त्यांना आपुलकी आणि जिव्हाळा आहे. त्यामुळेच ते गेल्या काही वर्षांपासून इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेच्या आधी 'परीक्षा पे चर्चा' हा कार्यक्रम आयोजित करतात. या कार्यक्रमातून मोदी विद्यार्थ्यांना अभ्यास कसा करावा, पेपर कसा सोडवावा, परीक्षेमुळे उद्भवणाऱ्या ताणतणावाचा सामना कसा करावा, याबाबत मार्गदर्शन करीत असतात. एवढेच नाही तर शिक्षक आणि पालकांच्या प्रश्नांचे शंकासमाधानही करीत असतात. यावेळची मोदी यांची भूमिका एखाद्या आजोबाने आपल्या नातवाला प्रेमाने जवळ घेऊन समजवावे, अशी असते. स्वातंत्र्यानंतर पंडित नेहरू यांना लहान मुलांबद्दल वाटत असलेल्या जिव्हाळा आणि आपुलकीचे गोडवे गायले जात होते. 'चाचा नेहरू' म्हणून त्यांचे वर्णन केले जात होते; पण मोदी यांनी त्यांना केव्हाच मागे टाकले. आज देशातील लोकांमध्येच नाही तर लहान मुले आणि विद्यार्थ्यांमध्ये मोदी सर्वात लोकप्रिय आहेत, यात शंका नाही. मात्र, मोदी यांचे शिक्षण क्षेत्र आणि विद्यार्थ्यांबद्दल असलेल्या या भूमिकेमुळे काही शक्तींच्या पोटात दुखू लागले आहे, असे दिसते. त्यामुळे मोदी सरकारसोबत शिक्षण क्षेत्राला बदनाम करण्याचे षडयंत्र त्यांनी रचले. मध्यंतरी नीट परीक्षेच्या पेपरफुटीचे प्रकरण गाजले. वैद्यकीय प्रवेशासाठीच्या नीट परीक्षेला देशभरातील लाखोंच्या संख्येत विद्यार्थी बसतात. या परीक्षेचा पेपर देशाच्या कानाकोपऱ्यातील कोणत्या तरी गावात फुटला, त्याचा फायदा म्हणा गैरफायदा शेदोनशे विद्यार्थ्यांना झाला. त्यावरून विरोधकांनी रान उठवले. देशभर या परीक्षेचे पेपर फुटले, असा कांगावा करत संपूर्ण परीक्षा रद्द करीत नव्याने ही परीक्षा घेण्याची मागणी केली. यानिमित्ताने मोदी सरकारवर जी टीका करण्यात आली, ती वेगळीच. जणू मोदी सरकारने वा त्या सरकारमधील कोणा मंत्र्याने नीट परीक्षेचा पेपर फोडला, असे वातावरण देशभरात तयार करण्यात आले. मोदी सरकारला यानिमित्ताने आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याची संधी विरोधकांनी साधून घेतली. सुदैवाने सर्वोच्च न्यायालयाने नीट परीक्षेचा पेपर फुटला नाही, त्यामुळे परीक्षा रद्द करण्याचा वा नव्याने परीक्षा घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असा निकाल देत विरोधकांच्या आरोपातील हवा काढून घेतली. एकप्रकारे विरोधकांच्या कानशिलात सणसणीत लगावली. मागील आठवड्यात राजधानी दिल्लीच्या ओल्ड राजेंद्रनगर भागात युपीएससी परीक्षेच्या शिकवणी वर्गाच्या तळघरात पावसाचे आणि ड्रेनेजचे पाणी शिरल्यामुळे झालेल्या अनपेक्षित आणि धक्कादायक घटनेत तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला; एकप्रकारे त्यांना जलसमाधी मिळाली. या घटनेने देशभरातील लोकांना धक्का बसला. आयएएस होऊन देशाच्या सेवेचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या स्वप्नावर या पावसाने पाणी फेरले. या घटनेवरूनही राजकीय आरोप-प्रत्यारोप झाले. जणू ही घटना मोदी सरकारमुळेच घडली, असे वातावरण निर्माण करण्यात आले.

खरं म्हणजे या घटनेची जबाबदारी दिल्ली सरकारची होती. ड्रेनेजची योग्य व्यवस्था राजेंद्रनगर भागात असती, तर ही घटना घडलीच नसती. आज दिल्लीतच नव्हे तर देशाच्या अनेक भागात शिकवणी वर्गांचे अमाप पीक आले आहे. हजारो नाही तर लाखो विद्यार्थी शिकवणी वर्गात येत असतात. यातून काही हजार कोटींची बाजारपेठ तयार झाली आहे. शिकवणी वर्गांसाठी इमारती बांधताना कोणत्याच नियमांचे पालन केले जात नाही. वीज मंडळ आणि अग्निशामक दल असो की सरकारच्या अन्य सर्व यंत्रणा डोळे बंद करून आर्थिक फायद्यावर डोळा ठेवत हा सारा बेकायदेशीर प्रकार खपवून घेत असतात. मुळात ज्या तळघरात म्हणजे बेसमेंटमध्ये पाणी शिरले, तेथे लायब्ररी तयार करण्यात आली होती. या खुराड्यासारख्या लायब्ररीत ५०-६० विद्यार्थी अभ्यास करीत होते. या ठिकाणी लायब्ररी तयार करण्याची परवानगीच नव्हती. पडित सामान ठेवण्यासाठी जागा म्हणून हे तळघर बांधत आहे, असे सांगण्यात आले. सरकारच्या संबंधित खात्यांनी आज्ञाधारक विद्यार्थ्यांप्रमाणे त्यावर विश्वास ठेवला. आमच्या देशात सगळ्याच शासकीय यंत्रणांना आग लागल्यानंतर जाग येते, पण आग लागूच नये म्हणून काही उपाययोजना आपल्याला कराव्या लागतात; ती आपली जबाबदारी आहे, त्यासाठीच सरकारकडून आपल्याला पगार मिळतो, याचे भान कोणाला राहात नाही. मध्यंतरी दिल्लीत आणि देशाच्या अन्य भागातही शिकवणी वर्गाला लागलेल्या आगीत काही विद्यार्थ्यांना आपले जीव गमवावे लागले होते. घटना घडल्यानंतर आपल्या देशातील शासकीय यंत्रणांना जाग येते आणि त्याठिकाणचे बांधकाम बेकायदेशीर होते, अग्निशामक दलाचे ना-हरकत प्रमाणपत्र त्यांनी घेतले नव्हते, असा स्वत:च्या बचावाचा युक्तिवाद केला जातो. मात्र, यातून शासकीय यंत्रणांचा निष्काळजीपणा आणि बेफिकिरीही दिसून येते. राजधानी दिल्लीच्या करोलबाग आणि ओल्ड राजेंद्रनगर भागात विद्यार्थी ज्या वातावरणात राहतात, ते पाहून अंगावर काटा येतो. राजधानी दिल्लीत जर अशी परिस्थिती असेल तर देशाच्या अन्य भागात काय परिस्थिती असेल, याची आपण कल्पनाही करू शकत नाही. भ्रष्टाचाराने देश पोखरून टाकला आहे. त्यामुळे या देशात सर्वसामान्य माणसाच्या जिवाची कोणाला पर्वा नाही. तो मेला काय आणि जगला काय, याचे कोणाला सोयरसुतक नाही. मृतांच्या कुटुंबीयांना लाख-दोन लाखांची नुकसान भरपाई दिली की, आपली जबाबदारी संपली, असे सर्वांना वाटत असते. त्यामुळे अशा घटनेसाठी बेकायदेशीर बांधकाम करणारे जेवढे जबाबदार आहे, तेवढेच या बेकायदेशीर बांधकामाकडे दुर्लक्ष करणारेही जबाबदार असतात, हे आपल्याला विसरता येणार नाही. अशा घटनांसाठी दोषींना या प्रकरणात आरोपी करताना संबंधित सरकारी यंत्रणेतील अधिकाऱ्यांना सहआरोपी करण्याची गरज आहे. त्यांच्यावरही फौजदारी गुन्हा दाखल केला पाहिजे.

प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर प्रकरणाने देशातील जनतेला दुसरा धक्का बसला आहे. खेडकर प्रकरणाने देशातील सनदी सेवांसाठी परीक्षा घेणारी केंद्रीय लोकसेवा आयोगाची (युपीएससी) यंत्रणा संशयाच्या घेऱ्यात सापडली. युपीएससीने पूजा खेडकर यांचे आयएएस पद रद्द केले तसेच भविष्यात त्या अशा कोणत्याही परीक्षेला बसू शकणार नाही, असा आदेश दिला. आतापर्यंत देशातील सर्व आयएसएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांकडे अतिशय आदराने पाहिले जात होते, पण पूजा खेडकर प्रकरणाने जनमानसात या सर्व अधिकाऱ्यांबद्दल कारण नसताना संशयाचे आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण केले आहे. प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी असताना पूजा खेडकर यांनी जो गोंधळ घातला, तमाशा केला, तो पाहात उद्या त्या स्थायी स्वरूपाच्या आयएएस अधिकारी झाल्या असता तर त्यांनी किती आणि कसा हैदोस घातला असता, याची कल्पनाही करवत नाही. एक सडका आंबा टोपलीतील सर्व आंबे सडवतो, तसा हा प्रकार म्हटला पाहिजे. आयएएस अधिकाऱ्याच्या संघटनेनेही या प्रकरणाचा धडा घेत असा कोणताही सडका आंबा आपल्यामध्ये येणार नाही, याची खबरदारी घेतली पाहिजे. पूजा खेडकर यांचा अटकपूर्व जामीन न्यायालयाने फेटाळला आहे. त्यामुळे त्यांना अटक होईल, हे निश्चित आहे. अटकेच्या भीतीने त्या देशाबाहेर पळून गेल्याची चर्चा आहे. पूजा खेडकर यांनी आपल्या कृतीने आपले स्वत:चे तर नुकसान केले; पण युपीएससी, आयएएस अधिकारी तसेच देशातील प्रशासकीय यंत्रणेचे कधीही भरून न निघणारे नुकसान केले. त्यामुळे पूजा खेडकर यांची पिलावळं देशात यापुढे कोणत्याही स्तरावर निर्माण होणार नाहीत, वाढणार नाही, याची काळजी सगळ्यांना घ्यावी लागणार आहे.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# वोकिज्मने घेतला फेमिनिज्मचा बळी!

युनायटेड स्टेट्समध्ये एका पोलिस अधिकाऱ्याने मायकेल ब्राऊन नावाच्या १८ वर्षीय कृष्णवर्णीय तरुणाला गोळ्या घालून मारल्यानंतर 'स्टे वोक, वोक' हे शब्द चर्चेत आले. आपण सतत जागृत असलं पाहिजे. महिलांवर, कनिष्ठ वर्गावर होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध आवाज उठवला पाहिजे, असा याचा अर्थ आहे. मात्र, ही 'वोक' संस्कृती जगाला पोखरत आहे. २०२३ च्या विजयादशमीच्या भाषणात सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी मार्क्सवादी लोकांना 'वोक' म्हटले. ते म्हणाले की, सध्या त्यांचे नवीन नाव आहे, कल्चरल मार्क्सिज्म किंवा वोक. डॉ. भागवत यांनी केलेली टीका अतिशय योग्य आहे. कारण सुरुवातीला या डाव्या लोकांनी मजूर, शेतकरी आणि इतर शोषित वर्गाच्या मनात श्रीमंत आणि प्रस्थापित लोकांच्या विरोधात भडकवलं. यातून नक्षली चळवळ निर्माण झाली. यात अपयश आल्याने त्यांनी नवीन मुखवटा चढवला आहे. यालाच 'कल्चरल मार्क्सिज्म' किंवा 'वोकिज्म' म्हणतात.

सामाजिक न्याय, मुक्त संभोग, फेमिनिज्म (महिलांचे अधिकार) आणि ट्रान्सजेंडर इत्यादी गोष्टी समोर ठेवून वोकिज्म आपलं काम करत आहे. डाव्यांना आपली विद्यमान संस्कृती पूर्णपणे नष्ट करायची आहे. यात त्यांच्यासमोरचा सर्वात मोठा अडथळा म्हणजे हिंदू. कारण ख्रिस्ती, जिहादी, डाव्या आक्रमकांनी मिळून जगातल्या अनेक संस्कृती नष्ट केल्या आहेत. मात्र, हिंदू अजूनही ठामपणे उभा आहे. त्यामुळे जगात असलेली उजवी संस्कृती तर या डाव्यांना नष्ट करायचीच आहे; त्यांचे सर्वात मोठे 'टार्गेट' भारत आहे. आता हा वोकिज्म कसा काम करतो? हे लोक सर्वात आधी तुमच्या वांशिक मुळावर प्रहार करतात. आपल्याला सांस्कृतिक देण (जात, धर्म, विचार इ.) आपल्या कुटुंबाकडून मिळते. मग यातून मुक्त होण्यासाठी कुटुंब व्यवस्थाच नको. कौटुंबिक रचनेवर प्रहार केला जातो. तुम्ही तुमच्या मर्जीचे मालक झाले पाहिजे. तुम्हाला लग्न नसेल करायचं, मुलं जन्माला नसतील घालायची तर ही तुमची निवड आहे. लग्न म्हणजे परवानाकृत वेश्या-व्यवसाय असं नॅरेटिव्ह सेट केलं जातं. मुक्त संभोग म्हणजे 'फ्री सेक्स'ला पाठिंबा दिला जातो. या मुक्त संभोगात नातीगोती महत्त्वाच्या नसतात. त्याचबरोबर इथे लिंगभेदही करता कामा नये. तुमच्या जन्माच्या वेळी तुम्हाला लैंगिक ओळख मिळते. पण या



'वोकिज्म'मध्ये तुमचं जेंडर निवडण्याचं स्वातंत्र्य तुम्हाला असतं. तुम्ही पुरुष असाल आणि तुम्हाला जर वाटलं की तुम्ही स्त्री आहात, तर लोकांनी तुम्हाला स्त्रीच मानले पाहिजे, असा अट्टाहास असतो. भारतात याची प्रखरता अजूनही दिसून येत नसली, तरी अमेरिकेसारख्या देशात हे सर्रास घडतं. लेखक अभिजित जोग यांनी एका मुलाखतीत याविषयी विस्तृत माहिती दिलेली आहे. ते म्हणतात की, अमेरिकेत एखाद्या मुलाने आपण मुलगी आहोत असे घोषित केले तर तो मुलींच्या शौचालयात सहज प्रवेश मिळवू शकतो. परिस्थिती इतकी बिकट आहे की, कुणी कुत्र्याचा आवाज काढला आणि आपण कुत्रा आहोत असं म्हणाला, तर त्याच्या कुत्रा असण्यावर तुम्ही आक्षेप घेऊ शकत नाही. अशी अनेक उदाहरण आहेत. ज्यात मुलगी स्वत:शीच लग्न करते आणि स्वत:सोबतच मधुचंद्राला जाते. कुणी स्वत:शीच कसं लग्न करू शकतं? एखादी स्त्री बाहुल्याशी लग्न करते आणि त्यालाच आपला पती मानते. एखादं लहान बाहुलं बनवून त्यालाच आपलं बाळ मानते. हा काय प्रकार आहे? मी काही वर्षांपूर्वी डाव्यांच्या फिल्म फेस्टिव्हलला गेलो होतो. महाविद्यालयीन तरुणांसाठी हा कार्यक्रम आयोजित केला होता. तिथे एक महिला सामाजिक कार्यकर्ता होती. ती म्हणाली की, मी माझ्या मुलाला मुलींचे कपडे घालू देते, दागिने घालू देते. कारण त्याने महिलांचा सन्मान केला पाहिजे. आता मला सांगा, महिलांचा सन्मान करण्यासाठी तुम्हाला महिला असल्याचे सोंग घ्यावे लागत असेल तर तुम्ही खरं तर महिलांचा अपमान नाही का करत? उलट तुम्ही परिपूर्ण पुरुष असून महिलांचा सन्मान करता तेव्हा खऱ्या अर्थाने त्यांचा सन्मान होतो. महिलांचा सन्मान करण्यासाठी बाप्याने बाईचे कपडे घालून फोटो सेशन करायची गरज नाही. या वोकिज्मचे गंभीर परिणाम भविष्यात भोगायला लागणार आहेत. याची झलक पॅरिस ऑलिम्पिकमध्ये दिसून आली आहे. यावर्षीच्या ऑलिम्पिकची थीम आहे जेंडर इक्वालिटी. या ऑलिम्पिकमध्ये महिला स्पर्धकांचे प्रमाणही लक्षणीय आहे. ही खरंच अभिमानाची बाब आहे. पण जेंडर इक्वालिटीच्या अतिरिक्त अट्टाहासापोटी एका महिलेचा बळी गेला आहे.

इमाने खेलिफ आणि लिन यू तिंग हे दोन पुरुष यावर्षी महिला म्हणून ऑलिम्पिक स्पर्धेत उतरले आहेत. २०२३ मध्ये लिन यू तिंग सेक्स टेस्टमध्ये नापास झाला म्हणून वुमन्स वर्ल्ड बॉक्सिंग चॅम्पियनशिपचं त्याचं कांस्य पदक इंटरनॅशनल बॉक्सिंग असोसिएशनने त्याच्याकडून काढून घेतलं होतं. आता त्याला आश्चर्यकारकरीत्या ऑलिम्पिकमध्ये खेळण्याची संधी मिळाली आहे. हीच कहाणी इमाने खेलिफची आहे. अधिक टेस्टोस्टेरॉन लेव्हल असल्यामुळे त्याच्यावर भारतात झालेल्या बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये बंदी घालण्यात आली होती. त्याच्यामध्ये 'एक्स-वाय क्रोमोसॉम' आढळलं, जे पुरुषामध्ये आढळून येतं. पूर्वी अनेक चाचण्या घेतल्या जायच्या आणि त्यानंतरच स्पर्धकांना प्रवेश मिळायचा. आता १९९९ च्या सगळ्या चाचण्या बंद केल्या आहेत आणि या वर्षीची थीम जेंडर इक्वालिटी असल्यामुळे या दोघांना या स्पर्धेत प्रवेश मिळाला. याचे गंभीर परिणाम आता समोर आले आहेत. इमाने खेलिफने ॲन्जेला नॅरिनीचा पराभव केला. खेलिफच्या बुक्क्यांनी ॲन्जेला रक्तबंबाळ झाली आणि तिच्या डोळ्यांतून अश्रू आले. ४६ सेकंदाच्या आतच तिने आपला पराभव स्वीकारला. ती म्हणाली की, मला जिवंत राहायचे होते. जे झालं ते वाईट झालं. वोकिज्ममुळे ॲन्जेलाचा बळी गेला. विजेता होण्याचं तिचं स्वप्न रसातळाला गेलं. या वोकिज्मचे आणखी अनेक बळी जाणार आहेत. 'फेमिनिज्म' हा वोकिज्मचा उपप्रकार आहे. आता वोकिज्मनेच फेमिनिज्मचा बळी घेतला. डावी विचारसरणी जगात वैचारिक युद्ध करून तिथली संस्कृती नष्ट करण्यासाठी पूर्ण प्रयत्न करत आहे. आता यावर एकच उपाय, सज्जनांचे संघटन!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**अभिजित लिखिते**

# हानिया, शुकर, देफच्या खात्म्याने होणार उलथापालथ

इस्रायलने हमासचा प्रमुख हानिया, हिजबुल्लाचा उपप्रमुख शुकरचा खात्मा केल्यानंतर लगेच देफलाही संपवले. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी इस्रायलवर झालेल्या नृशंस हल्ल्यानंतर हा देश प्रचंड संहार करणार असल्याचे निश्चित झाले होते. इस्रायलचा पूर्व इतिहास पाहता, हे होणारच होते. इस्रायल शत्रूला लोळवण्यासाठी पाताळापर्यंत त्याचा माग काढू शकतो. पण, त्यानंतर सुरू झालेल्या हमास व इस्रायलमधील गाझापट्टीतील युद्धामुळे जगभरात तणाव वाढला. रशिया व युक्रेनमधील युद्धाचा चटका अगोदरच लागला असताना गाझापट्टीत युद्धाची आग भडकली. आता इस्रायलने लेबनॉन आणि इराणमध्ये कारवाई करीत देशाच्या शत्रूंना यमसदनी धाडले. त्यामुळे या युद्धाची व्याप्ती वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. इराणच्या सर्वोच्च नेत्याने सूड घेण्यासाठी इस्रायलवर हल्ला करण्याचा आदेश दिला. त्यामुळे इराण आणि लेबनॉनही यात उतरणार असल्याचे स्पष्ट झाले. त्यात तुर्कीची भूमिकाही महत्त्वाची ठरणार आहे. व्याप्ती वाढलेल्या या युद्धाचा भीषण परिणाम जगावर विशेषत: आशियावर होणार आहे.

गाझामधील पेटलेल्या युद्धामुळे अगोदरच गुंतवणूकदार चिंतेत आहेत. या घटनेचा आशियातील बाजारांवर होणाऱ्या परिणामांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न आशियातील देश सुरू करतील. जागतिक घडामोडी विशेषत: कोणताही भू-राजकीय तणाव आर्थिक बाजारपेठेत उलथापालथ करण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडतो. यामुळे गाझातील युद्धाने गुंतवणूकदारांना निश्चितपणे जागतिक परस्परावलंबनांच्या गुंतागुंतीच्या जाळ्यांची आठवण करून दिली आहे. अशा तणावांचे तत्काळ व दीर्घकालीन परिणाम होत असतात. जागतिक तेल पुरवठ्यात मध्यपूर्वेचा वाटा मोठा आहे. युद्धाची व्याप्ती वाढली, तर याचा सर्वांत भीषण परिणाम भारतावर होईल तसेच आशियातील इतर देशांवरही तो होणार आहे. तेलाच्या पुरवठ्यात व्यत्यय आल्यास तेलाच्या किमती वाढतील. त्यामुळे जागतिक चलनवाढीचा दर आणि व्यापारातील संतुलन प्रभावित होईल. हे संतुलन तसेही युद्ध सुरू झाल्यानंतर बिघडले आहे. भूराजकीय तणावाच्या काळात गुंतवणूकदार सोने, जपानी चलन आणि इतर सुरक्षित गुंतवणुकींकडे वळतात. सध्याचा तणाव वाढल्यास नवीन सुरक्षित गुंतवणुकीचा शोध गुंतवणूकदारांकडून घेतला जाईल, हे निश्चित आहे. त्याचा परिणाम जगातील शेअर बाजारांवरही निश्चितपणे होणार आहे. हा परिणाम युद्ध करणाऱ्या देशांशी जवळचे संबंध असलेल्या किंवा तेल आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या देशांमधील शेअर बाजारावर मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. तिथे अस्थिरता येते. मात्र, अलिकडील काळात भारतीय शेअर बाजाराने लवचीकता दाखवली आहे. संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ झाली आहे. त्याचा गंभीर परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर होत आहे. यामुळे उच्च आयातीत चलनवाढ होऊ शकते. उद्योगांच्या उत्पादन खर्चावर याचा परिणाम होऊ शकतो. इराणने युद्धात उडी घेतल्यास होर्मुझच्या सामुद्रधुनीतून येणाऱ्या मालवाहू जहाजांचा मार्ग धोक्यात येण्याची शक्यता आहे. इराणने याआधीही अशी धमकी दिली होती. असे झाल्यास आशियातील देश मोठ्या प्रमाणात पोळून निघतील. इराणने उडी घेतल्यास सागरी मार्गांवर निश्चितपणे परिणाम होईल. त्यामुळे मालवाहतूक व विमा खर्च वाढण्याची शक्यता आहे. कच्च्या तेलाचा पुरवठा बाधित झाल्यास प्रमुख आयातदार असलेले अमेरिका, भारत, चीनमधील उच्च आयातीत निश्चितपणे चलनवाढ होऊ शकते.



या युद्धाचे भूराजकीय परिणामही निश्चित आहेत. यामुळे मध्यपूर्वेची स्थिती कठीण असेल. अलिकडच्या घडामोडी पाहिल्या असता अमेरिकेचा प्रभाव कमी होत असल्याचे दिसत आहे. अमेरिकेत एकीकडे राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक होत असताना, दुसरीकडे या देशाला इस्रायलचा विषयही कठीण होत असल्याचे दिसत आहे. या मुद्यावर अमेरिका नेमकी कोणती भूमिका घेईल याची उत्सुकता आहे. अमेरिकेचा प्रभाव कमी होण्यामागे अमेरिकेतील झालेला ९/११ हल्ला २०१०-११ दरम्यान अरब स्प्रिंग उठावदेखील कारणीभूत ठरले आहेत. त्यानंतर अमेरिकेने या भागातील लष्करी बांधिलकी कमी केली. सध्या अमेरिकेचे परराष्ट्र धोरण चीनला रोखण्यासाठी भारत-प्रशांतकडे वळले आहे. या युद्धाचा फायदा घेत चीन स्वत:चे सामर्थ्य वाढवण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

९०२८०५५१४१

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# 'मेरी हिम्मत को परखने की गुस्ताखी मत करना...'

उद्धव ठाकरेंच्या राजकारणातील सुरुवातीच्या काळात तळागाळातले शिवसेनेचे कार्यकर्ते स्वत:च म्हणायचे, उद्धव साहेब साधासुधा, सोज्वळ माणूस आहे. राजसाहेबांसारखा 'रफ ॲण्ड टफ' नाही. हा शिवसेनेच्या पठडीत बसणारा नाही. मुळात हा शिवसेनेसाठी बनलाच नाही वगैरे वगैरे... यावेळी अचानक उद्धव ठाकरे यांची तू-ता ची टपोरी भाषा ऐकली आणि साधासुधा, सोज्वळ माणूस समजणाऱ्या कार्यकर्त्यांचा गैरसमज दूर झाला. उद्धव मुळात पहिलेपासून आतल्या गाठीचाच माणूस, कोल्ड ब्लडेड मर्डरसारखी खुनशी वृत्ती तर त्याने आधीच आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात दाखविलीच आहे. याचा अनुभव तर घरच्यांना, सख्ख्या भावाला, चुलत भावाला कधीचाच आलाय्... डाव धरून ठेवणे, मग काटा काढणे वगैरे सर्व प्रकार करून मोकळा झालेल्या ठाकरेंबद्दल तरीही कार्यकर्ते आजही संभ्रमातच होते. लोकांना, कार्यकर्त्यांना सतत वाटायचं संजय राऊत काय भाषा बोलतो! महिलांविषयी अपशब्द वापरतो, महिलांचा अपमान करतो, वृत्तवाहिन्यांच्या कॅमेऱ्यांसमोर अश्लील भाष्य करतो आणि आमचे उद्धवसाहेब हे कसे सहन करून घेतात? राऊताला का आवरत नाहीत? भाषेवर अंकुश का लावत नाहीत? या सगळ्याचं उत्तर आज कार्यकर्ते आणि अवघ्या महाराष्ट्राला मिळालं असेल. आता मालक जी कृती करेल, ज्या भाषेचा वापर करेल त्याचंच अनुकरण खालचे कार्यकर्ते करतीलच नाही का...

राज्याच्या मुख्यमंत्र्यांसारख्या संवैधानिकपदावर राहिलेला माणूस आपल्या लायकीचे प्रदर्शन मुख्यमंत्रिपदावर असतानापासून तर आजवर सातत्याने करत आला आहे. बरं यांची, यांच्या पक्षाची आणि यांनी पोसून ठेवलेल्या कार्यकर्ता नावाच्या टोळीची संस्कृती, भाषा ही नेहमी टपोरीबाजच, गुंडगिरीची, भाईगिरीचीच राहिली आहे. बरं, ही सगळी तोंडावाटे बाहेर येणारी आगपाखड कशासाठी आहे, ही उद्विग्नता कशाची आहे? कारण फडणवीसांनी यांचे वसुलीचे धंदे बंद केले, मातोश्रीवर जाणारे खोके बंद केले. हे अवघ्या महाराष्ट्राला सर्वश्रुत आहे.

"तू राहशील, नाही तर मी !" असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी केले फडणवीसांना लक्ष्य. शरद पवार फडणवीसांना लक्ष्य करतात. मराठा आंदोलक



जरांगे फडणवीसांना लक्ष्य करतात. कॉंग्रेसदेखील फडणवीसांवर तोंडसुख घेत असते. याचा सरळसरळ अर्थ असा की, फडणवीसांच्या नावानं या सगळ्यांची टरकते. फडणवीसांची रणनीती, फडणवीसांची व्यूहरचना, निवडणूक तंत्र ज्याने दोन दोन वेळा राज्यसभा आणि विधानपरिषदेच्या निवडणुकांमध्ये यांना अस्मान दाखवले, सत्तेतून पायउतार करून आपल्या निवडणूक कौशल्याचे अनिल देशमुख, नवाब मलिकांना जागा दाखवली. सत्तेत नसताना, हातात यंत्रणा नसताना फडणवीसांनी यांची पळता भुई थोडी केली. यांच्या पक्षाची, यांची दाणादाण उडविली. त्यामुळे यांना केवळ फडणवीस खुपतात. आता काय नवं सोंगं समोर आणलं, अनिल देशमुखांना शपथपत्र लिहून देण्यास फडणवीसांनी सांगितलं म्हणे. मूर्खांचा बाजार भरलाय् मविआमध्ये. जेव्हा मागितलं तेव्हा ते शपथपत्र ठेवून घ्यायचे होते, उघड करायचे होते, फडणवीसांचं षडयंत्र उघडं पाडायचं होतं. यातलं देशमुखांनी काहीएक केलं नाही आणि आता छाती बडवताना दिसत आहेत. महत्त्वाचं म्हणजे, उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरेंना तुरुंगात डांबण्याचा डाव फडणवीसांनी रचला होता. होय रचला होता, पण नेमकं कोणत्या प्रकरणात जरा सविस्तरपणे जनतेला सांगा ना. काय म्हणून शपथपत्र करून मागत होते फडणवीस? याबाबत काही सांगताना देशमुख दिसत नाहीत. ठाकरेदेखील सांगत नाहीत. आदित्यचं एकदा आपणच समजून घेऊन दिशा सलियान प्रकरण अंगलट आलं आहे त्याच्या. पण उद्धव ठाकरेंविरोधात कोणत्या प्रकरणात अडकविण्यासाठी देशमुखांवर दबाव आणला जात होता? याचा खुलासा केला पाहिजे ना की निव्वळ खोटं नॅरेटिव्ह पसरवायचा प्रयत्न तर नाही ना. आजवर झोपलेले होते; आज अचानक जाग आल्याने प्रश्न पडतो.

मुळात तू राहशील, नाही तर मी, असे नाही, पण तू नाही राहशील, असं आव्हान काही लोकांनी यापूर्वी फडणवीसांना दिलं होतं. अनेक षडयंत्र करण्यात आले. फोन टॅपिंग प्रकरणात अडकविण्याचा डाव जो रचला गेला होता, एक छायाचित्र दाखवून ड्रग्स माफियासोबत संबंध असल्याचा प्रयत्न झाला; एवढंच नव्हे फडणवीस फसत नाहीत म्हणून, एका डिझायनर उच्चशिक्षित मुलीद्वारे त्यांच्या पत्नीला लाच देऊन फसविण्याचा प्रयत्न केला गेला. पण यांच्या कुठल्याही चक्रव्यूहात फडणवीस अडकले नाहीत किंवा षडयंत्राला बळी पडले नाहीत. हे त्यांचे कौशल्य आहे. मुलाबाळापर्यंत, घरापर्यंत येण्याची महाराष्ट्राची संस्कृती नव्हती. फडणवीसांमुळे वातावरण खराब झाल्याची टिमकी वाजविली जात आहे. नवाब मलिकांनी फडणवीसांच्या पत्नीचा फोटो भर पत्रकार परिषदेत दाखवून ड्रग्स माफियांसोबत संबंध असल्याचे सांगणे, डिझायनर उच्चशिक्षित मुलीद्वारे फसवणुकीच्या प्रकारावर मविआ नेत्यांनी उचकटलेल्या तोंडांना घरापर्यंत पोहोचणे नाही तर काय म्हणावे? आणि हे लोकं आज महाराष्ट्राच्या संस्कृती, घरादाराच्या टिमक्या वाजत आहेत, याचे आश्चर्य वाटते.

मुळात आव्हानं देणाऱ्यांनी आपली लायकी ओळखून आव्हानं द्यावीत. मुख्यमंत्रिपदावरून हकालपट्टी केल्यानंतर बापलेकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना कित्येक वेळा आव्हान दिले, राजीनामा द्या निवडणुकीला समोर जा, मी ठाण्यात येऊन लढतो नाहीतर तुम्ही वरळीतून लढा वगैरे वगैरे... लोकसभेची निवडणूक लागली आणि शिंदेंच्या पुत्राच्या विरोधात निवडणूक लढायला कोणी सापडत नव्हते तर नवख्या महिलेला बळीचा बकरा बनवले. जेव्हा खरोखर आव्हान पेलण्याची वेळ आली तेव्हा मैदान सोडून पळून जाणारे कोणत्या तोंडाने पुन्हा आव्हान देत असावेत, हे निर्लज्ज लोकं. आपली लायकी आणि पायरी सांभाळून बोललं पाहिजे, नाहीतर नादी लागणाऱ्यांना फडणवीसांनी "मेरी हिम्मत को परखने की गुस्ताखी मत करना, पहले ही कई फसानो का रुख मोड़ चुका हूँ मैं.." असा शायरीतून इशारा दिलाच आहे.

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### आंदोलनजीवी

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात सत्ताधारी आणि विरोधी पक्षात खडाजंगी सुरू आहे. विरोधी पक्ष नेता पहिल्या दिवसापासून प्रतिपंतप्रधान असण्याच्या आवेशात बोलताना सभापतीला अभय (?) देतो आणि शेतकरी आंदोलन करणाऱ्या नेत्यांना संसदेत निमंत्रित करून सभागृहाचे औचित्य भंग करतो. हिंदूंचा भर सभेत अपमान करून महाभारताचा अभ्यासक असल्याप्रमाणे चक्रव्यूह, अभिमन्यू, कमळ यावर काथ्याकूट करणे हे खासदार अनुराग ठाकूर (आयएएस) यांना सहन होत नाही आणि त्यावर खरे वास्तव सांगणे हा विरोधी पक्षनेता राहुल गांधी यांचा अपमान कसा काय झाला? कारण जातीय सर्वेक्षण करण्याचा विडा तर राहुल गांधी यांनीच उचललेला आहे! आजच्या वर्तमानपत्रात आंदोलनजीवींचे 'जोडे मारो' आंदोलन प्रसिद्धीस दिलेले आहे. परंतु ज्या खासदाराने भारतीय संसदेत दुसऱ्या देशाचा जयजयकार केला त्यावर यांनी ब्र काढू नये, हीच काय यांची देशभक्ती? यापुढील आंदोलने गृहयुद्धे ठरू नयेत याची काळजी आतापासूनच गृहमंत्रालय आणि प्रसिद्धी माध्यमांना घ्यावी लागेल. कारण ऊठसूट होणाऱ्या आंदोलनाला पोलिस विभागाची परवानगी आवश्यक असते.

**वि. ल. उईके**/८२७५५२८०१६

●● ●●

### सद्गुणांची वाढ आणि दुर्गुणांचे निवारण

आपल्याला मनुष्य जन्म प्राप्त झाला आहे त्याचा उद्देशच आपल्यात आदर्श व्यक्तिमत्त्व निर्माण करणे आणि त्याची जोपासना करणे आहे. आपल्यातील सद्गुण वाढीबरोबरच जे काही आपल्यात दुर्गुण असतील ते ओळखून त्यांना दूर करणे महत्त्वाचे असते. ज्याप्रमाणे शेतीच्या उत्तम मशागतीकरिता पिकांच्या आजूबाजूला वाढणारे तण, गवत काढून त्यांचा वेळीच बंदोबस्त करणे आवश्यक असते; अन्यथा पिकांकरिता टाकलेले खतपाणी त्यांनाच मिळून त्याचा पिकाच्या उत्पादनावर परिणाम होतो. त्याचप्रमाणे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यासाठी आपल्या दुर्गुणांचा समूळ उच्छेद करून आपल्यातील सद्गुणांची वाढ करणे आवश्यक असते. सद्गुणांबरोबर आपल्यात अनेक दुर्गुण असतात की जे आपल्या अंतर्मनात ठाम घर करून बसलेले असतात आणि त्याची आपल्याला जाणीवसुद्धा नसते किंवा एखाद्याने त्याची जाणीव करून दिली तरी ती त्वरित मान्य होत नाही. मत्सर, द्वेष आणि असूया हे दोष बहुतेक सर्वांमध्ये कमी-जास्त प्रमाणात आढळतात. त्यामुळेच न्यूनगंडाची भावना निर्माण होऊ शकते. एखाद्याकडे एखादी वस्तू आहे आणि आपल्याकडे नाही, त्याबद्दलची वाटणारी खंत याच्यातूनच तीव्रतेने मनात नकारात्मक भावना वाढून इतर गंभीर दोषांचे बीजारोपण व्हायला सुरुवात होते. त्यामुळे आपण न्यूनगंडात जाऊन आपले आयुष्य दुःखदायक होऊ शकते. त्या दुर्गुणांना/दोषांना वेळीच नियंत्रणात ठेवून त्यावर सकारात्मक दृष्टिकोनातून उपाययोजना केली तर आपले संपूर्ण जीवन सुखमय होऊ शकते. अमूक गोष्ट आपल्याकडे नाही याबद्दल अनावश्यक विचार करून स्वत:ला क्लेश करून घेण्यापेक्षा, जे नाही त्यामागे काहीतरी ईश्वरी संकेत आहे आणि जे काही आपल्या जीवनात घडतं ते आपल्या कल्याणाकरिताच आहे, असा आध्यात्मिक दृष्टिकोन ठेवून, मनाला तशा स्वयंसूचना दिल्या तर खऱ्या अर्थाने आपले जीवन आनंदमय होईल आणि सर्व दुर्गुणांचे निवारण विनासायास होण्यास सहाय्य होईल.

**श्रीकांत रामचंद्र पाध्ये**/८२७५८६५२८५

●● ●●

### पिण्याचे पाणी कोठून आणायचे?

मागील चार दिवसांपासून गोंदिया येथे नळाचा पाणी पुरवठा बंद आहे. जीवन प्राधिकरण विभाग रोज नुसती एक नोटीस टाकतो की, उद्या सकाळी ६ ते संध्याकाळी ६ पर्यंत पाणी पुरवठा होणार नाही. एवढे करून त्यांचे कर्तव्य ते इमानेइतबारे पार पाडत आहेत. पण नागरिकांना काय त्रास होतो आहे, याची कल्पना या विभागाला आहे का? वापरायला पाणी लोकांजवळ आहे, पण प्यायचे पाणी कोठून आणायचे? बरे; आमचे लोकप्रतिनिधी इतके ढिम्म आहेत की, त्यांना या समस्येशी काही सोयरसुतक नाही. तसेही त्यांना प्यायला 'बिसलेरी' आधार आहे. मरण बिचारे मध्यमवर्गीयांचे होते. आता प्यायचे पाणी नळाला कधी येते, याची वाट पाहण्याव्यतिरिक्त दुसरा मार्गच दिसत नाही.

**प्रमोद वाडी**/९५६१७०११७२

●● ●●

### राजकारणच का?

कुठलेही वर्तमानपत्र घ्या की चॅनेल बघा; फक्त राजकीय बातम्याच दिसतात. अर्थात याला सन्माननीय अपवाद वेगळा. अतिरेक इतका असतो की, त्यात दुसऱ्या क्षेत्रांना वावच नसतो. अर्थात याला पण अपवाद वेगळा. साहित्यिक-सांस्कृतिक-कलाविषयक क्षेत्रांना कधी झुकते माप मिळताना दिसत नाही. अर्थात याला पण अपवाद वेगळा. राजकारणाशिवाय जणू दुसरे विषय नाहीत, अशा पद्धतीने राजकीय दळण दळले जात असते. खरं म्हणजे समाजातील सारी क्षेत्रे एकमेकांना पूरक असतात. त्यामुळे माध्यमातून त्याचा ऊहापोह व्हायला हवा. तसा तो थोडाबहुत होतो. पण तितके पुरेसे नाही ना. संबंधित आत्मपरीक्षण करतील का?

**आशिष देव**/चंद्रपूर

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● निवासी संपादक : **प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Resident Editor Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# जलतरण तलावाचा निर्णय आज तरी होणार का?

## पालकमंत्र्यांच्या भूमिकेकडे लक्ष; दोन कोटींची वास्तू गेल्या दोन वर्षापासून बंदच...!

**अजितकुमार संगवे । तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**

गेल्या चार वर्षांपासून महापालिकेच्या ताब्यात असलेला विजापूर रस्त्यावरील सुंदरमनगर येथील शासकीय जलतरण तलाव पाण्याची गळती मोठ्या प्रमाणात असल्यामुळे दोन वर्षापासून बंद आहे. दुरुस्तीचा खर्च कोण करायचा? क्रीडा कार्यालय की महापालिका या टोलवाटोलवीत नागरिकांची गैरसोय सुरु आहे. याचा निर्णय पालकमंत्री चंद्रकात पाटील यांच्या उपस्थितीत गेल्या १९ जून रोजी होणार होता. परंतु पालिका आयुक्त शीतल तेली-उगले हे अनुपस्थित असल्याने याचा निर्णय झाला नाही.



जिल्हा क्रीडा संकुल समितीची बैठक गेल्या १९ जून रोजी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली होती. तेव्हा मनपा आयुक्तांचा पदभार जिल्हाधिकारी यांच्याकडे होता. वास्तविक त्यांच्या अधिकारात हा विषय मार्गी लागू शकला असता पण तो अनिर्णितच राहिला. परंतु हा तलाव पालिकेला दुरुस्त करून द्यावाच लागेल, अश्या सूचना बैठकीत पालकमंत्री पाटील यांनी दिल्या होत्या. आता शनिवारी (दि.३) होणाऱ्या बैठकीत तरी याचा निर्णय होईल, अशी अपेक्षा जुळे सोलापूरकरांची आहे.

### नेहरूनगर मैदानाच्या विकासाकडे दुर्लक्ष

शासकीय क्रीडांगण नेहरूनगर हे जुळे सोलापुरातील एकमेव मैदान. जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी या मैदानाच्या विकासाकडे पूर्ण दुर्लक्ष केले आहे. अंतर्गत व्यायामशाळेत साहित्य आहे. परंतु व्यायामशाळा बंद करून ठेवली आहे. ४०० मीटर ट्रॅक, जॉगिंग ट्रॅक, लांब उडी, खो-खो व कबड्डी मैदाने उध्वस्त झाली आहेत. मैदानावरील विद्युत व्यवस्था सारखी बंद असते. मैदानावरील स्वच्छतागृहाकडे साफ दुर्लक्ष केले जाते. स्वच्छतागृह व ड्रेनेजच्या दुर्गंधीने फिरायला येणारे नागरिक त्रस्त आहेत. मैदानाची देखरेख करण्यासाठी २४ तास वॉचमन नाही. मैदानासमोरील रस्ता लाकूड व्यवसायिकांनी अतिक्रमण केला आहे. स्पर्धेसाठी मैदान शुल्क घेतले जाते. परंतु मैदानाच्या विकासाकडे साफ दुर्लक्ष केले होते. कृपया याची चौकशी करावी.

**- सुहास साळुंके, अध्यक्ष न्यू जॉगर्स फाउंडेशन नेहरूनगर शासकीय मैदान**

### दादा, जलतरण तलाव त्वरीत सुरु करा

प्रिय दादा. चालणे, फिरणे, खेळणे, पोहणे, व्यायाम, प्राणायाम, योगा, ध्यान या लोकांच्या नैसर्गिक गरजा पूर्ण करून त्यांचे जीवनमान सशक्त, आनंदी करणे हे लोककल्याणकारी राज्यातील शासनाचे कर्तव्यच आहे असे आम्हास वाटते. कृपया आपण सोलापूरचे पालक या नात्याने आपुलकीने लक्ष घालून या प्रश्नी जबाबदार प्रशासन/अधिकारी यांच्यावर कडक कारवाईचे आदेश द्यावेत. बंद पडलेला जलतरण तलाव आणि समस्याग्रस्त क्रीडांगण सर्व सोयी सुविधांनी युक्त करून त्वरित लोकार्पण करण्याचे आदेश व्हावे हीच आग्रही विनंती.

**- ॲड. मनीष गडदे, सोलापूर**

## संक्षिप्त वृत्त

### विवाहितेचा छळ; पतीसह सहा जणांविरुद्ध गुन्हा

**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**

विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी पतीसह सहा जणांविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. याबाबत अधिक माहिती अशी की,लग्नात मानपान केला नाही,घर घेण्यासाठी दोन लाख रुपये घेऊन ये असे म्हणत विवाहीतेला शिवीगाळ दमदाटी करून मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना १२ सप्टेंबर २०२३ ते फेब्रुवारी २०२४ पर्यंत फिर्यादी यांच्या सासरी घडली.याप्रकरणी रईसा इम्रान पठाण (वय-४२,रा.कुर्बान हुसेन नगर,गुरुनानक चौक) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.त्यांच्या फिर्यादीवरून पती इम्रान पठाण, शमीम पठाण,दीर फिरोज पठाण,इरफान पठाण,मोसिन पठाण,जाऊ शबाना पठाण,जरीना पठाण (सर्व रा.कुर्बान हुसेन नगर,गुरुनानक चौक) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेच्या पुढील तपास पोहेकॉ.ईनामदार करीत आहेत.

### घराचे कुलूप तोडून चोरट्याने दोन तोळे सोने पळवले

**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**

अज्ञात चोरट्याने मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश करून लोखंडी कपाटातील दोन तोळे वजनाचे सोन्याचे लक्ष्मीहार,अर्धातोळे वजनाचे सोन्याचे मोरणी, साड्या व रोख रक्कम असा ९६ हजार ३०० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना १ ऑगस्ट रोजी दुपारी बारा ते दोन वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी ओंकार सुशील मेटे (वय-२८,रा.शिवशंभू हॉटेल समोर) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला.या घटनेचा पुढील तपास चंगरपल्लू हे करीत आहेत.

### तरुणास चौघांनी केली लाथाबुक्क्यांनी मारहाण

**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**

तरुणास चौघांनी लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी व फिर्यादीचे मित्र स्वप्नील सोनवणे हे सम्राट चौक येथे बोलत थांबले असताना चौघांनी फिर्यादीजवळ येऊन फिर्यादीचे वडिलांना आमच्या विषयी काय पण सांगतो का असे म्हणत शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.तसेच एकाने हातातील कड्याच्या साह्याने ओठावर व डोक्यात मारून जखमी केल्याची घटना दि.३१ जुलै रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी धम्मपाल सुग्रीव जेठीथोर (वय-२८,रा.सम्राट चौक,आंबेडकर नगर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.त्यांच्या फिर्यादीवरून जितेश मैंदर्गीकर, मंथन मैंदर्गीकर व दोन अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोहेकॉ.शेख करीत आहेत.

### सिगारेट मागण्याच्या कारणावरून मारहाण; रिक्षा चालकासह चार साथीदारांवर गुन्हा

**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**

कुमठा नाका येथील म्हेत्रे वस्ती येथे संगम पान शॉप येथे सिगारेट मागण्याच्या कारणावरून एक अनोळखी रिक्षाचालक व त्याच्या सोबतच्या चार अनोळखी साथीदार असे मिळून सर्वांनी फिर्यादी संतोष मल्लिनाथ हेळवे (वय-२७,रा.हुच्चेशवर नगर भाग ३) यांचे मालक उदयसिंग बडूरवाले यांना शिवीगाळ करत हाताने मारहाण करून मारहाण केली.तसेच एका अनोळखी इसमाने रस्त्यावर पडलेले वीट हातात घेऊन उदयसिंग यांच्या डोक्यात मारून जखमी केले आहे.असे फिर्यादीत नमुद आहे.ही घटना ३१ जुलै रोजी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी संतोष हेळवे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून एक अनोळखी रिक्षाचालक व त्याचे चार साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सोळुंके हे करीत आहे.

### ममदाबाद खून प्रकरणातील एकास मुंबई उच्च न्यायालयातून जामीन मंजूर

**सोलापूर, दि. २ ऑगस्ट -**

विश्वनाथ बसन्ना पाटील याचा खून केल्याप्रकरणी मसन्ना धोंडीबा गायकवाड (रा. ममदापुर, ता. अक्कलकोट) यास मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माधव जामदार यांनी जामीन मंजूर केला. दि. १२ जून २०20 रोजी विश्वनाथ बसन्ना पाटील व त्याचे तीन मित्र हे त्याचे शेतात जेवण करीत बसले होते, जेवण करून झाल्यानंतर ते सर्वजण स्विफ्ट गाडीमध्ये बसून गावात निघाले होते. गावातील मुख्य रस्त्यावरून चंद्रकांत गायकवाड यांच्या घरासमोर आले असता चंद्रकांत हा रस्त्यावर म्हशीचे दूध काढत होता, त्यास म्हैस बाजूला घेऊन दूध काढ असे म्हणाले असता तो शिवीगाळ करू लागला. त्यावेळेस विश्वनाथ पाटील व सिद्धाराम पाटील हे खाली उतरले तू आम्हाला शिवीगाळ का करतोस असे म्हणाल्यावर त्याने धोंडीबा गायकवाड, बसन्ना गायकवाड, अंबादास कोळी, लिंगप्पा कोळी, सूर्यकांत कोळी व इतर यांना बोलावून घेऊन विश्वनाथ यास मारहाण सुरू केली. कुऱ्हाडीने, तलवारीने मारून जखमी केले, तसेच सिद्धाराम व इतरांनाही मारहाण करून जखमी केले व गाडीवर दगडे टाकून गाडीचे नुकसान केले. उपचारादरम्यान विश्वनाथ हा मयत झाला. म्हणून सिद्धाराम हनुमंत पाटील याने अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल झाला. त्यावर जामीन मिळावा म्हणून मसन्ना याने सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालय येथे जामीन अर्ज दाखल केला होता, तो अर्ज न्यायालयाने फेटाळला होता. त्यावर मसन्ना याने मुंबई उच्च न्यायालयात जामीन मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता. या अर्जाच्या सुनावणीच्या वेळेस आरोपीच्या वकिलांनी मांडलेला युक्तीवाद ग्राह्य धरून न्यायमूर्तींनी २५ हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर आरोपीस जामीन मंजूर केला. यात सरकारतर्फे ॲड सविता यादव यांनी तर अर्जदार आरोपीतर्फे ॲड. रितेश थोबडे यांनी काम पाहिले.

### इंदिराबाई कुलकर्णी यांचे निधन

**सोलापूर, दि. २ ऑगस्ट -**



आसरा चौक मंत्रीचंडक विहार येथील रहिवासी गं.भा. इंदिराबाई विश्वंभर कुलकर्णी (वय ९०) यांचे शुक्रवारी २ ऑगस्ट रोजी दुपारी २.३० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर मोदी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात ६ मुले, ६ सूना, दोन मुली, जावई नातवंडे असा परिवार आहे. ॲड. शशी कुलकर्णी यांच्या त्या मातोश्री होत.

## पोलीस असल्याचे सांगत ४ लाखाचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**

मी साध्या वेशातील पोलीस आहे.आत्ताच येथे शुक्ला यांची चैन काढून घेतली आहे.म्हणून साहेबांनी मला या ठिकाणी ड्युटीवर पाठवले आहे. तुम्ही ही तुमचे सोने काढून पर्समध्ये ठेवा असे सांगून हातचलाकी करत महिलेचे चार लाखाचे दागिने घेऊन पोबारा केला.हि घटना दि.३० जुलै २०२४ रोजी सव्वा पाच वाजण्याच्या सुमारास संतोषी माता मंदिर जवळील एलआयसी ऑफिसच्या बोळात शिवगंगा नगर जुळे सोलापूर येथे घडली. या घटनेची हकीकत अशी की,अनुप्रिया चारुदत्त तुळजापूरकर (वय-६५,रा.जुने संतोष नगर,सोलापूर) या भजनाच्या क्लासला एकट्या जात असताना एलआयसी ऑफिसच्या बोळात एका अनोळखी इसमाने त्यांना थांबवून मी साध्या वेशातील पोलीस आहे.तुमच्या हातातील सोन्याच्या बांगड्या काढून त्या पर्समध्ये ठेवा.मी काही तुमचे सोने काढून घेत नाही असे सांगितले.त्यानंतर त्या इसमाने एक कागद काढून फिर्यादी समोर धरला.त्यानंतर फिर्यादीने सोन्याच्या चार बांगड्या काढून त्या कागदामध्ये ठेवल्या व तो स्वतः कागदामध्ये गुंडाळून फिर्यादीच्या कापडी पर्शमध्ये ठेवून चैन लावून दिली.त्यानंतर फिर्यादीने पर्स चेक केल्यानंतर कागदात त्यांना दोन स्टीलचे कडे व एक दगड दिसून आला.अज्ञात इसमाने आपला विश्वासघात करून आपली फसवणूक केली आहे.या आशयाची फिर्याद विजापूर नाका पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गायकवाड हे करीत आहेत.

## सराफ दुकानातील दागिने चोरणाऱ्या कामगारास अटक

### ३ लाख ८४ हजारांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ ऑगस्ट -**



सराफ दुकानात काम करताना ३ लाख ८४ हजारांचे सोन्याचे दागिने चोरणाऱ्या कामगारास जोडभावी पेठ पोलिसांनी अटक करून त्याच्याकडून चोरीस गेलेला संपूर्ण ऐवज जप्त केला.

विजय बालाजी कोंडा (वय ३४, रा. लक्ष्मी नरसिंह झोपडपट्टी, अशोक चौक, सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्या कामगाराचे नाव आहे. याबाबत सुप्रिया संगमेश्वर स्वंत (वय ३५, रा. भवानी पेठ, सिध्देश्वर हौसींग सोसायटी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुप्रिया स्वंत याचे सराफ बाजारात वारद बोळ येथे गुरु महाराज संगमेश्वर ज्वेलर्स नावाचे सोन्या-चांदीचे दागिने विक्रीचे दुकान आहे. या दुकानात विजय कोंडा हा कामगार म्हणून काम करीत होता. १६ जुलै रोजी विजय कोंडा याने दुकानातील कपाटामधून सोन्याचे गंठण, नेकलेस, कानातील रिंगा असा ३ लाख ८४ हजार रुपये किंमीचे ५.३ तोळ्याचे दागिने चोरून नेले.

याबाबत सुप्रिया स्वंत यांच्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर पोलिसांनी या गुन्ह्याचा तपास करताना विजय कोंडा यास कन्ना चौकातील नागेश चहा कॅन्टीनजवळ चोरीचे दागिने विकण्यासाठी आल्यानंतर ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केली असता तो विक्रिसाठी आलेला दागिने हे स्वंत यांच्या दुकानातून चोरलेले असल्याचे निष्पन्न झाल्याने पोलिसांनी त्यास अटक करून चोरीस गेलेले सर्व सोन्याचे दागिने जप्त केले.

ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त विजय कबाडे, सहायक आयुक्त अशोक तोरडमल, वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुहास चव्हाण, शबनम शेख यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीद्वक पडसळकर, हवालदार खाजप्पा आरेनवरू, शितल शिवशवरण, विठ्ठल पैकेकरी, बसवराज स्वामी, स्वप्नील कसगाडे, दादासाहेब सरवदे, निलेश घोगरे, अभिजित पवार, दत्ता काटे, सायबर पोलिस ठाण्याकडील प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड यांनी केली.

## हॉटेलात चोरी करून इतर ठिकाणी चोरी करण्याचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**

सम्राट चौकातील एका नामांकित हॉटेलमध्ये प्रवेश करून रोख रकमेचा शोध घेऊन फ्रिज मधून तीन बियर चोरी करून इतर ठिकाणी चोरी करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी एका जणाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना १ ऑगस्ट रोजी घडली.या प्रकरणी अनिकेत मडोरय्या हिरेमठ (वय-२९,रा.मंत्री चंडक, विजापूर रोड) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार राहुल सुज्ञान बोराडे (रा.प्रभाकर वस्ती सम्राट चौक) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की,राहुल बोराडे याने हॉटेलच्या बाहेरील रंगकाम करण्यासाठी लावलेल्या पत्र्यावरून बाजूस चोरी करण्याच्या उद्देशाने उघड्या रेस्टॉरंटमध्ये प्रवेश करून ड्रॉवर व इतर ठिकाणी रोख रकमेचा शोध घेऊन फ्रिज मधून तीन बियर चोरी केले व त्यानंतर इतर ठिकाणी चोरी करण्याचा प्रयत्न केला व ग्राहकाच्या टाटा सफारी या चार चाकी वाहनावर पडल्याने दरवाज्याचे नुकसान केले आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल कटारे हे करीत आहे.

## हरिभाई देवकरणमध्ये मुंशी प्रेमचंद जयंती साजरी

**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**

मुंशी प्रेमचंद यांनी आपल्या लेखणीतून सर्वसामान्य नागरीक व शोषितांना बळ दिले असून त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत प्रत्यक्ष-परोक्ष योगदान दिले आहे. त्यांचा स्त्री सन्मान, शेतकऱ्यांना दिलेला आधार, समरसता पर विचार, साहित्यिक वास्तविक चित्रण विद्यार्थ्यांनी कधीही विसरू नये, असा संदेश ह.दे. कनिष्ठ महाविद्यालयात मुंशी प्रेमचंद यांच्या जयंती निमित्त प्रा. रवींद्र काळे यांनी दिला. प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी मुंशी प्रेमचंद यांच्या व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकला. ज्येष्ठ पर्यवेक्षक कुंभार एस. एस. यांनी प्रेमचंद यांच्या साहित्यिक प्रवासावर प्रकाश टाकला. यावेळी हर्षवर्धनसिंह पवार यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रतिभा वलेकर हिने केले तर दिपाली माने हिने आभार प्रदर्शन केले.



## सराईत गुन्हेगार नागेश महानूर दुसऱ्यांदा येरवडा कारागृहात स्थानबध्द

### शहर पोलिसांची चालू वर्षातील १५वी कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ ऑगस्ट -**



घातक शस्त्रानिशी खंडणी मागणून जबरी चोरी करणारा सराईत गुन्हेगार सुरज उर्फ नागेश महानूर यास पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी दुसऱ्यांदा एमपीडीए कायद्यान्वये येरवडा कारागृहात स्थानबध्द करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार फौजदार चावडी पोलिसांचे एक पथक महानूर यास घेऊन येरवडा कारागृहाकडे रवाना झाले आहे.

सुरज उर्फ नागेश शिवाजी महानूर (वय ३३, रा. सळई मारूती जवळ, उत्तर कसबा, सोलापूर) असे स्थानबध्द करण्यात आलेल्या सराईत गुन्हेगाराचे नाव आहे. महानूर याच्याविरुध्द मागील काही वर्षापासून घातक शस्त्राचा वापर करून जबरी चोरी करणे, खंडणी मागणे, दुखापत करणे, दगडफेक करणे यासारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. महानूर व त्याच्या साथीदारांविरुध्द ४ गुन्हे दाखल आहेत. त्याच्या गुन्हेगारी कृत्यामुळ शहरातील नागरीकांच्या दैनंदिन जीवनात त्रास होऊन व्यापाऱ्यांमध्ये दहशत पसरली आहे. सुरज महानूर यास त्याच्या गुन्हेगारी कारवायापासून परावृत्त करण्यासाठी सन २०१३, २०१४ प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. महानूर यास त्याच्या गुन्हेगारी कृत्यासाठी सन २०१७ मध्ये एमपीडीए कायद्यान्वये स्थानबध्द करण्यात आले होते. त्यानंतरही सुरज महानूर याच्या गुन्हेगारी वर्तणात कोणताही बदल झाला नाही. त्याच्या गुन्हेगारी कारवाया सुरुच होत्या. त्यामुळे फौजदार चावडी पोलिसांनी महानूर यास एमपीडीए कायद्यान्वये पुन्हा एकदा स्थानबध्द करण्याबाबतचा प्रस्ताव पोलिस आयुक्तांकडे पाठविला होता. त्यास पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी मंजूरी देत महानूर यास येरवडा कारागृहात स्थानबध्द करण्याचे आदेश दिले.

ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त डॉ. दिपाली काळे, विजय कबाडे, सहायक आयुक्त राजन माने, अशोक तोरडमल, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे, फौजदार चावडी पोलिस ठाण्याचे निरीक्षक दिलीप शिंदे, पोलिस उपनिरीक्षक विशेद्रसिंग बायस, अंमलदार विनायक संगमवार, सुदीप शिंदे, अक्षय जाधव, विशाल नवले यांनी केली.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सूचना**

वरिष्ठ विभागीय कमर्शियल मॅनेजर, सोलापूर विभाग, सेंट्रल रेल्वे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने कुर्डुवाडी, पंढरपूर, बार्शी टाउन, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, कलबुर्गी येथे यात्री तिकीट सुविधा केंद्राच्या संचालनासाठी अर्ज आमंत्रित करतात. शहाबाद, वाडी, गंगापूर रोड, माढा, मोहोळ, दुधनी, अक्कलकोट रोड, भिगवण, जेऊर, सांगोला आणि मोडलिंब. वेबसाइटवर **(http://www.cr.indianrailways.gov.in)** तपशील उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी Sr.DCM कार्यालय सोलापूर 413001 वर संपर्क साधा. अर्ज करण्याची अंतिम तारीख 30 ऑगस्ट 2024, 15.00 वाजेपर्यंत आहे.

**सूचना क्रमांक-SUR/C/COG/YTSK/जुलै/2024**
**सीनियर डीसीएम, सोलापूर**

तिकिटांसाठी UTS ॲप डाउनलोड करा SLP-29

KATARE SPINNING MILLS LIMITED

REGD. OFFICE: 14/30 GROUND FLOOR, B WING,
KATARE COMPLEX, GANDHINAGAR,
BL. NO. 10 Solapur MH- 413006.
CIN: L17119PN1980PLC022962
Email: katarespinningmills@gmail.com

**NOTICE**

In pursuant to Regulation 29 read with Regulation 33 and other applicable regulations of Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, Notice is hereby given that a meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on Friday, 09thAugust, 2024 at 03.00 P.M. at the registered office of the Company to, inter alia, consider and approve the un-audited financial results of the Company for the quarter ended on June 30, 2024.

A copy of this notice is also posted on the website of the Company www.katarespinningmillslimited.comand also on the website of the stock exchange at www.bseindia.com.

FOR KATARE SPINNING MILLS LIMITED

Place: Solapur
Date: 02.08.2024

SD/-
**KISHORE KATARE**
MANAGING DIRECTOR
(DIN- 00645013)

**सावधानतेची जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः सोलापूर येथील लोकांना या सावधानतेच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन :**

A) जिल्हा सोलापूर, ता. उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर नागरी समुहात समाविष्ट झालेली मिळकत याचा जुना सर्व्हे नं. ३३०/२ व नवीन सर्व्हे नं. ११३/२/१ब/१ याचे क्षेत्र ९ हेक्टर २०.६०.१ आर याचा आकार रु. १६.६५ पैसे ही मिळकत त्यातील तदंग्भुत वस्तुसह.

B) जिल्हा सोलापूर, ता. उत्तर सोलापूर पैकी मजरेवाडी हद्दीतील नागरी समुहात समाविष्ट झालेली मिळकत याचा जुना सर्व्हे नं. ३३०/२ व नवीन सर्व्हे नं. ११३/२/१ब/१ पैकी प्लॉट नं. २८० व २८१ याचे क्षेत्र १६३०० चौ.मी. याचा आकार रु. १२२२५/ ही मिळकत त्यातील तदंगभुत वस्तुसह.

C) जिल्हा सोलापूर तालुका दक्षिण सोलापूर पैकी घोडातांडा मौजे हत्तुर येथील शेतजमीन याचा जुना सर्व्हे नं. २२८ व नवीन सर्व्हे नं. ११ याचे एकूण क्षेत्र १७ हेक्टर ४४ आर याचा आकार रु. १९.३५ पै. ही संपूर्ण शेतजमीन त्यातील तदंगभुत वस्तुसह,

D) जिल्हा सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर लष्कर उत्तर सदर बझार पेठ येथील घरजागा याचा सिटी सर्व्हे नं. ३९८८ याचे क्षेत्र २०.३ चौ.मी. ही संपूर्ण घरजागा यातील तदंगभुत वस्तुसह,

E) जिल्हा सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर लष्कर उत्तर सदर बझार पेठ येथील घरजागा याचा सिटी सर्व्हे नं. ६६१० याचे क्षेत्र ३३.४५ चौ.मी. ही संपूर्ण घरजागा यातील तदंगभूत वस्तुसह,

F) जिल्हा सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर लष्कर उत्तर सदर बझार पेठ येथील घरजागा याचा सिटी सर्व्हे नं. २००९ याचे क्षेत्र ५६८.७ चौ.मी. ही संपुर्ण घरजागा यातील तदंगभूत वस्तुसह,

G) जिल्हा सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर लष्कर उत्तर सदर बझार पेठ येथील घरजागा याचा सिटी सर्व्हे नं. ३९९० याचे क्षेत्र १८४ चौ.मी. ही संपूर्ण घरजागा यातील तदंगभुत वस्तुसह,

H) जिल्हा सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर लष्कर उत्तर सदर बझार पेठ येथील घरजागा याचा सिटी सर्व्हे नं. ३९८९ याचे क्षेत्र १८ चौ.मी. ही संपूर्ण घरजागा यातील तदंगभुत वस्तुसह,

I) जिल्हा सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर लष्कर उत्तर सदर बझार पेठ येथील घरजागा याचा सिटी सर्व्हे नं. ६६०८ याचे क्षेत्र ५१ चौ.मी. ही संपूर्ण घरजागा तदंगभुत वस्तुसह,

J) जिल्हा सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर लष्कर उत्तर सदर बझार पेठ येथील घरजागा याचा सिटी सर्व्हे नं. ६६११ याचे क्षेत्र २८.४ चौ.मी. ही संपूर्ण घरजागा यातील तदंगभुत वस्तुसह,

K) जिल्हा सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर लष्कर उत्तर सदर बझार पेठ येथील घरजागा याचा सिटी सर्व्हे नं. ३९९४ याचे क्षेत्र ४३.१ चौ.मी. ही संपूर्ण घरजागा यातील तदंगभूत वस्तुसह,

L) जिल्हा सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर लष्कर उत्तर सदर बझार पेठ येथील घरजागा यावा सिटी सर्व्हे नं. ३९९२ याचे क्षेत्र २२ चौ.मी. ही संपूर्ण घरजागा यातील तदंगभूत वस्तुसह,

M) जिल्हा सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर लष्कर उत्तर सदर बझार पेठ येथील घरजागा याचा सिटी सर्व्हे नं. ३९९१ याचे क्षेत्र १८.८ चौ.मी. ही संपूर्ण घरजागा यातील तदंगभूत वस्तुसह,

N) जिल्हा सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर लष्कर उत्तर सदर बझार पेठ येथील घरजागा याचा सिटी सर्व्हे नं. ३९८६ याचे क्षेत्र १४.२ चौ.मी. ही संपूर्ण घरजागा यातील तदंगभूत वस्तुसह, असे असून येणेप्रमाणे नमूद जमिनी वहिवाटीच्या हक्कासह या मिळकतीचे वारसा हक्काने आलेले वारसदार व मालक वहिवाटदार १. शामसुंदर मोहनदास मेहता, २. विजयकुमार मोहनदास मेहता, ३. जयश्री मोहनदास मेहता, सर्व रा. १७, माजी सैनिक नगर, विजापूर रोड, सोलापूर यांनी आमचे अशिल श्री. नागनाथ धोंडीबा शिंदे, १५, रविवार पेठ, सोलापूर (मो.नं. ८६९८९९९७७७) यांना दि. २२/०७/२०२४ रोजी नोटरी दस्त क्र. १४६३ प्रमाणे कुलमुखत्यारपत्र दिलेले आहे. ते कुलमुखत्यारपत्र वरील प्रॉपर्टीच्या संदर्भात दिलेले असून, त्या प्रॉपर्टी संदर्भात सोलापूर येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात स्पे.मु.नं. ३०५/२०१७ व जिल्हा न्यायालयात सि.अपिल नं. ३३९/२०१३ प्रमाणे दावे प्रलंबित आहेत. त्या दाव्यातील स्वतः हजर राहुन कामकाज पाहणेसाठी तसेच वरील वर्णनाच्या मिळकतीचे खरेदी-विक्री देवाण-घेवाण करण्याचे अधिकार आमचे अशिलास कुलमुखत्यारपत्राद्वारे दिलेले आहेत. तसेच सदर दाव्यातील दादी परस्पर विक्री करण्याव्या बेतात आहेत. तसे झाल्यास दाव्यातील गुंतागुंत वाढणारी असून, यातील कुलमुखत्यारधारक यांना अडचणी निर्माण होणार आहेत. व त्याबाबत दिवाणी व फौजदारी स्वरुपाचे दावे दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून आमचे अशिल कुलमुखत्यारधारक यांचेशिवाय वर वर्णनाच्या मिळकतीचा व्यवहार करु नये. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही सावधानतेची जाहीर नोटीस प्रसिध्द केली. याऊपरही कोणी व्यवहार केल्यास ते आमचे अशिलावर व त्यांचे कायदेशीर हक्कावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली दि. ०२/०८/२०२४.

**सही/-**
**श्री. बी.आर. पवार**
**ॲडव्होकेट, बी.ए. ऑनर्स, एलएल.बी.**
**मो.नं. ९८६०८०४५२०**
**पत्ता- प्लॉट नं. ७९, सि.स.नं. ५२२/२/३/४, वसंत विहार, जुना पुणे नाका, सोलापूर**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**




सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/
सोलापूर : शनिवार, ३ ऑगस्ट २०२४ ६
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## महत्त्वाचे

### पॅरिस ऑलिम्पिक मध्ये आज भारताचे सामने

दुपारी १२.३०- गोल्फ- पुरुषांच्या वैयक्तिक स्ट्रोक प्ले फेरी ३ (शुभंकर शर्मा, गगनजीत भुल्लर)

दुपारी १२.३०- नेमबाजी- महिलांची स्कीट - पात्रता फेरी-१ (रायझा ढिल्लॉन, माहेश्वरी चौहान)

दुपारी १२.३० वा.- नेमबाजी- पुरुषांची स्कीट पात्रता फेरी (अनंत जितसिंग नारुका)

दुपारी १.०० वा.- नेमबाजी- महिलांची २५ मीटर पिस्तूल अंतिम फेरी (मनू भाकर)

दुपारी १.५२ वा.- तिरंदाजी : महिलांची वैयक्तिक उपांत्यपूर्व फेरी ( भजन कौर वि. मिचेली क्रोप्पेन, जर्मनी)

दुपारी २.३० वा.- (दीपिका कुमारी वि. दियानंदा चोरुनिसा)

दुपारी ३.४५ वाजतापासून- सेलिंग, पुरुषांची डिंगी रेस ५ व ६ (विष्णू सर्वानन)

सायंकाळी ४.५६ वा.- तिरंदाजी- महिलांची वैयक्तिक उपांत्यपूर्व फेरी (पात्रतेच्या अधीन) (भजन कौर, दीपिका कुमारी)

सायं. ६.०० वा.- तिरंदाजी : कांस्यपदकासाठी (पात्रतेच्या अधीन) (दीपिका कुमारी किंवा भजन कौर)

सायं. ६.१६ वा.- तिरंदाजी महिला वैयक्तिक सुवर्ण पदकासाठी सामना (पात्रतेच्या अधीन) दीपिका कुमारी किंवा भजन कौर)सायं. ७.०५ वा. - सेलिंग - महिलांची डिंगी रेस ५ व ६ (नेत्रा कुमानन) रात्री ११.०५ वा.- ॲथ्लेटिक्स- पुरुषांची गोळाफेक अंतिम फेरी (पात्रतेच्या अधीन) तजिंदरपाल सिंग तूर रात्री १२.१८ वा.- मुष्टियुद्ध- पुरुषांच्या ७१ किलोच्या उपांत्यपूर्व लढत (निशांत डेव्ह वि. मार्को अलोन्सो वर्डे अल्वारेझ (मेक्सिको)

**(स्पोर्ट्स १८ वर थेट प्रसारण)**

# मनू भाकर २५ मीटर पिस्तूल अंतिम फेरीसाठी पात्र



**पॅरिस, २ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या २५ मीटर पिस्तूल नेमबाजी स्पर्धेत पात्रता फेरीत भारताच्या युवा नेमबाज मनू भाकरने दुसरे स्थान मिळवत स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे.

मनूने पात्रता फेरीत अव्वल स्थानावर असलेल्या हंगेरीच्या व्हेरोनिका मेजर हिच्यानंतर दुसरे स्थान मिळविले. मनूने ५९० गुणांची नोंद केली, तर व्हेरोनिकाने ५९२ गुणांची नोंद करत ऑलिम्पिक विक्रमाशी बरोबरी केली. मनूने प्रीसिजन व रॅपिडमध्ये अनुक्रमे २९४ आणि २९६ गुणांची नोंद केली.

अन्य भारतीय नेमबाज ईशा सिंग अव्वल ८ मध्ये स्थान मिळविण्यात अपयशी ठरली. तिने एकूण ५८१ गुणांची नोंद केली. तिने प्रीसिजनमध्ये २९१, तर रॅपिडमध्ये २९० गुण नोंदवले. ती अंतिम फेरी गाठू शकली नाही.

आता २२ वर्षीय मनू भाकर ऑलिम्पिकच्या एकाच आवृत्तीत तीन पदके मिळविणारी पहिली भारतीय होण्याचा इतिहास घडविण्याच्या उंबरठ्यावर आहे. तिने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल वैयक्तिक प्रकारात कांस्यपदकासह पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आपली मोहीम सुरू केली. १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक स्पर्धेत तिने सरबज्योत सिंगच्या साथीने आणखी एक कांस्यपदक मिळविले. २५ मीटर पिस्तूल महिलांची अंतिम फेरी शनिवारी दुपारी १ वाजतापासून प्रारंभ होईल. (वृत्तसंस्था)

# भारताचा ऑस्ट्रेलियावर ३-२ ने विजय

**१९७२ नंतर प्रथमच ऑस्ट्रेलियाला नमवले**



भारताचा गोलरक्षक पी. आर. श्रीजेशला (मध्यभागी) हुलकावणी देत गोल नोंदविण्याचा प्रयत्न करताना ऑस्ट्रेलियाचा फ्लिन ओगिलवी

**पॅरिस, २ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये शुक्रवारी झालेल्या पुरुषांच्या हॉकी स्पर्धेत ब गटातील आपल्या अखेरच्या साखळी सामन्यात भारताने जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर असलेल्या ऑस्ट्रेलियावर ३-२ अशा गोलफरकाने विजय नोंदविला. १९७२ नंतर भारताचा हा ऑस्ट्रेलियाविरुद्धचा ऑलिम्पिक स्पर्धेतील पहिलाच विजय ठरला.

२०२० टोकियो ऑलिम्पिकचे रौप्यपदक जिंकणाऱ्या ऑस्ट्रेलियाला १९७२ म्युनिक ऑलिम्पिकमध्ये भारताने पराभूत केले होते.

हरमनप्रीत सिंगने नोंदविलेले दोन गोल संघासाठी मोलाचे ठरले. अनुभवी गोलरक्षक पी.आर. श्रीजेशने पुन्हा एकदा आपल्याला अभेद्य भिंत का म्हणतात हे सिद्ध करून दाखवले.

भारताने हॉकी स्पर्धेतील उपांत्यपूर्व फेरीतील आपले स्थान आधीच निश्चित केले आहे, परंतु त्यांचे गटातील स्थान निश्चित नव्हते. त्यांना उपांत्यपूर्व फेरीत नेदरलॅण्ड, जर्मनी व ग्रेट ब्रिटन यांच्यापैकी एकाशी झुंजावे लागणार आहे.

भारताने दुसऱ्या चरणात २-० अशी आघाडी मिळवून जोरदार सुरुवात केली. १२ व्या मिनिटाला अभिषेकने गोल केला, तर कर्णधार हरमनप्रीत सिंगने १३ व्या मिनिटाला पेनॉल्टी कॉर्नरला गोलमध्ये रूपांतर केले. पहिल्या चरणात ऑस्ट्रेलियाने भारतावर आक्रमण केले, परंतु गोलरक्षक पी.आर. श्रीजेशने हल्ले परतावून लावले.

तिसऱ्या चरणात हरमनप्रीतने पेनॉल्टी स्ट्रोकला गोलमध्ये रूपांतर करून भारताची आघाडी ३-१ अशी वाढविली. अंतिम चरणात ऑस्ट्रेलियाने कठोर संघर्ष केला आणि पेनॉल्टी स्ट्रोकमधून ब्लेक गोव्हर्सने गोल करून भारताच्या विजयी आघाडीतील अंतर ३-२ असे कमी केले. (वृत्तसंस्था)

# क्रीडा मंत्रालयाने भारतीय खेळाडूंना पॅरिसमध्ये उपलब्ध करून दिले ४० एसी

**नवी दिल्ली, २ ऑगस्ट**

पॅरिसमधील उष्ण व दमट परिस्थितीत क्रीडा मंत्रालयाने भारतीय खेळाडूंना ऑलिम्पिक क्रीडाग्राममध्ये आरामदायक मुक्काम करण्यासाठी ४० एअर कंडिशनर उपलब्ध करून दिले.

पॅरिसमधील तापमान आणि आर्द्रतेमुळे ऑलिम्पिक क्रीडाग्राममध्ये भारतीय खेळाडूंचा विचार करता, इंडियन ऑलिम्पिक असोसिएशन (आयओए) व फ्रान्सच्या दूतावास यांच्याशी क्रीडा मंत्रालयाने चर्चा केली. चर्चेनंतर भारतीय खेळाडू मुक्काम करत असलेल्या क्रीडाग्रामच्या खोल्यांमध्ये ४० एसी देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याकरिता क्रीडा मंत्रालयाने अर्थसहाय्य दिले आहे.

त्यामुळे भारतीय खेळाडूंचा आता अधिक आरामदायक मुक्काम होईल व त्यांना चांगली विश्रांती मिळेल. खेळाडूंना चांगली कामगिरी करण्यासाठी खूप आवश्यक आहे.

सध्याच्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताने शूटिंगमध्ये तीन पदके मिळविली असून सर्व पदके नेमबाजीमध्ये मिळाली आहेत आणि तिन्ही कांस्यपदक आहेत.महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल स्पर्धेत मनू भाकरने कांस्यपदकासह खाते उघडले. त्यानंतर तिने सरबज्योत सिंगसोबत १० मीटर एअर पिस्तूल (मिश्रित संघ) स्पर्धेत कांस्यपदक जिंकले. गुरुवारी, स्वप्निल कुसळेने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पुरुषांच्या ५० मीटर रायफल ३ पी स्पर्धेत कांस्यपदक जिंकले. याप्रकारात पदक जिंकणारा तो पहिला भारतीय नेमबाज ठरला. आता मनू भाकर तिसरे पदक जिंकण्याच्या उंबरठ्यावर आहे.

यापूर्वी, २०१२ च्या लंडन ऑलिम्पिकमध्ये भारताने आतापर्यंतच्या सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावली होती. विजय कुमारला पुरुषांच्या २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूल स्पर्धेत रौप्यपदक मिळाले आणि गगन नारंगने पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल स्पर्धेत कांस्यपदक जिंकले. (वृत्तसंस्था)

## चीनला बॅडमिंटनचे सुवर्ण

**पॅरिस** : शुक्रवारी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये चीनने पहिल्यांदा बॅडमिंटनमध्ये सुवर्णपदक पटकावले. मिश्र दुहेरी बॅडमिंटनच्या अंतिम सामन्यात चीनच्या झेंग सिवेई व हुआंग याकिओनगने दक्षिण कोरियाच्या जोडीला अवघ्या ४१ मिनिटांत पराभूत केले. तीन वर्षांपूर्वी टोकियो ऑलिम्पिकच्या अंतिम सामन्यात चिनी जोडीला पराभव पत्करावा लागला होता, परंतु पॅरिसमध्ये त्यांनी किम वोन-हो आणि जेओंग ना-एनवर २१-८, २१-११ असा विजय मिळविला.

# तिरंदाज अंकिता-धीरजने गमावले कांस्यपदक

**पॅरिस, २ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये शुक्रवारी मिश्र सांघिक तिरंदाजी स्पर्धेत भारताच्या अंकिता भकत व धीरज बोम्मादेवाराने मिश्र सांघिक स्पर्धेतील कांस्यपदक जिंकण्याची संधी गमावली. कांस्यपदकाच्या लढतीत भारतीय जोडीला अमेरिकेकडून ६-२ असा पराभव पत्करावा लागला.

उपांत्य फेरीच्या सामन्यात अंकिता व धीरज या भारतीय जोडीला दक्षिण कोरियाकडून २-६ असा पराभव पत्करावा लागला. या पराभवानंतरही भारतीय जोडीला पदक जिंकण्याची संधी होती, परंतु कांस्यपदकाच्या लढतीतही त्यांना अमेरिकन जोडीकडून पराभव पत्करावा लागला. उपांत्यपूर्व फेरीत भारतीय जोडीने स्पेनच्या जोडीवर सनसनाटी विजय नोंदवून उपांत्य फेरीत धडक मारली होती. उपांत्य फेरीत भारतीय जोडीला पराभव झाला, तरीही भारतीय जोडीला कांस्यपदकासाठी लढा देण्याची संधी मिळाली होती.



अंकिता-धीरजने उपांत्यपूर्व सामन्यात स्पेनच्या इलिया कॅनालीस व पाब्लो आचा गोन्झालीझ या जोडीवर ३८-३७, ३८-३८, ३६-३७, ३७-३६ असा विजय नोंदविला. आता उपांत्य फेरीत भारतीय जोडीची गाठ कोरियाशी पडणार आहे. शुक्रवारी उप-उपांत्यपूर्व फेरीत धीरज-अंकिता या भारतीय जोडीने इंडोनेशियाच्या डियानांडा कोअरुनिसा व आरिफ पेंजेस्टू या जोडीला पराभूत करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. भारतीय जोडीने इंडोनेशियन जोडीवर ५-१ (३७-३६, -३ ३८--३८, -३ ३८--३७) विजय नोंदविला. आता भारतीय जोडीला उपांत्य फेरीत स्थान मिळविण्यासाठी स्पेनविरुद्ध झुंज द्यावी लागणार आहे.

**तरुणदीप रायचे आव्हान संपुष्टात**
**दीपिका कुमारी, भजन कौरची आगेकूच**

पुरुषांच्या वैयक्तिक तिरंदाजी स्पर्धेत भारताचे आव्हान संपुष्टात आले आहे. चार वेळचा ऑलिम्पियन तरुणदीप राय पहिल्याच फेरीत पराभूत झाला, तर धीरज बोम्मादेवाराला दुसऱ्या फेरीत थोड्या अंतराने पराभव पत्करावा लागला. पुरुषांचे व महिलांचे संघ उपांत्यपूर्व फेरी गाठण्यात अपयशी ठरले आहेत. दरम्यान, अनुभवी तिरंदाज दीपिका कुमारी व भजन कौर या दोघांनीही महिलांच्या वैयक्तिक स्पर्धेच्या उप-उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे, परंतु अंकिता पहिल्या फेरीतून बाहेर झाली. (वृत्तसंस्था)

# अल्काराझ अंतिम फेरीत



**पॅरिस, २ ऑगस्ट**

येथे सुरु असलेल्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पुरुष एकेरी टेनिस स्पर्धेत स्पेनच्याा कार्लोस अल्काराझने कॅनडाच्या फेलिक्स ऑगर-ॲलियासमवर ६-१, ६-१ असा विजय नोंदवून अंतिम फेरी गाठली. २१ वर्षीय अल्काराझला आता अंतिम फेरीत सर्बियाचा नोवाक जोकोविच किंवा इटलीचा लॉरेन्स मुसेट्टी विरुद्ध खेळावे लागणार आहे.

उपांत्यपूर्व सामन्यात २१ वर्षीय अल्कराझने टॉम पॉलवर ६-३, ७-६ असा, ३७ वर्षीय जोकोविचने स्टीफनोस सितसिपासवर ६-३, ७-६ (७-३) असा, मुसेट्टीने ॲलेक्झांडर झ्वेरेव्हवर ७-५, ७-६ असा, तर फेलिक्स ऑगरने नॉर्वेच्या कॅस्पर रुडवर ६-४, ६-७ (८-१०), ६-३ असा विजय मिळविला.

**सुवर्णपदकासाठी झेंग-डोना झुंजणार**

महिला विभागात शनिवारी चीनच्या झेंग किनवेन आणि क्रोएशियाच्या डोना वेकिक यांच्यात अंतिम सामना खेळला जाणार आहे.

उपांत्य फेरीत झेंगने प्रथम विश्वमानांकित पोलंडच्या इगा स्वियातेकला ६-२, ७-५ असा पराभवाचा हादरा दिला, तर डोनाने स्लोव्हाकियाच्या ॲना करोलिना शिमडलोवाविरुद्ध ६-४, ६-० असा विजय मिळविला. (वृत्तसंस्था)

# नौकापटू बलराज पनवारला अंतिम फेरीत पाचवे स्थान



**पॅरिस, २ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये रोइंग स्पर्धेत पुरुषांच्या एकेरी स्कल प्रकारात ड गटाच्या अंतिम फेरीत भारताच्या बलराज पनवारने पाचवे स्थान मिळविले.

बलराजने ७: ०२.३७ अशी वेळ नोंदवत पाचवा क्रमांक मिळविला व याबरोबरच पॅरिस ऑलिम्पिकमध्ये रोइंगमधील भारताची मोहीम संपली. बलराजने बुधवारी उपांत्य फेरीत ७:०४.९७ वेळेसह सहावे स्थान मिळविले होते.

ऑलिम्पिकमध्ये बलराज रोइंगमध्ये भारतासाठी सर्वोत्कृष्ट कामगिरी करण्यास अपयशी ठरला. टोकियो ऑलिम्पिकमध्ये ११ व्या स्थानावर असलेल्या अर्जुन लाल जाट व अरविंद सिंग या पुरुषांच्या लाइटवेट डबल स्कल्स जोडीचा हा विक्रम अजूनही अबाधित आहे.

गत वर्षी बलराज आशियाई स्पर्धा २०२३ मध्ये चौथे स्थान मिळविले होते. कोरिया प्रजासत्ताकातील रेगट्टा येथे आशियाई व ओशनियन रोइंग ऑलिम्पिक पात्रता स्पर्धेत बलराजने कांस्यपदक जिंकून पॅरिस ऑलिम्पिकसाठी आपली पात्रता सिद्ध केली होती. भारतीय सैन्याचा २५ वर्षीय सदस्य बलराज हा एक उत्तम ॲथ्लिट आहे व त्याने भारताची आशा आपल्या खांद्यावर नेली. आव्हानात्मक परिस्थिती आणि कडक स्पर्धा असूनही त्याने उपांत्य फेरीत उत्तम कामगिरी करून आपल्या खेळाशी एकनिष्ठता दाखविली. पॅरिस ऑलिम्पिकपर्यंतचा त्याचा प्रवास जिद्द, चिकाटी, दृढनिश्चय व समर्पणाने भरलेला आहे. (वृत्तसंस्था)

# अल्जेरियाच्या 'जैविक पुरुष' इमान खलिफने महिलांची मुष्टियुद्ध लढत ४६ सेकंदात जिंकली

**पॅरिस, २ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये एक नवीन वाद समोर आला आहे. महिलांच्या मुष्टियुद्धात वेल्टर वेट गटातील उप-उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत अल्जेरियन मुष्टियोद्धा इमान खलिफने इटलीच्या अँजेला कॅरिनीचा अवघ्या ४६ सेकंदात पराभव केला, मात्र या सामन्यानंतर खलिफच्या लिंगाबाबत चर्चा होत आहे. इमान खलिफ 'बॉयोलॉजिकली पुरुष' असल्याचा आरोप इटलीच्या अँजेला कॅरिनीने केला आहे.

**वादाची पृष्ठभूमी**

२०२३ सालच्या विश्व मुष्टियुद्ध स्पर्धेत खलिफ आंतरराष्ट्रीय मुष्टियुद्ध संघटनेचे (आयबीए) पात्रता नियमाचे पालन करण्यात अपयशी ठरली होती. त्या नियमानुसार जे पुरुष एक्सवाय गुणसूत्र असलेल्या खेळाडूंना महिलांच्या स्पर्धांमध्ये भाग घेण्यापासून रोखले. असे असूनही गत वर्षी आयओबीने खलिफ व तैवानच्या दुहेरी विश्वविजेती लिन यू-टिंग ऑलिम्पिकमध्ये भाग घेण्यासाठी हिरवी झेंडी दाखवली.

**आयओसीचे निवेदन**

आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने (आयओसी) इमान खलिफच्या सहभागाचे समर्थन करणारे निवेदन जारी केले. पॅरिस ऑलिम्पिक २०२४ च्या मुष्टियुद्ध स्पर्धेत भाग घेणारे सर्व ॲथ्लिट्सने स्पर्धेच्या पात्रता व प्रवेश नियमांचे पालन केले तसेच पॅरिस ऑलिम्पिकद्वारे निश्चित केलेल्या सर्व वैद्यकीय नियमांचे पालन केले आहे.

आंतरराष्ट्रीय मुष्टियुद्ध संघटनेच्या (आयबीए) नियमांत खेळाडूंना अपात्र ठरविण्यासाठी योग्य प्रक्रियेचा अभाव आहे, असेही आयओसीने म्हटले आहे.



अँजेला कॅरिनी (निळी जर्सी) व विजयी इमान खलिफ (लाल जर्सी)

## इटलीच्या पंतप्रधान मेलोनी यांचा अँजेलाला पूर्ण पाठिंबा

या वादादरम्यान, इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी आपल्या देशाच्या खेळाडूंचे मनोबल वाढवले आहे. त्यांनी अँजेलाला आपला पाठिंबा दिला आहे. मला माहित आहे की, अँजेला की तू हार मानणार नाही. एक दिवस तुला तू ज्यासाठी पात्र आहेस, ते सर्व तुझ्या मेहनतीने मिळेल, अशा स्पर्धेत जिथे समानता असेल, अशा शब्दात मेलोनी यांनी अँजेलाला धीर दिला आहे. ज्या खेळाडूची गुणसूत्रे पुरुषांची आहेत, त्या खेळाडूला महिलांच्या स्पर्धेत खेळवायला नको होते, असे मेलोनी म्हणाल्या.

**ॲलन मस्क, जेके रोलिंग यांचा आयओसीच्या निर्णयावर आक्षेप**

अब्जाधीश ॲलन मस्क व ब्रिटीश लेखक जेके रोलिंग हेसुद्धा या चर्चेत सहभागी झाले व आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने (आयओसी) इमान खलिफला स्पर्धा करण्यास परवानगी देण्याच्या निर्णयावर प्रश्न उपस्थित केला आहे. (वृत्तसंस्था)

## पुरुष की महिला, उगाच वाद घालू नका!

### द्युती चंदचा अल्जेरियन खेळाडूला पाठिंबा

हा वादाचा मुद्दा ट्रान्सजेंडर खेळाडूंशी संबंधित आहे. त्यामुळे पॅरिसमधील अल्जेरियन खेळाडू चर्चेत आहे.

या सगळ्यादरम्यान आपल्या कारकिर्दीत अशाच काहीसा सामना करणाऱ्या भारतीय धावपटू द्युती चंदने या वादाविरोधात आवाज उठवला व अल्जेरियन खेळाडू इमान खलिफाला पाठिंबा दिला.

टेस्टोस्टेरॉन जास्त असलेल्या खेळाडूंनी खेळू नये असा काही नियम होता, पण २०१४ मध्ये मी स्वत: आयओसीच्या नियमाला आव्हान दिले होते, खरं सांगायचे झाल्यास कोणीही हार्मोनल पातळी वाढवू शकत नाही. त्यावेळी खुप वाद झाला होता व खूप त्रास सहन करावा लागला होता, असे द्युती चंद म्हणाली.

ऑलिम्पिक सामन्यादरम्यान, (अँजेला) कॅरिनीने पराभव स्वीकारला व आता टेस्टोस्टेरॉनची पातळी जास्त असल्याने ती अल्जेरियन खेळाडूबद्दल तक्रार करत आहे. पण जेव्हा तुम्ही ऑलिम्पिक खेळता तेव्हा तुम्हाला अनेक चाचणीला सामोरे जावे लागते. याबाबत समाज माध्यमावर वाद निर्माण करणे मला योग्य वाटत नाही, असे ती म्हणाली.

# लाडकी बहीण योजनेविरोधात याचिका

**मुंबई, २ ऑगस्ट**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर राज्य सरकारची महत्त्वाकांक्षी योजना मानल्या जाणाऱ्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेला ब्रेक लागण्याची शक्यता आहे. कारण, मुंबई उच्च न्यायालयात या योजनेविरोधात याचिका दाखल करण्यात आली. मंगळवारी यावर तातडीची सुनावणी होणार आहे. त्यामुळे या याचिकेचा निकाल काय लागणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

नवी मुंबईतील नावेद मुल्ला यांनी ही याचिका न्यायालयात दाखल केली. या याचिकेत १४ ऑगस्टला वितरित करण्यात येणारा मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा पहिला हप्ता थांबवण्याची मागणी करण्यात आली. विधानसभा निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून राज्य सरकारने ही योजना सुरू केली. ही भ्रष्ट कृती असून, मतदारांना आमिष दाखवण्याचा प्रकार आहे. निवडणुकीत पैसे वाटल्यास निवडणूक आयोगाकडून कारवाई केली जाते. मात्र, सध्या विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू नसल्यामुळे निवडणूक आयोग कारवाई करू शकत नाही, असे याचिकाकर्त्यांनी म्हटले आहे.

**योजनेला स्थगिती देणार का?**

एरवी सामान्य लोकांनी साधे चॉकलेट घेतले तरी, त्यावर जीएसटी भरावा लागतो. अन्य गोष्टींवरही सामान्य जनता २८ टक्क्यांपर्यंत जीएसटी कर भरते. हे पैसे फुकट वाटण्यासाठी नाहीत. लाडकी बहीण योजना म्हणजे करदात्यांच्या पैशांचा अपव्यय आहे, असे याचिकाकर्त्यांनी म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# तुलिका मान क्युबाच्या आयडॅलिसकडून पराभूत

**पॅरिस, २ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या ज्युडो स्पर्धेत ७८ किलोच्यावरील वजन गटाच्या पहिल्याच फेरीत भारताच्या तुलिका मान हिला लंडन ऑलिम्पिक विजेती क्युबाच्या आयडॅलिस ऑर्टिज हिच्याकडून पराभवाचा सामना करावा लागला.

चॅम्प डी मार्स एरिनामध्ये खेळल्या गेलेल्या या सामन्यात २०२२ राष्ट्रकुल रौप्यपदक विजेत्या दिल्लीच्या २५ वर्षीय तुलिका मान आयडॅलिसकडून सरळ ०-१० अशा गुणांनी पराभव स्वीकारावा लागला. आयडॅलिसने आतापर्यंत चार



ऑलिम्पिक पदके जिंकली असून यात दोन रौप्य व दोन कांस्यपदकांचा समावेश आहे.

तुलिका दोन वर्षांची असताना ज्युडो लढतीत आपल्या वडिलांकडून हरली होती व ती आता विधवा मातेची अविवाहित मुलगी आहे.

आयडॅलिसने अवघ्या २८ सेकंदात तुलिकाला 'इप्पॉन' या एका चोकहोल्डमध्ये अडकवले. जेव्हा एखादा स्पर्धक प्रतिस्पर्ध्याला २० सेकंदांसाठी ग्रॅपलिंग होल्ड-डाऊन करतात, त्याला इप्पॉन म्हणतात.

या पराभवानंतर भारताची ज्युडोमधील मोहीम संपली, कारण तुलिका ऑलिम्पिकमध्ये स्पर्धा करणारी भारताची एकमेव ज्युडोपटू होती. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# तामिळनाडूमधील बॅग लिफ्टींगचा गुन्हा उघडकीस आणून ६ आरोपी जेरबंद

**७०० ग्रॅम सोन्याची दागिने, १२ लाख रुपये रोखसह ५४ लाखांचा मुद्देमाल हस्तगत**

**सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ ऑगस्ट -**

तामीळनाडू राज्यातील कोईमुत्तुर येथील तिरूपूर रेल्वे पोलिस ठाण्यात दाखल असलेला ९०० ग्रॅमचे सोन्याचे दागिने असलेली सराफाची बॅग चोरीप्रकरणातील ६ आरोपींना सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक पोलिसांनी जेरबंद करून तामीळनाडू पोलिसांच्या स्वाधीन केले. या आरोपींकडून पोलिसांनी ७०० ग्रॅम सोन्याचे दागिने व रोख १२ लाख रुपये असा ५४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

स्वप्नील तानाजी चव्हाण (रा. लोहगाव, ता. जत, जि. सांगली), विजय कुंडलिक गंगले (रा. सांगोला), चैतन्य विजय शिंदे, गौरव मसाजी वाघमारे (दोघे रा. कान्हापूरी, ता. पंढरपूर), अंकित सुभाष माने (रा. सांगोला), अमर भारत नमिगरी (रा. जेऊरवाडी, ता. करमाळा) अशी अटक करण्यात आलेल्यां गुन्हेगारांची नावे आहेत.

सुभाष विलास जगताप (रा. कोईमुत्तुर, तामिळनाडू) हे सराफ असून ते मुळचे सोलापूर जिल्ह्यातील रहिवासी आहेत. परंतु, गेल्या ४० वर्षापासून ते कोईमुत्तुर येथे स्थायिक झालेले असून सोन्याचे दागिने विक्रीचा त्यांचा व्यवसाय आहे. १६ जून २०२४ रोजी सोन्याचे दागिन्यांची डिलीव्हरी बेंगलोर येथे देऊन सुभाष जगताप हे बेंगलोरहून लोकमान्य टिळक एक्स्प्रेसने कोईमुत्तुरला निघाले होते. त्यावेळी तिरूपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत रेल्वे गाडी आल्यानंतर पहाटे साडेपाचच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी जगताप यांच्याजवळील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असलेली बॅग चोरून नेली होती. याबाबत तिरूपुर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर पोलिसांकडून करण्यात आलेल्या तपासामध्ये संशयित चोरटे हे महाराष्ट्रातील असल्याचे निष्पन्न झाले होते.

त्यानुसार तामीळनाडू पोलिसांची एक पथक सोलापूर जिल्ह्यात तपासासाठी आले होते. तामीळनाडू पोलिसांनी पोलिस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे यांची भेट घेऊन तपासासाठी मदत मागितली होती. त्यावेळी पोलिस अधिक्षक सरदेशपांडे यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना या गुन्ह्याचा तपास करण्याचे आदेश दिले होते.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी संशयित चोरट्याचे सीसीटीव्ही चित्रीकरणाद्वारे तसेच तांत्रिक विश्लेषणाद्वारे केलेल्या तपासामध्ये हा गुन्हा सांगली जिल्ह्यातील लोहगाव येथील स्वप्नील चव्हाण व त्याच्या साथीदारांनी केला असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी स्वप्नील चव्हाण व त्याच्या टोळीतील विजय गंगले, चैतन्य शिंदे, गौरव वाघमारे, अंकित माने, अमर नमिगरी यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांची गुन्हा केल्याचे सांगितले. पोलिसांनी या टोळीतील आरोपींकडून गुन्ह्यातील चोरीस गेलेल्या ९०० ग्रॅम सोन्याच्या दागिन्यांपैकी ४२ लाख रुपये किंमतीचे ७०० ग्रॅम सोन्याचे दागिने व रोख १२ लाख रूपये असा ५४ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या आरोपींना तसेच हस्तगत केलेला मुद्देमाल तिरूपुर पोलिस ठाण्याच्या पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे. ही कामगिरी पोलिस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलिस अधिक्षक प्रितम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलिस निरीक्षक शशिकांत शेळके, सहायक फौजदार नारायण गोलेकर, हवालदार हरिदास पांढरे, सलीम बागवान, गणेश बांगर, धनराज गायकवाड यांनी केली.

**तामीळनाडूच्या चेन्नई रेल्वे पोलिसांकडून सोलापूर ग्रामीण पोलिसांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह**

तामीनाडूमधील तिरूपुर रेल्वे पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या या गुन्ह्याच्या तपासामध्ये सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अत्यंत मोलाची भूमिका पार पाडीत गुन्हेगारांच्या टोळीला अटक करून त्यांच्याकडून ५४ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. त्यामुळे तामीळनाडूच्या चेन्नई रेल्वे पोलिसांच्या पेलिस अधिक्षकांकडून सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेला प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले आहे.

# कोणार्क एक्स्प्रेसमधून ३५ किलो गांजा जप्त; अज्ञाताविरुध्द गुन्हा




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ ऑगस्ट -**

कोणार्क एक्स्प्रेसमधून गांजाची वाहतूक होत असल्याचे सोलापूर लोहमार्ग पोलिसांनी उघडकीस आणून तीन बॅगमधून ८९ हजार रुपये किंमतीचा ३५ किलो गांजा जप्त केला आहे.

याबाबत सोलापूर लोहमार्ग पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून हा गुन्हा कलबुर्गी रेल्वे पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे.

३० जुलै रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास सोलापूर रेल्वे स्थानकावर येणाऱ्या सुपरफास्ट गाडी क्र. ११०२० भुवनेश्वर - मुंबई कोणार्क एक्स्प्रेसच्या बोगी क्र. ए १ मधील सीट नं. ३ ते ६ च्या खाली कलबुर्गी रेल्वे स्टेशन येण्यापूर्वी कोणीतरी अज्ञात व्यक्तीने चार संशयित बॅगा ठेवल्याची माहिती सोलापूर लोहमार्ग पोलिसांना मिळाली होती. त्यावरुन पोलिसांनी कोणार्क एक्स्प्रेस सोलापूर रेल्वे स्थानकावर आल्यावर बोगी क. ए १ ची तपासणी केली असता सीट नं. ३ ते ६ च्या खाली ट्रॉली बॅग व सॅक अशा स्वरूपातील चार संशयित बॅगा मिळून आल्या. त्या बॅंगाची तपासणी केली असता त्यामध्ये गांजा मिळून आला. या बॅगामध्ये सुमारे ३५ किलो गांजा मिळून आल्याने याबाबत अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महापुराचे पाणी दुष्काळी भागांना मिळणार

## सांगोल्याचे आ. शहाजीबापू पाटील यांच्या मागणीला यश

**मंत्रिमंडळाची मान्यता**
**सुकाणू समितीची स्थापना**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २ ऑगस्ट-**

महापुराच्या पाण्याचे नियोजन करुन ते पाणी दुष्काळी भागासाठी देण्याचा आराखडा शासनाने तात्काळ तयार करण्यात यावा, अशी मागणी आ. शहाजीबापू पाटील यांनी केली होती. या मागणीला यश आले असून कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील कृष्णा, भीमा खोऱ्यातील पूर आपत्ती नियंत्रणासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबविण्यासाठी कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असून मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समितीची स्थापन करण्यात आली आहे. महापुराचे पाणी दुष्काळी भागासाठी देण्याच्या प्रकल्पाला मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली असल्याची माहिती आ. शहाजीबापू पाटील यांनी दिली.





सदर समितीत सहअध्यक्ष म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्रा तर सदस्यपदी अपर मुख्य सचिव (वित्त), अपर मुख्य सचिव (नियोजन), अपर मुख्य सचिव (जलसंपदा), प्रधान सचिव (मदत व पुनर्वसन) तर सदस्य सचिवपदी संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रकल्पाचे संनियंत्रण करणे, विस्तृत प्रकल्प आराखड्याला मान्यता देणे, प्रकल्पांच्या वार्षिक कृती आराखड्यास मान्यता देणे, प्रकल्पाकरिता घटकनिहाय निधी मंजूर करणे, प्रकल्पासंबंधीच्या आवश्यक त्या वस्तू व सेवांच्या खरेदी प्रस्तावांना मान्यता देण्यात येणार आहे. प्रकल्पावर संपूर्ण देखरेख आणि कामकाज व्यवस्थापनासाठी प्रकल्प अंमलबजावणी कक्षातील प्रतिनिधींचा समावेश असणारी प्रकल्प समन्वय समिती स्थापन करण्यात आली असून मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्रा हे या समितीचे अध्यक्ष राहणार आहेत.

> या प्रकल्पामुळे सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात पूर परिस्थिती निर्माण झाली तर महापुराचे पाणी सांगोला तालुक्यासह मंगळवेढा, जत, आटपाडी, कवठेमहांकाळ, खानापूर, तासगाव, माण, खटाव या दुष्काळी तालुक्यांना देणे सुलभ होणार आहे.
> **-आ. शहाजीबापू पाटील**



# माढ्याच्या खासदारांच्या अधिकाऱ्यांना सूचना

**जातेगाव-करमाळा-टेंभुर्णी महामार्ग बाधित शेतकऱ्यांची बैठक**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २ ऑगस्ट-**

जातेगाव-करमाळा-टेंभुर्णी महामार्गामध्ये बाधित होणाऱ्या सर्व शेतकऱ्यांच्या भूसंपादनाच्या संदर्भातील अडचणी, तक्रारी व त्यांचे निवारण करण्याकरता खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय महार्गाचे अधिकारी, प्रांताधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, तहसिलदार, भूमीअभिलेख यांच्यासमवेत करमाळा पंचायत समिती सभागृहामध्ये बैठक झाली.

यावेळी महामार्गामुळे बाधित होणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना समस्या माडण्याची संधी उपलब्ध करुन देऊन ऑन दि स्पॉट अधिकाऱ्यांना सूचना केल्या. या महामार्गाची रुंदी नगर-जातेगाव एवढीच राहणार असून राज्य सरकारच्या नॉम्सप्रमाणे झालेल्या भूसंपादनातील त्रुटी दूर करुन नॅशनल हायवेच्या नॉम्सप्रमाणे जातेगाव ते टेंभुर्णीपर्यंतच्या भूसंपादनाची प्रक्रिया नव्याने होणार असल्याचे सांगितले. तसेच मोजणीच्या संदर्भातल्या अडचणीसाठी लवकरच भूमी अभिलेख अधीक्षक सोलापूर यांच्याबरोबर बैठक आयोजित करणार असल्याचे सांगितले.

यावेळी माजी आ. नारायणआबा पाटील, माजी जि. प. सदस्या सविताराजे भोसले, भारतनाना पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संतोष वारे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रताप जगताप, शिवसेनेचे तालुकाध्यक्ष सुधाकर लावंड, शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश मंगवडे, जातेगाव ते टेंभुर्णीपर्यंतच्या महामार्गालगतच्या गावातील, नेतेमंडळी मान्यवर व बाधित शेतकरी उपस्थित होते.

# आण्णा भाऊ साठे स्मारकासाठी पाच कोटी निधी द्या : परिचारक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २ ऑगस्ट-**

शहरात साहित्यरत्न आण्णा भाऊ साठे यांचे स्मारक उभे राहावे अशी वारंवार मागणी होत होती. माजी आ. प्रशांत परिचारक यांनी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे यासाठी पाच कोटी निधीची मागणी केली आहे.

त्याअनुषंगाने पंढरपूर नगरपरिषदेमार्फत साहित्यरत्न आण्णा भाऊ साठे यांचे स्मारक उभा करत आहोत. त्यासंदर्भात पंढरपूर नगरपरिषदेने जागा उपलब्ध करून दिलेली आहे. तसेच नगरपरिषदेमार्फत स्मारकाचा चबुतरा उभा करण्यासाठी नफा फंडातून १५ लाखांचा निधी मंजूर केलेला आहे व त्याचे काम सुरू आहे. पंढरपूर शहरात साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांचे स्मारक व परिसर सुशोभिकरणासाठी आणखी पाच कोटींच्या निधीची आवश्यकता असल्याने जिल्हा नियोजन समितीमधून निधी मंजूर करावा, अशी मागणी पालकमंत्र्यांकडे केली असता त्यास सकारात्मक प्रतिसाद दिला असून लवकरात लवकर निधी मंजूर करण्याचे आश्वासन पालकमंत्री यांनी दिले आहे.



# संत शिरोमणी श्री नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळा साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २ ऑगस्ट-**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शुक्रवारी (ता.२) मुंबईतील त्यांच्या वर्षा निवासस्थानी इतिहासात प्रथमच संत शिरोमणी श्री नाम देव महाराज यांचा ६७४ वा संजीवन समाधी सोहळा साजरा करण्यात आला. या सोहळ्यास महाराष्ट्रासह पंजाब , गुजरात व राजस्थान राज्यातील नामदेव भक्त उपस्थित होते.

पालखी सोहळा पत्रकार संघ, भागवत धर्म प्रसारक मंडळ, शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेना यांच्यासह महाराष्ट्र राज्यातील विविध नामदेव शिंपी समाज संघटनांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना संत नामदेव महाराज यांचा संजीवन समाधी सोहळा साजरा करावा असे निवेदन दिले होते. याची दखल घेत इतिहासात प्रथमच शासकीयस्तरावर संत नामदेव महाराजांचा समाधी सोहळा मुख्यमंत्री शिंदे यांच्या मुंबईतील वर्षा बंगल्यावर साजरा करण्यात आला.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, संतांनी शांती, समता व बंधुता याचा विश्वाला संदेश देत भागवत धर्माचा प्रचार व प्रसार करीत सामाजीक ऐक्याचे काम केले. संत नामदेवांचे कार्य महान आहे. त्यांनी भक्ती, प्रेमाच्या जोरावर पंजाब प्रांतात काम केले. पंजाब येथे बांधण्यात येत असलेल्या संत नामदेव महाराष्ट्र भवन साठी आपण योग्य ते सहकार्य करु.

या कार्यक्रमास पालखी सोहळा पत्रकार संघाचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे , कार्याध्यक्ष राजेंद्र मारणे, उपाध्यक्ष सुभाष भांबुरे, खजिनदार मनोज मांढरे, शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे अध्यक्ष अक्षय महाराज भोसले, श्री क्षेत्र घुमाण (पंजाब) च्या श्री नामदेव दरबार कमेटीचे सरबजीत सिंह बावा, सुखजिंदर सिंह बावा, मनजींदर सिंह बावा, नरेंदर सिंह बावा, नासपचे अध्यक्ष संजय नेवासकर, सचिव डॉ. अजय फुटाणे, रोहित येवतकर, अ‍ॅड. सागर मांढरे, राजस्थान नामदेव शिंपी समाजाचे अध्यक्ष जसराज सोलंकी, राजेशकुमार गेहेलोत, इंदरमल चौहान, वारकरी समाज संघटनेचे राजाभाऊ थोरात, गुजरात छिपा समाज संघटनेचे विजय परमार, हिराचंद नानीवाल यांच्यासह शिंपी समाज बांधव उपस्थित होते.



# अकलूजमध्ये पाच हजार विद्यार्थ्यांना वह्या वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २ ऑगस्ट-**

साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अकलूज येथे महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटना, शहर काँग्रेस कमिटी, लहुजी साम्राज्य ग्रुप, नवनाथ साठे मित्र मंडळातर्फे पाच हजार विद्यार्थ्यांना वह्या, गणवेश तर नगरपरिषदेमधील साफसफाई महिला कर्मचाऱ्यांना साडी-चोळी देऊन सन्मान करण्यात आला.

अकलूज परिसरातील ५००० विद्यार्थ्यांना वही वाटप, शालेय साहित्य वाटप, तसेच जैन मंदिर विद्यालयातील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले. अकलूज शहरातील सर्व महामानवाच्या पुतळ्यांची दररोज देखभाल करणाऱ्या दोन कामगारांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते संपूर्ण पोशाख देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी डॉ. अनिकेत इनामदार, डॉ. मानसी इनामदार, मुख्याधिकारी दयानंद गोरे. डॉ. प्रियंका शिंदे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. संजय, जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष अण्णासाहेब इनामदार, अण्णासाहेब शिंदे, माळशिरस तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सतीश पालकर, संतोष राऊत, शिवसेनेचे तालुकाध्यक्ष रणजित देशमुख, काँग्रेस सहकार सेल जिल्हाध्यक्ष आबासाहेब वाघमरे, मयूर माने, शरद गायकवाड, ज्योतीताई कुंभार, सचिन गायकवाड, बबनराव शेंडगे, उमेश जाधव, सतीश साठे, महादेव साठे, उमेश साठे, रफिक सय्यद उपस्थित होते.

**मुलींच्या नावे पाच हजारांची ठेव**

अण्णा भाऊंनी आयुष्यभर कष्टकऱ्यांच्या कल्याणासाठी आवाज उठवला. त्यांच्या कार्याचे स्मरण म्हणून जनसेवा संघटना व नवनाथ साठे यांच्याकडून विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. दरवर्षी जनसेवा संघटनेमार्फत गोरगरीब मुलींना पाच हजार रुपयांची ठेव त्यांच्या नावे ठेवले जाते. तसेच जनसेवा संघटनेमार्फत नवनवीन उपक्रम राबवले जातात, असे दयानंद गोरे यांनी सांगितले.

# दृढनिश्चयी व विकासाभिमुख नेतृत्व : दिलीपराव माने

**एथ वडील जे जे करिती ।**
**तया नाम धर्मु ठेविती ।**
**तेचि येर अनुष्ठिती ।**
**सामान्य सकळ ।।**

या कैवल्यसाम्राज्य चक्रवर्ती ज्ञानेश्वर माऊलींच्या ओवीप्रमाणे वडिलांचा वारसा चालविण्याचे काम माझे राजकीय प्रवासातील सहकारी व दक्षिण सोलापूरचे माजी आमदार दिलीपराव माने हे करित आहेत. एक दृढनिश्चयी व विकासाभिमुख नेतृत्व म्हणून त्यांनी राजकीय व सामाजिक क्षेत्रात स्वतःला सिद्ध केले आहे.

सहकार तपस्वी ब्रम्हदेवदादा माने आणि मी एकाच पुरोगामी विचारधारेचे. एखाद्याला शब्द दिला, की तो कसोशीने पाळायचा, हे त्यांचे व्रत. गोरगरीब, शेतकरी, पिडीत लोकांसाठी त्यांनी आयुष्य वेचले. दोन वेळा आमदारकी भूषविलेल्या ब्रम्हदेवदादा चे सहकारात मोठे योगदान. १९९७ साली त्यांनी दिलीपराव यांच्या हाती तालुक्याच्या राजकारणाची धुरा सोपविली. त्यावेळी त्यांनी काकांबरोबर युती करुन राजकारण करण्याचा सल्ला दिलीपरावना दिला. त्यांनीही युतीसाठी हात सदैव पुढेच केला. मात्र, कधी कधी तत्वांच्या लढाईत आम्हाला वेगळी चूल मांडावी लागली. मतभेद जरुर झाले. मात्र, मनभेद कधीच झाले नाहीत. तालुक्याच्या विकासासाठी जेवढे काही करता येईल, तेवढे आम्ही दोघेही करण्यासाठी सदैव तत्पर असतो. स्व.ब्रम्हदेवदादांचा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, सहकाराचा वारसा दिलीपराव यशस्वीरित्या चालवित आहेत.



ज्येष्ठांविषयी मनात नितांत आदर, कार्यकर्त्यांना सतत काम करण्यासाठी प्रोत्साहन आणि सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून शेतकऱ्यांच्या, गोरगरीबांच्या हितासाठी सदैव कटिबद्द या त्रिसूत्रीने दिलीपरावांची राजकीय वाटचाल गेली साडेतीन दशकांपासून सुरु आहे. वडिलांचा वैभवी राजकीय वारसा असताना देखील मी नेत्याचा मुलगा आहे, हा बडेजावपणा, डामडौल त्यांच्या वागण्या-बोलण्यातून कधीच दिसत नाही. ब्रम्हदेवदादा माने बँकेच्या २१ शाखांचा विस्तार, दोन साखर कारखाने, शैक्षणिक संस्थांची उभारणी,नर्मदा,शाहू हॉस्पिटलच्या माध्यमातून त्यांनी कोवीड काळात केलेले कार्य निश्चितच तरुण नेतृत्वाला प्रेरणा देणारे आहे. २००९ ते २०१४ या कालावधीत दक्षिण सोलापूर तालुक्याचे आमदार म्हणून त्यांनी भरीव कामगिरी केली. विकासाच्या मुद्द्यावर आग्रही व ठाम भूमिका घेऊन प्रसंगी आंदोलन करुन सामान्यांच्या हितासाठी केलेली मागणी लावून धरुन न्याय मिळवून देण्याचे काम त्यांनी अनेकवेळा केले आहे. पक्षाचे कार्य करीत असताना इतर पक्षातील नेत्यांशी त्यांनी जिव्हाळ्याचा व आपुलकीचा स्नेहभाव जपला, हा त्यांच्या स्वभावाचा खास पैलू आहे. दिलीपरावना जन्मदिनाच्या मनापासून आभाळभर शुभेच्छा..!

**- बळीरामकाका साठे, जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट**

# पोलीस उपनिरीक्षकपदी पूनम शिंदेंची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २ ऑगस्ट-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत इर्ले (ता. बार्शी) येथील शेतकरी कुटुंबातील पूनम शिंदे हिची पोलीस उपनिरिक्षकपदी निवड झाली आहे. जून २०२४ मध्ये इडब्लूएस प्रवर्गातून आठव्या क्रमांकाने मुलाखतीद्वारे तिची अंतिम निवड झाली आहे.



पूनम योगेश शिंदे हिचे प्राथमिक शिक्षण इर्लेतील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत तर माध्यमिक शिक्षण कै. लक्ष्मणराव डुरे-पाटील प्रशालेत पूर्ण केले. वैराग येथील तुळशीदास जाधव प्रशालेत उच्च माध्यमिक शिक्षण घेऊन तिने कोल्हापूर येथे बीएससी अ‍ॅग्रीचे शिक्षण पूर्ण केले. पुढे अहमदनगर जिल्हातील राहुरी विद्यापीठात एमएससी पदवी अभ्यासक्रम पूर्ण केले. गेल्या वर्षापासून ती पुण्यात राहून स्पर्धा परीक्षेची तयारी करत होती. तिने कोणताही क्लास न लावता चिकाटीने ध्येय गाठले आहे. पूनम शिंदे हिने सन २०२२ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची पूर्व परिक्षा उत्तीर्ण केली. नोव्हेंबर २०२३ मध्ये मुख्य परीक्षा तर मे २०२४ मध्ये शारीरिक चाचणी परिक्षा झाली आणि जून २०२४ मध्ये मुलाखतीद्वारे तिची महाराष्ट्रामध्ये इडब्लूएस प्रवर्गातून मुलीमध्ये ८ व्या क्रमांकाने निवड झाली आहे. इर्ले गावातील प्रथम महिला पोलीस अधिकारी झाल्याने ग्रामस्थांमधून आनंद व्यक्त होत आहे.

> कोणताही क्लास न लावता स्वयं अध्ययन करून आई सरिता व बापूची इच्छा होती की माझ्या मुलीने पीएसआय व्हावे. त्यांचे स्वप्न मी पूर्ण केल असून भविष्यात माझी डीवायएसपी होण्याची इच्छा आहे.
> **-पूनम शिंदे, इर्ले**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/




# माजी आमदार दिलीप माने यांचा आज नागरी सत्कार



**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**


माजी आमदार दिलीप माने यांच्या वाढदिवसानिमित्त नागरी सत्कार सोहळा शनिवारी ३ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता जामगुंडी मंगल कार्यालय जुळे सोलापूर येथे आयोजित केला आहे. हा सत्कार समारंभ माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि उज्ज्वलाताई शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. या प्रसंगी खासदार प्रणिती शिंदे, सिद्धेश्वर साखर कारखान्याचे चेअरमन धर्मराज काडादी यांच्यासह जिल्ह्यातील इतर प्रमुख मान्यवर नेते आणि कार्यकर्ते उपस्थित राहावे, असे आवाहन वाढदिवस गौरव समितीने केले आहे.











आशिर्वाद
ब्रम्हदेवदादा माने
मा.जयकुमार माने
माजी नगरसेवक
मा.पृथ्वीराज माने
युवा नेतृत्व
माजी आमदार
दिलीपरावजी माने साहेब
यांच्या वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
सदन शेतकरी
नारायण (आण्णा) भोपळे
हजरत महबूब शेख
रईस रसूल शेख
रऊफ रसूल शेख
अब्दुलकादर हजरत शेख
तनवीर हजरत शेख
शुभेच्छुक
अश्विनी गृह वस्तू भांडार
प्रो.अविनाश भारत भोपळे
२८ राहुल नगर, मजरेवाडी, होटगी रोड, सोलापूर
सूर्या टायर उद्योग
प्रो.संभाजी विश्वनाथ भोपळे
होटगी स्टेशन रोड, ता.द.सोलापूर
गणेश ॲटोमोबाईल्स
प्रो.शाहू नारायण भोपळे
स्टेशन रोड होडगी, ता.द.सोलापूर
: शुभेच्छुक :
समस्त भोपळे परिवार
शुभेच्छुक
प्रो.हजरत मेहबुब शेख
सना अर्थ मूव्हर्स | साई ट्रेडर्स
समस्त शेख परिवार
शंकर नगर होटगी रोड, सोलापूर
दै.तरुण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात लोकमान्य टिळक, अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन

**अक्कलकोट, दि. २ ऑगस्ट-**

महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गिरीजामाता प्राथमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अक्कलकोट यांच्यावतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, पर्यवेक्षक सूर्यकांत रुगे, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, रूपाली शहा, पूनम कोकळगी, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, दिगंबर जगताप, सांस्कृतिक विभाग प्रमुख कल्पना स्वामी, राजकुमार गवळी, सिद्धाराम पाटील, बाबुशा मंगरूळे, श्रीदेवी मायनाळे, किणगी उपस्थित होते. सूत्रसंचालन मल्लय्या हिरेमठ यांनी केले तर दहावीतील विद्यार्थी समर्थ सुतार यांनी आभार मानले.

### महिलेवर दुष्कृत्य, अत्याचार केल्याप्रकरणी बार्शी न्यायालयाकडून आरोपीस जामीन मंजूर

**बार्शी, दि. १ ऑगस्ट-**

माढा पोलीस स्टेशमध्ये गु.र. नंबर २३/२०२४ अन्वये ३७६ चा गुन्हा दाखल होता. सदर प्रकरणात फिर्यादी याने तिचेवर आरोपीने वारंवार दुष्कृत्य केले म्हणून माढा पोलीस स्तेशनमध्ये गुन्हा नोंद केला होता. पोलिसांनी सदर प्रकरणातील आरोपी विशाल माळी यास दि. १३ फेब्रुवारी २४ रोजी अटक केली होती. सदर आरोपीने बार्शी येथील सत्र न्यायालयात ॲड. रियाज शेख, बार्शी व ॲड. पांडुरंग खोत यांचेमार्फत जामीन करीता अर्ज ठेवला होता. आरोपीचे वकिलांनी केलेला युक्तिवाद मे. न्यायालयाने ग्राह्य धरुन आरोपीस ५० हजार रुपयांच्या जात मुचलक्यावर सत्र न्यायालय बार्शीचे मे. चव्हाण सो यांनी जामीन मंजूर केला. यात आरोपी तर्फे ॲड. रियाज शेख व ॲड. पांडुरंग खोत यांनी काम पाहिले.



### लोकमंगल पतसंस्थेच्या नातेपुते शाखेच्या तिसऱ्या वर्धापनदिनानिमित्त वृक्षारोपण

**नातेपुते, दि. २ ऑगस्ट-**

लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था नातेपुते शाखेच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त लक्ष्मीपूजन व प्रज्ञा इंग्लिश मीडियम स्कूल व क्रांतीज्योती इंग्लिश मीडियम स्कूल येथे वृक्षारोपण व लहान विद्यार्थ्यांना खाऊ वाटण्यात आला. यावेळी नातेपुते शाखेचे नूतन सल्लागार रमेश काळे, अशोक सोरटे, सुधीर काळे, डॉ. एम. पी. मोरे, डॉ. माधव लवटे, गणेश कुचेकर, हनुमंत भिसे, शाखेचे खातेदार अमित कुमार, संकेत काळे, निलेश सोरटे, निर्मला कविता तसेच विभागीय अधिकारी वैभव लांबोरे, शाखाधिकारी रमेश छपरे व कर्मचारी उपस्थित होते.



### दहिगाव येथे लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी

**सदाशिवनगर, दि. २ ऑगस्ट-**

दहिगाव (ता. माळशिरस) येथे साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. आण्णा भाऊ साठे यांची १०४ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सर्वप्रथम लोकशाहीर आण्णा भाऊ साठे व लहुजी वस्ताद साळवे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी पोलीस पाटील विठ्ठल मोरे, महाराष्ट्र विकास सेनेचे शाखाध्यक्ष सचिन खिलारे, किसन खिलारे, धीरज साळवे, ऋषिकेश मोरे, शंकर खिलारे, चैतन्य खिलारे, प्रीतम खिलारे, पांडुरंग मिसाळ, सोमनाथ खिलारे, बंडू पाटोळे, ओंकार खिलारे, रोहित खिलारे आदी उपस्थित होते.



### 'शिवरत्न'मध्ये साठे, टिळक यांना अभिवादन

**अकलूज, दि. २ ऑगस्ट-**

येथील शिवरत्न नॉलेज सिटी परिसरातील शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (बीबीए) मध्ये लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रशासन अधिकारी अश्रफ शेख, प्राचार्य डॉ. अरविंद कुंभार, प्रा. स्नेहा धाईंजे, प्रा. नितीन कंगळे, प्रा. वसीम सय्यद, हर्षद घोंगडे, तुषार एकतपुरे, आशा खंडागळे उपस्थित होते.

# शासनाच्या योजना उदंड... सर्व्हर मात्र थंड

## नागरिकांमधून संतप्त प्रतिक्रिया

## सोय चांगली झाली, अडचणीही वाढल्या

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २ जुलै-**

केंद्र आणि राज्य शासनाच्या योजना या उदंड झाल्या असून योजनांचा नुसता सुकाळ आल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. शासनाच्या सर्व योजना या ऑनलाईन पद्धतीने भरावयाच्या असून शासनाच्या उदंड योजना या सर्व्हर नसल्याने थंड झाल्या आहेत, अशी संतप्त प्रतिक्रिया अक्कलकोट शहर व तालुक्यातील जनतेमधून उमटत आहे.




सध्या केंद्र आणि राज्य शासनाच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या अनेक योजना या ऑनलाईन पद्धतीने भरण्यात येत आहेत. अक्कलकोट शहर व तालुक्यात सीएससी सेंटर व महा-ई-सेवा तसेच मोबाईलमधील विविध ॲपद्वारे अनेक योजना शासनाकडे पाठविण्यात येत आहेत. सर्वसामान्य नागरिकांनाही सोय चांगली आहे. विविध कार्यालयात न जाता एखादी योजना ही ऑनलाईन पद्धतीने भरल्यास अनेकांचा वेळ वाचत आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या अनेक योजना या ऑनलाईन पद्धतीनेच भरल्या जात आहेत. राज्य सरकारची मुख्यमंत्री लाडके बहीण योजना, शेतीच्या विविध योजना, शालेय योजना, ज्येष्ठ नागरिकांच्या योजना, शेतकऱ्यांच्या योजना, पीक विमा योजना, पोस्टाच्या योजना अशा अनेक योजना या ऑनलाईन पद्धतीने भरावा लागत आहेत. अक्कलकोट तालुक्यात शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी महा-ई-सेवा तसेच सीएससी सेंटरवर गर्दी होत आहे. पण सर्व्हर व्यवस्थित नसल्याने या योजनांपासून अनेकांना वंचित राहण्याची वेळ येणार आहे. सर्व्हर नसल्याने योजनांची माहिती भरताना व्यत्यय येत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. योजना झाल्या उदंड आणि सर्व्हर मात्र थंड अशी म्हण नव्याने निर्माण होण्याची शक्यता अनेकांनी व्यक्त केली आहे. शासनाच्या अनेक योजनांचा लाभ घेण्यासाठी सर्वसामान्य नागरिक, महिला वर्ग, शालेय विद्यार्थी हे महा-ई-सेवा केंद्र तसेच सीएससी सेंटरवर गर्दी करत आहेत. पण ऑनलाईन अर्ज भरताना सर्व्हर नसल्याने विलंब होत आहे. यामुळे नागरिकांवर मनस्तापाची वेळ येत आहे.

> **तर अडचणी येणार नाहीत**
>
> प्रशासनाने सर्व्हर व्यवस्थित २४ तास जर दिला तर अनेक योजनांचे अर्ज भरताना नागरिकांना कोणतीच अडचण येणार नाही. प्रशासनाने सर्व्हर सुरळीत करून नागरिकांची सोय करावी, अशी मागणी अक्कलकोट शहर व तालुक्यातील नागरिकांतून केली जात आहे.

# मुलींच्या नावे १५ हजारांची मुदत ठेवींचा संकल्प : आनंदा माने

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २ ऑगस्ट-**

गटनेते व राजमाता प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आनंदा माने यांनी आपल्या ३ ऑगस्ट रोजी वाढदिवसादिवशी सांगोला शहर व तालुक्यात जन्मलेल्या मुलींच्या नावे प्रत्येकी १५ हजार रुपयांची मुदत ठेव ठेवण्याचा संकल्प केला आहे.



मुलीच्या जन्माचे स्वागत व्हावे, समाजात मुलगा व मुलगी असा भेदभाव होऊ नये, मुलगा व मुलगी एक समान मानावे या उदात्त हेतूने हा संकल्प केला आहे. सन २०१६ ते २०२३ या कालावधीमध्ये ३ ऑगस्ट रोजी वाढदिवसादिवशी जन्मलेल्या ३१ मुलींच्या नावे एकूण ३ लाख ४८ हजार रुपये ठेव ठेवून सामाजिक उपक्रम व संकल्प पूर्ण केला आहे. तसेच निसर्गाचे संवर्धन व्हावे व निसर्गाचा समतोल राहावा यासाठी वाढदिवसादिवशी मान्यवरांच्या हस्ते सांगोला शहरातील प्रमुख ठिकाणी वृक्षारोपण करण्यात येणार आहे, अशी माहिती आनंदा माने यांनी दिली आहे. तालुक्यात ३ ऑगस्ट २०२४ रोजी ज्या कुटुंबामध्ये मुलीचा जन्म झाला आहे, त्यांनी डॉक्टरांचा जन्माचा दाखला व मुलीचा जन्म घरी झाला असल्यास तशा प्रकारचा पुरावा माहितीसाठी द्यावा. मुलीच्या जन्माची नोंद करण्यासाठी राशन कार्ड, मुलीच्या आईचे व वडिलांचे आधार कार्ड झेरॉक्स व आईचे आयडेंटी साईज २ फोटो ५ ऑगस्टपर्यंत राजमाता प्रतिष्ठान कार्यालय, ग्रामीण रुग्णालयाशेजारी सांगोला येथे जमा करावे असे आवाहन आनंदा माने केले आहे. मुलीच्या नावे ठेवण्यात आलेली सदरची ठेव मुलीला १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर पालकांना दिली जाणार आहे.

# शैक्षणिक प्रगतीमध्ये विद्यापीठाचे मोठे योगदान : खेडगी

**खेडगी महाविद्यालयात सोलापूर विद्यापीठाच्या वर्धापन दिनी कार्यक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २ ऑगस्ट**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी यांनी केले. सी. बी. खेडगी महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा २० वा वर्धापन दिन सोहळा उत्साहात संपन्न झाला, याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. शिवराय आडवीतोट, उपप्राचार्या प्रा. वैदेही वैद्य, पर्यवेक्षक प्रा. संजय कलशेट्टी, कार्यालयीन प्रमुख सुहास होटकर उपस्थित होते. प्रारंभी विद्यापीठाचे ध्वजारोहण करण्यात आले. दिवंगत कवी दत्ता हलसंगीकर यांनी रचलेल्या विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रतिमा पूजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. शिवराय आडवितोट यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ.गणपतराव कलशेट्टी यांनीकेले. सूत्रसंचालन समन्वयक डॉ. किशोर थोरे यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. गुरुलिंगय्या स्वामी यांनी आभार मानले.

# माझी लाडकी बहिण योजनेचा लाभ द्यावा

## आ. समाधान आवताडे यांचे आवाहन

## मंगळवेढ्यात महसूल पंधरवड्याचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २ ऑगस्ट-**

शासनाकडून प्रत्येक समाजातील घटकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. सध्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेत अर्ज भरण्याची प्रक्रिया प्रभावीपणे सुरु आहे. या योजनेत पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यात जवळपास ९८ हजार ८५६ अर्ज भरुन घेण्यात आले आहेत. अजून उर्वरित पात्र महिलांचे अर्ज भरुन घेण्याची कार्यवाही प्राधान्याने पूर्ण करुन जास्तीत-जास्त पात्र महिलांना या योजनेचा लाभ द्यावा असे आ. समाधान आवताडे यांनी सांगितले.

महसूल पंधरवडा व मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा शुभारंभ तहसिल कार्यालय मंगळवेढा येथे आ. समाधान आवताडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसिलदार सचिन लंगुटे, मदन जाधव, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, योगेश कदम, मुख्याधिकारी चरणराज कोल्हे, महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी समाधान नागणे, वर्षा पाटील, जगन्नाथ गारोळे तसेच पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील संबधित अधिकारी उपस्थित होते.



प्रांताधिकारी सचिन इथापे म्हणाले, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेची मुदत ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत वाढविण्यात आली असून, या योजनेतून एकही पात्र महिला वंचित राहू नये तसेच या यो याबाबत दक्षता घ्यावी. मंगळवेढा व पंढरपूर तालुक्यात या योजनेबाबत संबधित यंत्रणा चांगले काम करीत असल्याचेही त्यांनी सांगितले.

तहसिलदार सचिन लंगुटे म्हणाले, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेत पंढरपूर तालुक्यात ६३ हजार ८६० ऑनलाईन अर्ज दाखल झाले असून, आतापर्यंत १० हजार अर्ज मंजूर करण्यात करण्यात आले असून, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने तालुक्यातील जास्तीत-जास्त महिलांना रक्षाबंधन दिवशी लाभ देण्यात येईल. तालुक्यातील एकही पात्र महिला या योजनेपासून वंचित राहू नये यासाठी ५९२ अंगणवाडी सेविकांडून सर्वेक्षण करण्यात येत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी कांचन सिध्देश्वर मोहिते या महिलेचा अर्ज स्वतः आ. समाधान आवताडे यांनी भरला.

> **मंगळवेढ्यात ३५ अर्ज दाखल**
>
> मंगळवेढा तालुक्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेत ३४ हजार ९९६ अर्ज प्राप्त झाले असून, आतापर्यंत ३ हजार ९८२ अर्ज मंजूर करण्यात आल्याचे तहसिलदार मदन जाधव यांनी सांगितले. महसूल विभागाचा महसूल पंधरवडा १ ते १५ ऑगस्टदरम्यान साजरा होत असून महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या सेवा आणि विभागांद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांबाबतची माहिती तहसिलदार जाधव यांनी यावेळी दिली.

# अण्णा भाऊंच्या मानवतावादाची आज गरज

## पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ ऑगस्ट-**

अण्णा भाऊंनी त्यांच्या आयुष्यामध्ये साहित्याच्या माध्यमातून विविध गीते, पोवाडे, लावण्या, कादंबऱ्या यांचे लेखन केले आहे. अण्णाभाऊंचे साहित्य जगण्याची दिशा, मानवतावादाची भूमिका मांडते. अण्णाभाऊंच्या मानवतावादाची आज समाजाला गरज आहे. अण्णाभाऊंचे साहित्य समाजातल्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचवण्याच्या प्रयत्न झाला पाहिजे, असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

पुण्यातील कर्वे नगर परिसरात अण्णा भाऊ साठे जयंतीच्या निमित्ताने मुक्ता प्रकाशन आयोजित पुस्तक भेट कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी मंत्री पाटील यांनी ए. आय. प्रतिमांची पाहणी केली आणि समाधान व्यक्त केले. पाटील म्हणाले, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (ए. आय.) अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता हे तंत्रज्ञान ही नव्या जगाचं देणं आहे. त्याचा सकारात्मक स्विकार करुन आपण महापुरुषांची चरित्र पुढे आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. संजय कांबळे यांनी 'चित्रमय लोकशाहीर अण्णाभाऊ साठे' या पुस्तकाच्या माध्यमातून अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनातील महत्वाच्या घटना टिपल्या आहेत. हे पुस्तक अण्णाभाऊंचा इतिहास सांगते. अशा नवकार्यासाठी शासन मदत करीत आहे. या कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार राजा माने आणि महाराष्ट्र शासनाचे अण्णा भाऊ साठे पुरस्कार प्राप्त श्रीधर कांबळे यांनी समयोचित विचार व्यक्त केले. यावेळी डॉ. संदिप भुटाला, अतुल दीक्षित, सतीश झोंबाडे, मुक्ता प्रकाशनच्या संचालिका सविता कांबळे, स्नेहल कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रास्ताविक वैभव चव्हाण आणि आभार प्रदर्शन महेश महामुनी यांनी केले.



> **फिरत्या ग्रंथालयाद्वारे पुस्तक राज्यात पोहचवणार**
>
> चंद्रकांत पाटील यांनी 'चित्रमय लोकशाहीर अण्णाभाऊ साठे' या पुस्तकाच्या प्रती फिरत्या ग्रंथालयाच्या माध्यमातून महाराष्ट्रभर पोहचवण्याचे जाहीर केले. या कार्यक्रमात त्यांनी पुस्तकाचे लेखक संजय कांबळे यांचे कौतुक केले.

# बार्शीत आण्णा भाऊ साठेंच्या जीवनावरील चित्रफितीचे प्रदर्शन

## विविध संस्था, संघटनांच्या वतीने अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ ऑगस्ट-**

लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विविध संघटनांनी त्यांना अभिवादन केले. बार्शीच्या न्यायालयासमोर असलेल्या पुतळ्यासमोर अण्णाभाऊंना अभिवादन करण्यासाठी सकाळपासूनच रीघ लागली होती. बार्शी नगरपरिषदेच्यावतीने मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण यांच्या हस्ते अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. आण्णा भाऊंच्या जीवनपटावरील चित्रफितींचे प्रदर्शनचे दाखविण्यात आले.

आ. राजेंद्र राऊत यांनी देखील न्यायालयासमोरील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. जुना गांधी पुतळा चौक येथे दलित महासंघाच्यावतीने अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन करण्यात आले. पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रम सावळे, उद्योजक शशांक गुगळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी ॲड. अमोल अलाट यांचा केंद्र सरकारच्या नोटरीपदी नियुक्ती झाल्याबद्दल पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी सत्कार केला. याप्रसंगी ॲड. शंकर ननवरे उपस्थित होते. सायंकाळी आनंद चांदणे यांच्या नेतृत्वाखाली लहुजी चौक येथून लहुजी ग्रुपच्यावतीने सवाद्य मिरवणूक काढण्यात आली तर अण्णा भाऊ साठे चौक या ठिकाणी राजेंद्र गायकवाड मित्र मंडळाच्या वतीने अण्णा भाऊ साठे यांचा जीवनपटावरील चित्रफितींचे प्रदर्शन आयोजित केले होते. कार्यक्रमास संदीप अलाट, निलेश खुडे, सत्यजित खलसे, हरी कांबळे, अण्णा वाघमारे, पांडुरंग देवकुळे, तानाजी शेंडगे, संतोष कांबळे, संगीतराव शिंदे, महादेव भिसे, चाणक्य अलाट, विधान अलाट, सारंग अवघडे उपस्थित होते.



# मातृभाषेबरोबरच इंग्रजीवर प्रभुत्व मिळवा : जयवंत नलवडे

## लिलाताई दिवेकर इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २ ऑगस्ट-**

शालेय जीवनात मातृभाषेबरोबरच इंग्रजी संभाषण कौशल्य आत्मसात केल्यास भविष्यात विविध संधी निर्माण होऊ शकतात, असे प्रतिपादन गटशिक्षणाधिकारी जयवंत नलवडे यांनी केले.

इंग्लिश टीचर्स असोसिएशनच प्रमुख सल्लागार प्रा. गणेश करे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यशकल्याणी सेवाभावी संस्था, पंचायत समिती शिक्षण विभाग व करमाळा तालुका इंग्लिश टीचर्स असोसिएशनतर्फे आयोजित लिलाताई दिवेकर इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेच्या पारितोषिक वितरणप्रसंगी ते बोलत होते. या स्पर्धेत करमाळा तालुक्यातील पाचवी ते दहावीतील २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. याप्रसंगी शिक्षणविस्तार अधिकारी नितीन कदम, जिल्हा इंग्रजी असोसिएशनचे अध्यक्ष बाळकृष्ण लावंड, सचिव धनाजी राऊत, बार्शी पं. स. विषयतज्ज्ञ तोरड, करमाळा तालुका इंग्रजी असोसिएशनचे अध्यक्ष कल्याणराव साळुंके, सचिव गोपाळराव तकीक, रेवण्णाथ आदलिंग, मुख्याध्यापक नीळ उपस्थित होते. सूत्रसंचालन बाळकृष्ण लावंड, सुखदेव गिलबीले यांनी केले तर आभार सहसचिव मारूती जाधव यांनी मानले. विजयी स्पर्धकांच यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. गणेश करे-पाटील यांनी अभिनंदन केले.



> **स्पर्धेतील विजेते वक्ते अन् शाळा**
>
> **गट- पाचवी, सहावी :** प्रथम- स्वरा प्रवीण कुलकर्णी साडे हायस्कूल साडे, द्वितीय- तेजस्वी सुरेश गव्हाणे रा. बा. सुराणा हायस्कूल चिखलठाण, तृतीय-पारस नवनाथ भंडारे जि. प. शाळा खंडागळेवस्ती, चतुर्थ-राजवीर अजिनाथ घाडगे गुरुकुल पब्लिक स्कूल देवीचामाळ, पाचवा-शिवन्या संदीप ढेरे, छ. शिवाजी हायस्कूल वीट.
>
> **गट-सातवी, आठवी :** प्रथम- सान्वी अतुल पोळ, अण्णासाहेब जगताप विद्यालय करमाळा, द्वितीय-वैभव अरुण कोकरे त्रिमूर्ती विद्यालय टाकळी, तृतीय-संध्याराणी श्रीकृष्ण लबडे न्यू ईरा पब्लिक स्कूल चिखलठाण, चतुर्थ-रझान शब्बीर आतार अण्णासाहेब जगताप विद्यालय करमाळा, पाचवा-वरद जयंत देशमुख गुरुकुल पब्लिक स्कूल देवीचामाळ, उत्तेजनार्थ-अनन्या दत्तप्रसाद मंजरतकर भारत हायस्कूल जेऊर.
>
> **गट- नववी, दहावी :** प्रथम -अपूर्वा जनार्दन पवार गिरधरदास देवी विद्यालय करमाळा, द्वितीय-प्रगती किशोर चव्हाण साडे हायस्कूल साडे, तृतीय-प्रांजली बाळकृष्ण लावंड म. गांधी विद्यालय करमाळा, चतुर्थ-आरती अरुण कोकरे त्रिमूर्ती विद्यालय टाकळी, पाचवा-आलिशा अस्लम शेख श्री कमलादेवी कन्या विद्यालय करमाळा, उतेजनार्थ-गिरिजा बाळकृष्ण टेके, श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल कोर्टी.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## हृदयविकाराच्या झटक्याने दहावीच्या विद्यार्थ्याचा मृत्यू

**इंदापूर, दि. २ ऑगस्ट-**

वर्ग सुरु असतानाच हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने दहावीतील विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू झाला. आज दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास शहरातील श्री नारायणदास रामदास हायस्कूलमध्ये ही दुर्दैवी घटना घडली.



प्रथमेश विकास खबाले (वय १६ वर्षे,रा. भाटनिमगाव,ता.इंदापूर) असे या दुर्दैवी विद्यार्थ्याचे नाव आहे. श्री नारायणदास रामदास हायस्कूलची दुपारची शिफ्ट भरल्यानंतर सामूहिक प्रार्थना झाली. प्रथमेश त्याच्या वर्गात गेला. बाकावर बसल्यानंतर त्याला अचानक घाम फुटला. चक्कर येवून तो बेशुद्ध झाला. ही बाब वर्ग शिक्षकांच्या लक्षात आल्यानंतर प्रथमेशला मोकळ्या हवेत आणले. शिक्षकांनी त्याच्या हृदयाला पंपिंग केले. मात्र काहीच उपाय झाला नाही. त्याला तातडीने दवाखान्यात नेण्यात आले. तपासल्यानंतर त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. त्यानंतर शवविच्छेदनासाठी त्याचा मृतदेह उपजिल्हा शासकीय रुग्णालयात नेण्यात आला. आम्ही शिक्षकांनी प्रथमेशचा जीव वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न केला मात्र तो वाचला नाही. त्याला कोणता आजार असल्याचे कधी दिसले नाही, असे मुख्याध्यापक संजय सोरटे यांनी सांगितले.



### संक्षिप्त वृत्त...



### श्रीपूर व्यापार मंडळातर्फे आण्णा भाऊ साठे यांची जयंती साजरी

**श्रीपूर, दि. २ ऑगस्ट-**

साहित्यरत्न आण्णा भाऊ साठे यांची जयंती श्रीपूर व्यापार मंडळाच्या वतीने साजरी करण्यात आली. याप्रसंगी युवक राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) चे नेते शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते साहित्यरत्न आण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी महाळुंग नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष भीमराव रेडे-पाटील, शिवशंकर बजारचे सचालक अनिल मुंडफणे, नगरसेवक रतनसिंह रजपूत, सागर यादव, नितीन जाधव, माजी जि. प. सदस्य अभिमान गाडे, रशिद मुलाणी, मंडळाचे अध्यक्ष महादेव खंडागळे, व्यापर मंडळाचे स्वप्निल बेंगळे, जालिंदर खरात, शैलेश शेंडगे, शंकर दिघे, इम्रान शेख, जावेद शिकलकर, प्रथमेथ लोंढे, लखन कारंडे, किरण खंडागळे, नौशाद शिकलकर, चंद्रकांत शिंदे, दादा भुसनर उपस्थित होते. आभार जयंती मंडळाचे अध्यक्ष महादेव खंडागळे यांनी मानले.




### मंगळवेढ्यात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**मंगळवेढा, दि. २ ऑगस्ट-**

उदयसिंह मोहिते-पाटील विद्यालयात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी स्नेहल होनमाने, मुख्यध्यापक सुधीर पवार यांनी अण्णा भाऊंच्या सामाजिक आणि साहित्यिक कार्याचा उल्लेख केला. अण्णा भाऊ साठे हे फक्त एकच दिवस शाळेत गेले होते. परंतु त्यांनी मराठी साहित्य, सांस्कृतिक क्षेत्रात आपल्या क्रांतिकारी लिखाणानं इतिहास घडवला. कलावंत म्हणून त्यांनी लोकनाट्य, नाटक, चित्रपटातून उत्कृष्ट भूमिकाही केल्या होत्या. ते अष्टपैलू साहित्यिक, कलावंत होते. 'इंडियन पिपल्स थिएटर असोसिएशन' या सुप्रसिद्ध पुरोगामी नाट्य संस्थेचे ते अखिल भारतीय अध्यक्षही होते. सूत्रसंचालन अपर्णा शिंदे यांनी केले.



### हनुमान विद्यालयात टिळक, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन

**सांगोला, दि. २ ऑगस्ट-**

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल व्यक्तिमत्त्व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा स्मृतिदिन आणि साहित्यिक लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांची जयंती हनुमान विद्यालय, वासुद येथे उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथम प्रतिमेचे पूजन व पुष्पहार कडलास हायस्कूलचे ग्रंथपाल विजयकुमार गायकवाड यांच्या हस्ते अर्पण करण्यात आले. शिक्षक शिंदे यांनी लोकमान्य टिळक व लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या जीवनातील अनेक प्रसंग सांगितले. प्रास्ताविक व आभार अशोक व्हटे यांनी मानले.



### बार्शीच्या कर्मवीर सार्वजनिक वाचनालयात आण्णा भाऊ साठे जयंती साजरी

**बार्शी, दि. २ ऑगस्ट-**

येथील कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालयात साहित्यसम्राट लोकशाहीर कॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. प्रथम प्रमुख मान्यवरांचे हस्ते प्रतिमांचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. यावेळी भागवत बोबडे, सुहास सुतार, पांडुरंग आस्वदे, दत्तात्रय मिटे, निलेश आस्वादे, चंद्रकांत पवार, हनुमंत तुपे यांच्यासह सभासद, वाचक उपस्थित होते. ग्रंथपाल विनोद गायकवाड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले.

# अखेर मुख्यमंत्र्यांचा स्थगिती आदेश

## निर्णयामुळे अनगर अप्पर तहसील कार्यालयाचा वाद, संघर्ष मिटला

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २ ऑगस्ट-**

मोहोळ तालुक्यातील अनगर हे मध्यवर्ती आणि इतर भागासाठी सोयीचे ठिकाण असल्याचे भासवून आणि खोटी, दिशाभूल करणारी कागदपत्रे, माहिती सादर करून अपर तहसील कार्यालय मंजूर करून घेण्यात आले होते. मात्र, जनतेच्या साथीने संघर्ष समितीने प्रस्थापितांचा हा कुटील डाव हाणून पाडला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अपर तहसील कार्यालास तात्काळ स्थगिती दिल्यामुळे संपूर्ण तालुक्यातील तणाव निवळला असल्याची माहिती शिवसेना नेते तथा उद्योजक राजाभाऊ खरे यांनी दिली.

अनगर येथे अपर तहसील कार्यालय मंजूर झाल्याचा शासन निर्णय येताच तालुक्यात असंतोष निर्माण झाला होता. हा निर्णय तात्काळ रद्द करण्यासाठी मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीची स्थापना करण्यात आली होती. आ.भरत गोगावले यांच्या माध्यमातून मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. याविषयीची वस्तुस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. अनगर ऐवजी योग्य ठिकाणी अपर तहसील व्हावे, अशी मागणी केल्यानंतर मुख्यमंत्री शिंदे यांनी स्थगिती दिली आहे. आगामी काळातही अशा प्रकारचा अन्याय खपवून घेणार नाही. थेट मुख्यमंयांच्या माध्यमातून जनतेला सदैव न्याय मिळवून देण्यास कटिबद्ध राहणार असल्याचे खरे यांनी सांगितले.

### हुकुमशाही, तानाशाही मोडायची आहे



अनगर हे सोयीचे ठिकाण असल्याचे भासवून शासनाची दिशाभूल केली गेली होती. याबाबत मोहोळ तालुका बचाव संघर्ष समितीने मला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वेळ घेण्यास सांगितले होते. त्यानुसार आम्ही मुख्यमंत्र्यांना भेटून शासनाचा निर्णय अत्यंत चुकीचा, जनतेच्या हितास हानिकारक असल्याचे दाखवून दिले. प्रस्थापितांची दादागिरी, तानाशाही जनता खपवून घेणार नाही, हे आम्ही स्पष्टपणे मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यावरून मुख्यमंत्र्यांनी तात्पुरती स्थगिती देत फेरसर्वेक्षण करण्याचे आदेश दिले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व आ. भरत गोगावले यांचे अनंत उपकार मोहोळ व पंढरपूरकरांवर राहतील.

**-राजाभाऊ खरे, उद्योजक**



## मराठा समाजाच्या रॅलीबाबत बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २ ऑगस्ट-**

सकल मराठा समाजाच्या वतीने सोलापूर येथे काढण्यात येणाऱ्या शांतता रॅलीत माढा परिसरातून ३० ते ४० हजार लोकांचा सहभाग करण्याचा निर्णय माढ्यात घेण्यात आला.

यावेळी दारफळ सिना, उपळाई खुर्द, निमगाव, शिंदेवाडी, वडशिंगे, राहुलनगर, उंदरगाव केवड, जाधववाडी मा, रणदिवेवाडी, सापटणे मा, उपळाई बुद्रुक, विठ्ठलवाडी, वाकाव, उंदरगाव, वेताळवाडीसह परिसरातील उपस्थित होते. यावेळी दादासाहेब साठे, झुंजार भांगे, शंभूराजे चवरे, शंभूराजे साठे, डॉ.राजकुमार आडकर, दत्तात्रय शिंदे, ॲड. विजयकुमार आडकर, संदिप शिंदे, संदीप पाटील, बबन पाटील, मदन मुंगळे, हर्षल बागल, रूपेश आडकर, अमर गायकवाड, आबा साठे, अमर पालकर, नागेश देशमुख, अनिल कदम, बाळासाहेब चव्हाण, शिवाजी चव्हाण, नागनाथ मुकणे, विशाल जाधव, दीपक गव्हाणे, श्रीकृष्णा डुचाळ, राहुल मस्के, प्रवीण यादव, लहू बोराडे यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन डी. व्ही. चवरे यांनी केले.

## लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करावे

### आ. शहाजीबापू पाटलांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २ ऑगस्ट-**

जगात वेगवेगळ्या पद्धतीने राज्यक्रांती झाली आहे. बंदुकीच्या नळीच्या जोरावर क्रांती घडली आहे, लोकशाहीच्या आंदोलनातून क्रांती घडली आहे. परंतु, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी विचारातून आणि लिखाणातून सामाजिक क्रांती केली. त्यांच्या विचारांचा धागा पिढ्यानपिढ्या तेवत राहिला आहे. वंचितांची आर्त हाक प्रस्थापितांच्या कानावर आदळावी आणि वंचित समाजाला न्याय मिळावा यासाठी आपलं उभं आयुष्य मानवतेसाठी व शोषणमुक्त समाजासाठी समर्पित करणाऱ्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न सर्वोच्च नागरी पुरस्कारानं सन्मानित करण्यात यावं, असे मत आ. शहाजीबापू पाटील यांनी व्यक्त केले.



साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिम्मित त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना ते बोलत होते. यावेळी दामोदर साठे, विनोद रणदिवे, बापूसाहेब ठोकळे, किशोर बनसोडे, सागर पाटील, गुंडादादा खटकाळे, अमित साठे, सचिन रणदिवे, भिवा भोसले, बाळासाहेब रणदिवे, महादेव कांबळे आदी उपस्थित होते.

## स्वातंत्र्य दिनानंतरच गणवेश मिळणार का?

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २ ऑगस्ट-**

शिक्षण मंत्री दिलीप केसरकर यांनी 'एक राज्य एक गणवेश' योजना जाहीर केली. शाळेच्या पहिल्या दिवशी गणवेश मिळणे अपेक्षित होते. अद्यापही राज्यातील विद्यार्थ्यांना गणवेश मिळाले नाही. स्वातंत्र्य दिनानंतर गणवेश मिळणार का? असा सवाल उपस्थित होत आहे. यासाटी संभाजी ब्रिगेडने आंदोलनाचा इशारा दिला आहे.



राज्य सरकारने गणवेश बनवण्याचं कंत्राट महाराष्ट्र सोडून गुजरातच्या कंत्राट दाराला दिल्यामुळे त्यांनी अजून गणवेश बनवलेले नाहीत. या बद्दल संपूर्ण माहिती सचिन जगताप यांनी घेतली आहे. यावर्षीचा स्वातंत्र्य दिन अर्थात १५ ऑगस्ट रोजी राज्यातील सर्व शाळकरी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिन जुन्या कपड्यावरच करावा लागेल अशी चित्र स्पष्ट आहे. सरकारला गुजरातचं भलं करायचं असल्यामुळे राज्यातील गणवेश बनवणाऱ्या लोकांवर अविश्वास दाखवून गणवेशापासून वंचित ठेवण्याचासुद्धा हा प्रकार दिसतो आहे हे निश्चाधार्ह आहे. शिक्षण उपसंचालकांच्या कार्यालयात निवेदन देण्यात आले. यावेळी शिक्षण सहउपसंचालक पूजा सोळुंके यांनी ते स्वीकारले. यावेळी संतोष शिंदे, सचिन जगताप, उत्तम कामठे, चंद्रशेखर घाडगे, अविनाश मोहिते, अशोक फाजगे, तेजश्री पवार, अश्विनी सोनवणे, उद्योग आघाडी सचिव संतोष कराळे, जिल्हा कार्याध्यक्ष साजिद सय्यद, पर्वती महिला आघाडी अध्यक्षा अर्चना गव्हाणे, जिल्हा संघटक रेखा कामठे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## बार्शीत लाडकी बहिण योजनेचा शुभारंभ

**बार्शी, दि. २ ऑगस्ट-**

महसूल दिनानिमित्त बार्शी तहसील या ठिकाणी लाडकी बहीण योजनेचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमासाठी समितीचे अध्यक्ष रणवीर राजेंद्र राऊत तहसीलदार शेख, अप्पर तहसीलदार केसकर, निरंजन भूमकर, संदीप मिरगणे व बार्शी शहर तालुक्यातील अंगणवाडी सेविका उपस्थित होते. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना प्रभावीपणे राबवण्यात सर्वात मोठा वाटा असणाऱ्या अंगणवाडी सेविकांचे अभिनंदन करण्यात आले. सदर कार्यक्रमामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी योजनेचा आढावा घेण्यात आला. ८ लॉगिन आय. डी. च्या माध्यमातून पात्र माता भगिनिंचे अर्ज अप्रोवल करण्याची प्रोसेस गतिमान करण्यात आली आहे. इंग्रजीची अर्ज दाखल करण्याची अट रद्द करण्यात आल्याचे देखील सूचना या मिटींगमध्ये देण्यात आल्या. आधार कार्ड लॉगिन बँकसाठी इंग्रजी अर्ज बंधनकारक केले होते. परंतु काल महायुती सरकारने इंग्रजीमध्ये अर्ज दाखल करण्याची अट रद्द केली आहे. तरी मराठीमध्ये अर्ज दाखल केलेल्या कोणत्याही माता भगिनींनी काळजी करु नये.



## सय्यद दातापीर शाह कादरी (रहे.) दर्गाहचा उरुस साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २ ऑगस्ट-**

अक्कलकोट शहराजवळील अक्कलकोट सोलापूर रोडजवळ असणाऱ्या अस्ताना सय्यद दातापीर शाह कादरी (रहे.) दर्गाहचा ७९ वा उरूस मोठ्या भक्ती भावाने साजरा करण्यात आला. यावेळी हजारो भाविकांनी सय्यद दातापर शाह कादरी दर्गाह (रहे.) येथे दर्शनासाठी गर्दी केली होती. ऊर्सनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले.



सालाबदाप्रमाणे याही वर्षी आसताना सय्यद दातापीर शाह कादरी (रहे.) दर्गाहचा ७९ व्या ऊर्स निमित्त दिनांक २८ जुलै रोजी संदल (गंध) मिरवणूक अक्कलकोट शहरातून काढण्यात आली. दिनांक २९ जुलै रोजी चिराग (दीपोत्सव) साजरा करण्यात आला. दिनांक ३० जुलै रोजी जियारत (दर्शन) असे विविध कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी हजरत सय्यद शाह दातापीर शाह कादरी किबुला सज्जादा नशीन, हजरत सय्यद शाह मस्तूर शाह कादरी किबला सज्जादा नशीन, हजरत सय्यद शाह गौसपीर कादरी, हजरत सय्यद शाह हुसेन पीर चिस्ती, हजरत सय्यद शाह सज्जाद हुसेनी (मानवी कर्नाटक) हजरत सय्यद शाह तलहापीर कादरी (लावबाली कर्नाटक) आदी धर्मगुरूंची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. ऊर्स निमित्त धार्मिक प्रवचन सोहळा पार पडला. देशात सुख समृद्धी शांती बंधुभाव नांदावे. सर्व प्राणिमात्रा सुखी व्हावे यासाठी प्रार्थना करण्यात आली. ऊर्स निमित्त दर्गाहमध्ये चार दिवस महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कर्नाटक महाराष्ट्र व विविध राज्यातून आलेल्या हजारो भाविकांनी दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतला. विविध धार्मिक कार्यक्रमाने आसताना हजरत सय्यद शाह दातापीर शाह कादरी (रहे.) दर्गाह उरूस भक्तिभावाने संपन्न झाला. यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, अश्पाक बळोरगी, महबूब हुसेन बळुर्गी, रजाक सय्यद आदीसह विविध मान्यवरांनी दर्शन घेतले. या ऊर्सनिमित्त हाफिज फुरखान नक्शबंदी, सत्तार बळोरगी, सैपन चोपदार, दाता बळोरगी, रफिक पठाण, मुर्तूज बाजे ताकीर दरेखा आदींसह विविध भाविकांनी परिश्रम घेतले.

# 'कर्मयोगी दीपस्तंभ' पुरवणीचे थाटात प्रकाशन

### दै. 'तरुण भारत'च्या अंकाचे भरभरून कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. २ ऑगस्ट-**

मराठवाड्याचे प्रति साने गुरुजी, शिक्षण महर्षी स्व. सि. ना. आलुरे गुरुजी यांच्या तृतीय स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या जीवन कार्यावर आधारित सोलापूर 'तरुण भारत'ने काढलेल्या,'कर्मयोगी दीपस्तंभ' पुरवणीचे मान्यवरांच्या हस्ते थाटात प्रकाशन करण्यात आले.प्रारंभी

आलुरे परिवाराच्या वतीने गुरुजींच्या समाधीचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर विविध सामाजिक उपक्रमाचे वितरण करण्यात आले. 'तरुण भारत' विशेषांकाचे प्रकाशन श्री ष. ब्र. शिवयोगी शिवाचार्य महास्वामी, माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, रामचंद्र आलुरे, महादेवप्पा आलुरे, चं. सि. आलुरे गुरुजी, मारुती खोबरे गुरुजी, नीलकंठ नरे गुरुजी, ॲड. लक्ष्मीकांत पाटील, ॲड. नागनाथ कानडे, तरुण भारतचे निवासी संपादक प्रशांत माने, मराठवाडा विभागाचे आवृत्ती प्रमुख राजाराम मस्के, प्रतिनिधी अजय अनदुरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात समाधीस्थळी उज्ज्वला व शामराव आलुरे सपत्नीक विधिवित्त पूजनाने व बसवराज शास्त्री यांच्या मंत्रपठणाने करण्यात आले. जवाहर विद्यालयाचे विद्यार्थी 'खरा तो एकचि धर्म, जगाला प्रेम अर्पावे,' बलसागर भारत होवो, विश्वात शोभुनी राहो' हे गीत गाऊन अभिवादन केले. विद्यार्थी हेच गुरुजींसाठी दैवत होते म्हणून गरीब होतकरू विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले. जवाहरचे माजी विद्यार्थी बसवेश्वर निसरगुंडे यांनी साऊंड सिस्टिम भेट दिल्यामुळे सत्कार करण्यात आला. डॉ. मल्लिनाथ बिराजदार लिखित 'संस्काराचे विद्यापीठ' शिक्षण महर्षी सि. ना. आलुरे गुरुजी यांच्या जीवनावर आधारित पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी दीपक आलुरे, काशिनाथ शेटे, शिवाजी कांबळे, धनराज मुळे, मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी, विविध संस्थांचे सभासद, गुरुजन वर्ग, गुलाब डोंगरे उपस्थित होते.



# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## भारत विद्यालयात बालविवाह जनजागृती कार्यक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३१ जुलै -**

भारत शिक्षण संस्था संचलित भारत विद्यालय उमरगा येथे शुक्रवारी बालविवाह निर्मूलन जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक शाहूराज जाधव होते तर प्रमुख पाहुणे म्हणून आयेशा औटी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.लहान वयात लग्न केल्याने संपूर्ण समाजात मागासलेपणा येतो. जी शेवटी समाजाच्या प्रगतीत अडथळा ठरते. कायद्यात लग्नाचे वयही निश्चित करण्यात आले आहे. जर मुलीचे वय १८ वर्षांपेक्षा कमी किंवा मुलाचे वय २१ वर्षांपेक्षा कमी असेल, तर अशा विवाहाला बालविवाह म्हटले जाते असे प्रतिपादन आयेशा यांनी केले. प्रशालेचे पर्यवेक्षक विक्रांत मोरे, पर्यवेक्षक संजय देशमुख यांच्या प्रमुख



उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम पार पडला

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यंकट गुंजोटे यांनी केले.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### परंडा येथे दिव्यांग तपासणी कॅम्प संपन्न

**परंडा, दि.२ ऑगस्ट -**

परंडा तालुक्यातील दिव्यांग बांधवांना दिव्यांग प्रमाणपत्र मिळावे. कोणीही दिव्यांग प्रमाणपत्र पासून वंचित राहू नये यासाठी दिव्यांग उद्योग समूहाच्या पाठपुराव्यातून दिव्यांग तपासणीचे आयोजन जिल्हा शैल्य चिकित्सक अधिकारी धाराशिव, उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय परांडा यांच्या संयुक्त विद्यमानाने २ ऑगस्ट रोजी उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय परांडा येथे दिव्यांग तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये अस्तिव्यंग दिव्यांग मनोरुग्न, अंध अशा प्रकाराची तपासणी करण्यात आली. ही तपासणी करण्यासाठी तज्ञ डॉ. स्वामी मनोरुग्ण विभागाचे डॉ. शेळके, अंध विभागाचे डॉ. महेश पाटील यांच्या टीमने कामकाज पाहिले यांना सहकार्य करणारे उपजिल्हा रुग्णालय येथील सर्व कर्मचारी उपस्थित होते.



### स्वराज्य कॉम्प्युटरमध्ये लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी

**धाराशिव, दि.२ ऑगस्ट -**

स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच अशी सिंह गर्जना करून इंग्रजांना सळो की पळो करणारे भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना पुण्यतिथीनिमित्त स्वराज्य कॉम्प्युटर ट्रेनिंग सेंटर येथे त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रा. संतोष पोतदार, मनोज यादव, नागनाथ दराडे, शरद करडे, ज्योती पोतदार, योगिता सलगरे, अजय टोले, अनिकेत कोळगे, सनी हेरेल, अर्जुन बारंगुळे, अनिरुद्ध पोतदार, अथर्व पोतदार आदी विद्यार्थी, पालक उपस्थित होते.



### तेरणा महाविद्यालयात अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

**धाराशिव, दि.२ ऑगस्ट -**

तेरणा महाविद्यालयात, राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे १ ऑगस्ट रोजी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रम प्रसंगी प्राचार्य डॉ. अशोक घोलकर यांच्या हस्ते साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी डॉ. चंद्रजीत जाधव, डॉ. अरुणा सावरगावकर, डॉ.डी.बी. मोरे, डॉ.जी.जी. हिडगे, डॉ. अनघा तोडकरी, प्रा. सुधाकर चव्हाण, प्रा. सुनील पाटील, प्रा. विजयकुमार साळुंके, प्रा. बालाजी काकडे, प्रा. छाया शिंदे, प्रा. शुभम काशीद, प्रा. संतोष जाधव, प्रा. अविनाश ताटे, विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



### जयप्रकाश विद्यालयात साठे जयंती व लोकमान्य टिळक स्मृती दिन साजरा

**धाराशिव, दि.२ ऑगस्ट -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक स्मृतिदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाष कोळगे यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार व श्रीफळ अर्पण करण्यात आले. याप्रसंगी भाजपचे रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, बालाजी कोळगे, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक जयप्रकाश कोळगे, शिवकन्या साळुंके, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपास्थित होते.



### येरमाळ्यात अण्णाभाऊ साठेंना अभिवादन

**येरमाळा, दि.२ ऑगस्ट -**

येरमाळा येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आ. कैलास पाटील, पीएसआय पवन निंबाळकर, शिवसेनेचे तालुका उपप्रमुख विलास थोरबोले, रणजीत कसबे, मुरहारी कांबळे, अनिल पवार, राहुल पाटील, सुरज कांबळे, सुंदर लोमटे, पांडू जाधवर, गोविंद मुंडे, भिवाजी शिरसाट, समाधान बाराते, बालाजी मुंडे, बापू बांगर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

## १३ वर्षीय पृथ्वीराजच्या अवयवदानामुळे मिळणार ६ जणांना जीवनदान

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२ ऑगस्ट -**

शहरातील काळे प्लॉट येथील मेंदू मृत झालेल्या १३ वर्षीय मुलाच्या आई वडिलांनी व नातेवाईकांनी मुलाचे अवयवदान करून सहा जणांना जीवनदान देवून समाजापुढे आदर्श ठेवला. गुरुवारी दि.१ रोजी अवयवदान केल्यानंतर उमरगा येथे दुर्दैवी मुलावर अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

उमरगा शहरातील काळे प्लॉट येथील माजी नगरसेविका सूनंदाबाई वरवंटे या वास्तव्यास असून त्यांच्या मुलगा बाळासाहेब यांचा १३ वर्षीय मुलगा पृथ्वीराज हा सोमवारी दि.२९ रोजी रोजच्यासारखे सकाळी सायकल खेळून परिसरात असलेल्या जि.प. शाळेत गेला. शाळेच्या सकाळच्या प्रार्थनेवेळी त्याला अचानक चक्कर येऊन पडल्याने उमरगा शहरातील खाजगी रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी सोलापूर येथील मेंदू विकार तज्ञ डॉ. प्रसन्ना कासेगावकर यांच्या



मयत : पृथ्वीराज

चंदन न्युरो सायन्सेस हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. यावेळी केलेल्या चाचण्यात पृथ्वीराज याचा मेंदू बंद पडल्याचे दिसून आले पण त्याचे बाकी सर्व अवयव काम करीत होते. त्यानंतर मेंदूच्या केलेल्या तपासण्यानंतर डॉ. कासेगावकर यांनी इतर मेंदू विकार तज्ञ डॉ. विनय जोशी, डॉ. निखिल नवले, डॉ. शरद जाधव सारख्यांचे मार्गदर्शन घेत पृथ्वीराज याचा मेंदू मृत झाल्याच्या निष्कर्षापर्यंत आले.त्यानंतर त्यांनी पृथ्वीराज याचे आई सुमन व वडील बाळासाहेब व नातेवाईकांना याबाबत माहिती दिली. त्यानंतर त्यांना अवयवदान करून कित्येक जणांना जीवनदान देता येईल याचीही जाणीव करून दिली. पृथ्वीराज याच्या आईवडिलांनी व नातेवाईकांनी पृथ्वीराज याची शारीरिक परिस्थिती स्वीकारत आपल्या मुलाचे अवयवदान करण्याचा निर्णय घेतला व लेखी संमती दिली. गुरुवारी दि.१ रोजी पृथ्वीराज यास उमरगा येथे दुपारी आणण्यात आले. यावेळी चंदन न्युरो सायन्सेस हॉस्पिटलची पथकाने कागदोपत्री सर्व प्रक्रिया पार पाडून पृथ्वीराज याचे दोन डोळे, दोन किडनी, दोन फुफ्फुस, यकृत व स्वादुपिंड असे अवयव काढण्यात आले. त्यानंतर अत्यंत शोकाकुल वातावरणात पृथ्वीराज यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

पृथ्वीराज याच्या मृत्यू व त्याच्या कुटुंबियांच्या अवयव दानाच्या निर्णयाची खबर उमरगा शहरात पसरल्यानंतर नागरिकांतून मोठी हळहळ व्यक्त केली जात होती. तसेच अवयवदानाच्या निर्णयाचे ही सर्वत्र कौतुक होत आहे. पृथ्वीराज याचे पार्थिव काळे प्लॉट येथील त्याच्या घराकडे गुरुवारी आणण्यात आल्यानंतर नागरिकांनी एकच गर्दी केली होती.

१० ते १६ वयोगटातील ६ मुलांना या अवयवदानामुळे जीवनदान मिळणार असून पृथ्वीराज यांच्या कुटुंबीयांनी अवयवदान करण्याचा निर्णय घेतल्यानंतर संपूर्ण भारतातून अवयवसाठी कित्येकांनी संपर्क साधल्याचे उमरगा येथे आलेल्या डॉक्टरांनी सांगितले.सर्व निकष पूर्ण करून योग्य मुलाला हे अवयव मिळणार असल्याचे ही डॉक्टरांनी सांगितले.

## औराद जि.प. शाळेत साठे जयंती, टिळक पुण्यतिथीनिमित्त वृक्षरोपण



**तभा वृत्तसेवा**
**कदेर, दि.२ ऑगस्ट -**

जि.प.प्रा. शाळा औराद येथील शाळेत लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शाळेतील जेष्ठ शिक्षिका जावळे यांनी विद्यार्थ्यांना लोकशाहीर आण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्याबद्दल माहिती सांगितली.

शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण विषयी जनजागृती निर्माण करून त्यांच्यामध्ये संवेदनशीलता निर्माण होण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांना एक झाड देण्यात आले. व दिलेल्या झाडांना आपल्या कुटुंबातील व्यक्तींचे नाव देऊन त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांवर सोपवण्यात आली. जे विद्यार्थी उत्कृष्टपणे संगोपन करतील त्या विद्यार्थ्यांचे गावचे सरपंच सुशील जाधव यांनी २६ जानेवारीच्या कार्यक्रमांमध्ये बक्षीस देऊन त्या विद्यार्थ्यांचा सन्मान करणार असल्याचे सांगितले.

या उपक्रमात शाळेचे मुख्याध्यापक मुळे पी.एस., मंडले टी.एस. राठोड, व्हि.डी. चव्हाण, व्ही.जी., जावळे एस. एच., पतंगे आर. एम., जवळगेकर एस. जी., पाटील एस.बी. तसेच सुशील जाधव, उपसरपंच रमेश कारभारी, शा.व्य.स.चे अध्यक्ष वेदकुमार पाटील, महेश जवळगे, शा.व्य. समिती सदस्य मारुती घाटे तसेच गावातील ग्रामस्थ आनंदाने सहभागी झाले होते.

## महाराष्ट्र ग्रामीण बँकेंची फोन पे, गुगल पे सेवा बंद; ग्राहकांत संताप

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२ ऑगस्ट -**

तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग, वागदरी, जळकोट व परिसरातील महाराष्ट्र ग्रामीण बँकेची फोन पे व गुगल पे सेवा गेल्या चार पाच दिवसांपासून बंद पडल्याने आर्थिक व्यवहाराची फार मोठी कोंडी निर्माण झाली आहे. याकडे कोण लक्ष देईल का? यांची तक्रार नेमकी कोणाकडे करायची ही सेवा म्हणजे ना धनी ना गोसावी या प्रमाणे झाली आहे.त्यामुळे ग्राहकांकडून याबाबत संताप व्यक्त केला जात आहे.

डिजिटल इंडियाच्या नावाखाली सर्व बँक खाते पॅनकार्ड मोबाईल नंबर आधार कार्डशी जोडून फोन पे, गुगल पे वगैरेद्वारे ऑन लाईन आर्थिक व्यवहाराची सक्ती शासन करते. यामुळे ग्राहकांनी या सेवेचा लाभ घेण्यासाठी लाखो ग्राहकांनी फोन पे, गुगल पे सेवा सुरू केली आहे. ग्राहकांच्या दृष्टीने कुठे ही केंव्हा ही खरेदी विक्रीचा आर्थिक व्यवहार असेल किंवा वैयक्तिक आर्थिक देवाणघेवाण असेल किंवा बस प्रवास भाडे असेल आदी आर्थिक व्यवहार फोन पे गुगल पे द्वारे करताना ग्राहकांतून समाधान व्यक्त केले जात आहे. ग्राहकांना आता फोन पे व गुगल पे द्वारे आर्थिक व्यवहार करण्याची सवय झाली आहे. परंतू गेल्या चार पाच दिवसांपासून महाराष्ट्र ग्रामीण बँकची सदर फोन पे गुगल पे सेवा ठप्प झाल्याने आर्थिक व्यवहाराची फार मोठी कोंडी झाली आहे.

तरी संबंधितांनी याकडे लक्ष देवून लवकरात लवकर सदर सेवा सुरू करावी, अशी मागणी ग्राहकांतून होत आहे.

## विद्यापीठ उपपरिसरात अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ ऑगस्ट -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसरात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठ उपपरिसराचे संचालक प्रा.डॉ. प्रशांत दीक्षित यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन प्रतिमा पूजन करण्यात आले. उपस्थित सर्वांनी प्रतिमेस पुष्प अर्पण केले. यावेळी डॉ. विक्रम शिंदे, प्रा. सचिन बस्सयै, डॉ. सुयोग अमृतराव, डॉ. गोविंद कोकणे, डॉ. जितेंद्र कुलकर्णी डॉ. महेश्वर कळलावे, डॉ. मेघश्याम पाटील, डॉ. नितीन पाटील, डॉ. किशन हावळ, विद्याधर गुरव, तुकाराम हराळकर, मल्लिनाथ लामजणे, विश्वास कांबळे, शिवाजी माने, संजय जाधव, हेमंत रसाळ इ. उपस्थित होते.

## राहुल अंधारे यांना पीएचडी प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२ ऑगस्ट -**

परांडा तालुक्यातील घारगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सहशिक्षक राहुल अंधारे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे विद्यापीठाकडून मानव विज्ञान शाखेअंतर्गत इतिहास विषयात पीएच. डी. (विद्यावाचस्पती)पदवी प्रदान करण्यात आली.

त्यांनी सोलापूर जिल्हातील सहकार चळवळीचा इतिहास: एक चिकित्सक अभ्यास १९४७-२००० या विषयावर संशोधन कार्य केले आहे. सोमेश्वर (ता.



बारामती) येथील मुगुटराव काकडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ देविदास वायदंडे यांचे मार्गदर्शन लाभले.

यासाठी प्रा.डॉ. किसन अंबाडे व बहिस्थ परीक्षक म्हणून प्रा.डॉ. नारायण भोसले ( मुंबई विद्यापीठ) यांनी मार्गदर्शन केले. विविध शिक्षक संघटनांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२ ऑगस्ट -**

डीव्हीपी उद्योग समूह व श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे विद्यमान चेअरमन तथा धाराशिव साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरामध्ये तब्बल ८४ रक्तदात्यांनी रक्तदान केले.



अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त श्री येडेश्वरी देवस्थान मंदिर येरमाळा व श्री पापनाश देवस्थान चोराखळी येथे अभिषेक करण्यात आले. धाराशिव साखर कारखाना येथे २०० झाडे चिंचाचे व २०० झाडे सागवान वृक्षारोपण करण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारखाना साईड येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप व स्वाधार केंद्र आणि येथे भोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कारखान्यातील सर्व कर्मचारी यांच्यासाठी आरोग्य शिबिर व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी ८४ रक्तदात्यांनी आपले रक्तदान केलेया रक्तदान शिबिरासाठी भगवंत ब्लड बँक बार्शी व सह्याद्री ब्लड बँक धाराशिव यांचे सहकार्य लाभले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक सुनील पाटील, गणेश जगदाळे, शशिकांत करंजकर, धाराशिव साखर कारखान्याचे जनरल मॅनेजर पठाण, साळुंखे, वैभव देशमुख, बाबासाहेब वाडेकर, दयानंद गव्हाणे, ज्ञानेश्वर कोळगे, सुनील लोमटे, धाराशिव साखर कारखाना सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी वाशी तहसीलवर भव्य ट्रॅक्टर मोर्चा





**तभा वृत्तसेवा**
**वाशी-येरमाळा, दि.२ ऑगस्ट -**

मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे-पाटील यांच्या मराठा आरक्षणाच्या आंदोलन मागणीला पाठिंबा देण्यासाठी व मराठा समाजाला सरसकट ओबीसीमधुन आरक्षण देण्याच्या प्रमुख मागणीसह इतर मागण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने गुरुवारी (दि.१) येथील तहसिल कार्यालयावर भव्य ट्रॅंक्टर मोर्चा काढण्यात आला. मोर्चामध्ये शेकडो ट्रॅंक्टरसह हजारो नागरिक सहभागी झाले होते. मागण्या संदर्भात तयार करण्यात आलेले निवेदन तहसिलदार राजेश लांडगे यांच्याद्वारा शासनाला देण्यात आले.

यावेळी देण्यात आलेल्या निवेदनात मराठा समाजाला सरसकट ओबीसीमधुन आरक्षण देण्यात यावे, सगेसोयरेचा अध्यादेश तात्काळ काढून त्याची अंमल बजावणी करावी, मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसा निमित्त बावी ता वाशी येथील सकल मराठा समजाच्या वतीने वाशी तहसील कार्यालयावर ट्रॅक्टर, वाहन मोर्चा काढण्यात आला. मराठा समाजाला ओबीसीतुन आरक्षण व १९५१, १९६१ च्या जनगणनेची नोंदीचे रेकॉर्ड उपलब्ध करुन देण्यात यावे, आंदोलन काळात मराठा युवकांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्यात यावेत, कुणबी नोंद सापडलेल्या नागरिकांना तात्काळ प्रमाणपत्र वाटप करण्यात यावेत इत्यादी मागण्या करण्यात आलेल्या आहेत. बावी येथुन सकाळी साडे नऊ वाजता निघालेल्या मोर्चातुन ट्रॅक्टर ६१, जे.सी.पी. ३ मोटरसायकल ९० पिकअप १, चार चाकी ५, वाहनाचा ताफा होता. जरांगे-पाटील यांना पाठिंबा यासह विविध मागण्यासाठी बावी (ता. वाशी) येथुन सकाळी आठ वाजता निघालेला भव्य ट्रॅंक्टर मोर्चा तालुक्यातील गोजवाडा, झिन्नर, दसमेगाव मार्गे वाशी शहरातील पारा चौक, छत्रपती शिवाजी महाराज नगर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, लक्ष्मी रोड, कन्हेरी रोड मार्गे दुपारी १२ वाजता तहसील कार्यालयावर धडकला.

या ट्रॅंक्टर मोर्चात विविध गावातील अनेक ट्रॅंक्टरसह मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.

तहसील कार्यालयात मोर्चा आल्यानतंर सकल मराठा समाजाच्या वतीने प्रशांत चेडे, बालाजी ढाणे यांची भाषणे झाली. एक मराठा लाख मराठा, आरक्षण आमच्या हक्काच नाही कोणाच्या बापाच, मनोज जरांगे पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है अशा घोषणानी शहरासह तहसील कार्यालय परिसर दणाणुन गेला. मोर्चा दरम्याण वाशी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## श्री महात्मा बसवेश्वर विद्यालयात टिळक पुण्यतिथी व साठे जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२ ऑगस्ट -**

उमरगा येथील महात्मा बसेश्वर विद्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांची भाषण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये शाळेतील ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेतील शिक्षक बटगिरे आणि प्रमुख पाहुणे म्हणून मालखरे सर उपस्थित होते. याप्रसंगी आयोजित भाषण स्पर्धेचे परीक्षक म्हणून क्षीरसागर व वेदपाठक यांनी काम पाहिले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक नेताजी गायकवाड यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय कोथळीकर यांनी केले.

कार्यक्रमाची सांगता सामूहिक पसायदानाने झाली

# रेशीम उद्योगामुळे जिल्ह्याची मखमली क्रांतीकडे वाटचाल

*** महारेशीम अभियानामुळे शेतकऱ्यांची होतेय आर्थिक प्रगती...* शेतकऱ्यांना मिळतेय वर्षाकाठी लाखोंचे उत्पन्न...* १५०५ शेतकरी करतात रेशीम शेती...* १४९० एकरवर तुती लागवड...* ६ हजार ६३६ लाभार्थी तुती लागवडीसाठी उत्सुक...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ ऑगस्ट-**

हवामानासह भौगोलिक परिस्थिती रेशीम शेती उद्योगास अनुकुल असल्याने जिल्हयातील शेतकरी रेशीम शेतीकडे वळले आहेत. जिल्ह्यातील एक हजारपेक्षा जास्त शेतकरी रेशीम शेती करत असून धाराशिव जिल्हा मराठवाडा विभागात रेशीम शेती व कोष उत्पादनात दुसऱ्या स्थानी आहे. तसेच रेशीम शेती उद्योगात नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन शेतकरी रेशीम कोषापासून लाखो रुपयांचा नफा मिळवत आहेत. यामुळे शेतकऱ्याच्या जिवनात आर्थिक प्रगती होत असून शेतकऱ्यांना वर्षाकाठी लाखोंचे उत्पन्न मिळत आहे. त्यामुळे जिल्ह्याची मखमली क्रांतीकडे वाटचाल सुरू आहे.

जिल्हयात चालु वर्षी महारेशीम अभियानांतर्गत ६ हजार ६३६ लाभार्थी शेतकऱ्यांनी तुती लागवडीसाठी नोंदणी केली असून रेशीम शेती करण्यासाठी ते उत्सुक आहेत.

नाविण्यपूर्ण योजनेअंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेतून अत्याधुनिक बाल किटक संगोपन बळकटीकरणाच्या साहित्यास ९ चॉकी शेतकरी गटांना ५ लक्ष रुपये याप्रमाणे ४५ लाख रुपयाचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. १ हजार ५०५ शेतकरी रेशीम शेती करत असून १ हजार ४९० एकरावर तुतीची लागवड करण्यात आली आहे. जिल्हयात सध्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत १ हजार ६७० रेशीम शेतीसंदर्भातील कामे सुरु आहेत.

अल्प पर्जन्यमानासह पावसाची अनियमितता यामुळे इतर पिकांच्या तुलनेत रेशीम शेतीतून चांगल्याप्रकारे उत्पन्न जिल्ह्यातील शेतकऱ्यांना घेता येते.

रेशीम शेतीसाठी तुती लागवड करण्यास शासनाकडून १ एकरसाठी अकुशल आणि कुशल खर्चासाठी ४ लाख १८ हजार रुपये अनुदान देण्यात येते.वर्षातील किमान आठ महिने पाणी उपलब्ध असलेल्या शेतीतसुद्धा रेशीम शेती करता येते.

एकदा लागवड केल्यास त्यापासून पंधरा वर्षापर्यंत उत्पन्न घेता येते. रेशीम उद्योग तुती लागवड ते कापड निर्मितीपर्यंत प्रत्येक टप्यावर ग्रामीण क्षेत्रामध्ये रोजगार मिळवून देणारा व ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बदलण्याची क्षमता रेशीम शेतीवर आधारित उद्योगात आहे.जिल्हयामध्ये तुती लागवडीस मिळणाऱ्या प्रतिसादासह शेतकऱ्यांच्या उत्पन्नाची हमी पाहता मार्च २०१६ पासून मग्रारोहयोअंतर्गत तुती लागवड करण्यास शासनाकडून मान्यता देण्यात आली.जिल्हय़ात आज चालु स्थितीत १२ रेशीम अळयांची चॉकी पुरवठा केंद्र आहेत. या चॉकी केंद्रामुळे शेतकऱ्यांना जिल्हयातच चॉकी अळी मिळत आहेत. वीस ते बावीस दिवसात ५० हजार रुपयांचे एक पीक उत्पन्न मिळत असून वर्षातून चार वेळा घेण्यात येणाऱ्या पिकांचे उत्पन्न २ लाखावर मिळत आहे.या योजनेची व्यापकता वाढवून शासनाने आता ही योजना कृषी विभाग,पंचायत समिती यांच्यामार्फत देखील राबविण्यास मान्यता दिली आहे.

### मागील पाच वर्षातील रेशीम शेतीतून शेतकऱ्यांनी झालेला फायदा

सन २०१८-१९ या वर्षात १ हजार ८९७ शेतकऱ्यांनी १ हजार ९९४ एकर क्षेत्रावर तुती लागवड केली होती. त्यातून त्यांनी ६.३४ लक्ष अंडीपुंजींचे संगोपनातून ४०१.२० मे.टन कोषाचे उत्पादन केले. यातून त्या शेतकऱ्यांना एकरामागे १ लाख ४० हजार इतके प्रत्यक्ष रोख उत्पन्न मिळाले होते. त्याप्रमाणेच सन २०१९-२० या वर्षात १ हजार ६८४ शेतकऱ्यांनी १ हजार ७३१.५० एकर क्षेत्रावर तुती लागवड केली होती. त्यात त्यांनी ४.७६ लक्ष अंडीपुंजींचे संगोपन केले होते. त्यांना याद्वारे ३२७.१३ मे.टन कोषाचे उत्पादन केले. यातून त्या शेतकऱ्यांना एकरामागे १ लाख ३० हजार इतके प्रत्यक्ष रोख उत्पन्न मिळाले होते.

सन २०२०-२१ या वर्षासाठी १ हजार ६८९ शेतकऱ्यांनी १ हजार ७२२.५० एकर क्षेत्रावर तुती लागवड केली होती. त्यात त्यांनी ५.२२ लक्ष अंडीपुंजींचे संगोपन केले होते. त्यांना याद्वारे ३८७.३४ मे.टन कोषाचे उत्पादन केले. यातून त्या शेतकऱ्यांना एकरामागे १ लाख ५५ हजार इतके प्रत्यक्ष रोख उत्पन्न मिळाले होते.

२०२१-२२ या कृषी वर्षात १ हजार १८० शेतकऱ्यांनी १ हजार १९२.०० एकर क्षेत्रावर तुती लागवड केली होती. यामधून त्यांनी ५.८७ लक्ष अंडीपुंजींचे संगोपन करत त्याद्वारे शेतकऱ्यांनी ३९९.९७ मेट्रीक टन कोषाचे उत्पादन करुन २ लाख २५ हजाराचा नफा मिळवला होता. अशाच पध्दतीने सन २०२२-२३ मध्ये १ हजार ५८ शेतकऱ्यांनी १ हजार ३२ एकरावर तुती लागवड केली. या क्षेत्रासाठी त्यांनी ७.३८ लक्ष अंडीपुंजींचे संगोपन केले होते. त्याद्वारे त्यांनी ४३६.३२ मेट्रीक टन कोषाचे उत्पादन करुन २.३४ लाखाचा नफा मिळवला असून सन २०२३-२४ १ हजार ५०५ शेतकऱ्यांनी १ हजार ४९०.०० एकर शेती क्षेत्रावर तुतीची लागवड करण्यात आली होती. त्या क्षेत्रातून मिळणाऱ्या तुतीवर त्यांनी ८.२५ लक्ष अंडीपुंजींचे संगोपन करत आहेत. यातून त्या शेतकऱ्यांना ६००.९९ मेट्रीक टन कोष मिळले आहेत. त्या मिळणाऱ्या कोषातून २ लाख ३८ हजार रुपये नफा झाला आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### कुलस्वामिनी आश्रमशाळेचे सुभाष कारले सेवानिवृत्त

**जळकोट, दि.२ ऑगस्ट -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट (आलियाबाद) येथील श्री. कुलस्वामिनी माध्यमिक आश्रम शाळेचे शिपाई पदावर कार्यरत असलेले कारले सुभाष सिद्राम हे सलग तीस वर्षे सेवा बजावून दि.३१ जुलै रोजी सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्तीनिमित्त त्यांचा सपत्नीक सत्कार संस्थेचे जेष्ठ पदाधिकारी माणिकराव चव्हाण यांच्या हस्ते व संस्थेचे सचिव संतोष चव्हाण यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते नियुक्तीपत्र

**धाराशिव, दि.२ ऑगस्ट -**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जन-कल्याण कक्ष यांच्या संयुक्तपणे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबवली जात आहे. या उपक्रमांर्तगत जिल्हयातील युवकांना आज २ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांच्या हस्ते नियुक्ती प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुन झाडे, जिल्हा कौशल्य व रोजगारचे सहायक आयुक्त संजय गुरव, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य श्री.आवताडे, जिल्हा उद्योग केंद्राचे प्रकल्प अधिकारी पाडूरंग मोरे यांची उपस्थिती होती. या शिकाऊ प्रशिक्षणार्थी श्रीमती दिपाली देशमुख यांची कौशल्य विकास कार्यालय येथे, शाम दिक्षीत यांची हायस्कुल,आरती भोकरे यांची बीटीआरआय येथे, सुकृती सोमवंशी यांची जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण् आधिकारी येथे, माधवी शिंदे यांची एमसीईडी येथे, निकिता इंगळे यांची जिल्हा नियोजन विभाग येथे तर सिध्दार्थ गायकवाड यांची निवडणूक विभाग जिल्हाधिकारी येथे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत निवड करण्यात आली आहे.

### १०० टक्के अनुदानावर बॅटरी ऑपरेटेड फवारणी पंप योजना, ६ ऑगस्टपर्यंत अर्ज मागविले

**धाराशिव, दि.२ ऑगस्ट -**

राज्य पुरस्कृत एकात्मिक सोयाबीन आणि इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मुल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजना सन २०२२-२३ ते २०२४-२५ या तीन वर्षाच्या कालावधीत राबविण्यात येत आहे. सोयाबीन व इतर तेलबिया आधारित पीक पध्दतीस चालना देवून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करुन पिकातील मुल्यसाखळीस चालना देण्यासाठी सन २०२४-२५ मध्ये योजनेंतर्गत चालू खरीप हंगाममध्ये निविष्ठा १०० टक्के अनुदानावर बॅटरी ऑपरेटेड फवारणी पंपासाठी अर्ज करावे. अर्ज करण्यासाठी जिल्हयातील शेतकऱ्यांसाठी अर्ज करण्याची मुदत ६ ऑगस्टपर्यंत वाढविण्यात आली आहे.योजनेसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया मागील १० दिवसापासून पोर्टलवर सुरु करण्यात आली आहे. योजनेचा लाभ घेण्याकरिता लाभार्थ्यांची निवड महाडीबीटी पोर्टलवर केलेल्या ऑनलाईन अर्जातून ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहे. जिल्हयातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी mahadbt.maharashtra.gov.in-farmerlogin या संकेतस्थळावर जावून ऑनलाईन अर्ज करावेत,असे आवाहन करण्यात जिल्हा कृषी अधिक्षक कृषि अधिकारी रविंद्र माने यांनी केले आहे.



### विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य नारळ पाणी शुद्ध पाणी करण्याची मशीन भेट

**धाराशिव, दि.२ ऑगस्ट -**

साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त लहुजी प्रतिष्ठानच्या वतीने नागनाथ मूकबधिर महाविद्यालय खानापूर येथे विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य नारळ पाणी शुद्ध पाणी करण्याची मशीन हे विद्यार्थ्यांसाठी जयंतीनिमित्त भेट देण्यात आले. कार्यक्रमास उपस्थित लहुजी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष काकासाहेब पेठे तसेच जयंती अध्यक्ष सुरज शहा, पालक व उपाध्यक्ष सचिन धाकतोडे, सचिव गणेश मगर तसेच रवी झोंबाडे, सचिन पेठे, श्रीकांत लोकरे, शंकर देडे, विजय देडे, किरण झोंबाडे, रतन पेठे, आकाश पेठे, संजय पेठे, शंकर कसबे व लहुजी प्रतिष्ठानचे पदाधिकारी ही उपस्थित होते.

### नवोदय विद्यालयात संगीत कार्यशाळेत प्रारंभ

**धाराशिव, दि.२ ऑगस्ट -**

पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय येथे दि.१ ऑगस्ट रोजी शिक्षण कलांतर्गत युवा गायक निर्मिती कार्यशाळेस प्रारंभ झाला. या कार्यशाळेचे उद्घाटन विद्यालयाचे प्राचार्य के. वाय.इंगळे यांच्या हस्ते सरस्वती प्रतिमा पूजनाने करण्यात आले. यावेळी मंचावरती संगीत अध्यापक पी.एन. जोशी, हरी जाधव, बसवराज, निशांत भुते होते. ही कार्यशाळा १ ऑगस्ट ते ३० ऑगस्टपर्यंत चालणार असून यामध्ये ४० विद्यार्थी, ४० विद्यार्थ्यांनी यांना संगीत विषयात तरबेज केले जाणार आहे. या कार्यशाळेस संगीत विषयातील तज्ञ व संगीत विशारद श्री अमृत अविनाश जावळे व अजय चंद्रकांत उकिरडे धाराशिव हे मार्गदर्शन करणार आहेत. या कालावधीमध्ये शास्त्रीय संगीत, हार्मोनियम, वादन, गायन, ढोलकी,ताशा, तबला, नृत्य, भक्ती गीते, देशभक्तीपर गीते, पथनाट्य, नाटक, भजन, लावणी, स्वर यांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. हे प्रशिक्षण विद्यालयाचे संगीत अध्यापक पी.एन.जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे.





**धाराशिव :** साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त तालुक्यातील आंबेवाडी येथे अभिवादन करण्यात आले. यावेळी पंचायत समितीचे माजी सभापती नाना कदम, सामाजिक कार्यकर्ते गौतम आंबेवाडीकर, पोलिस पाटील भैरवनाथ दरेकर, ज्ञानेश्वर मल्हारी कांबळे, हनुमंत कांबळे, नामदेव कांबळे, मोहन राऊत, संतोष राऊत, अविनाश राऊत, किशोर कांबळे, दादासाहेब कांबळे, रामहारी राऊत, वैभव कांबळे, विठ्ठल कांबळे, सागर कांबळे, ज्ञानेश्वर कांबळे, मल्हारी कांबळे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आ.राणाजगजितसिंह पाटील यांचा मातंग समाजाच्या वतीने सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२ ऑगस्ट-**

आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून ३० वर्षांची प्रलंबित मागणी मार्गी लागल्यामुळे तेर येथील मातंग समाजाच्या वतीने २ ऑगष्टला शिंगोलि येथील निवासस्थानी सत्कार करण्यात आला.

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या दिवशीच राज्य सरकारने मोठा ऐतिहासिक निर्णय दिला. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा धाराशिव येथे पूर्ण आकृती पुतळा बसविण्यासाठी १ एकर जागा मंजूर केली आहे. याबद्दल तेर येथील मातंग समाजाच्या वतीने आ.राणाजगजितसिंह पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विलास रसाळ, प्रज्योत रसाळ, रंगनाथ लोमटे, रवी शिंदे, शुभम शिंदे, अमोल रसाळ, बाबा रसाळ, निखिल खंदारे, विशाल पेठे, प्रफुल्ल रसाळ, आदेश कांबळे व मातंग समाज बांधव उपस्थित होते.

### उमरगा-लोहाऱ्याचा गड अभेद्य ठेवण्यासाठी एकदिलाने काम करा : विधानसभा निरीक्षक नितीन लांडगे

**लोहारा, दि.२ ऑगस्ट-**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने उमरगा लोहारा विधानसभा निरीक्षक नितीन लांडगे यांनी उमरगा लोहारा तालुक्यातील पक्षबांधणीचा आढावा घेत प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

विधानसभा निवडणुका अवघ्या काही दिवसांवर आल्या आहेत. यामुळे येणाऱ्या निवडणुकीत आ.ज्ञानराज चौगुले यांना पुन्हा एकदा विधानसभेवर पाठवण्यासाठी शिवसैनिकांनी कामाला लागण्याचे आवाहन विधानसभा निरीक्षक नितीन लांडगे यांनी केले आहे.

### लाडक्या बहिणींच्या सुरक्षेसाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात; राष्ट्रवादी महिला काँग्रेस पार्टीची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ ऑगस्ट-**

लाडकी बहीणीच्या सुरक्षेसाठी तात्काळ उपायोजना कराव्यात अशी मागणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार महिला काँग्रेस पार्टीच्यावतीने जिल्हाध्यक्षा मनीषा पाटील यांनी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे दि.१ ऑगस्ट रोजी केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, नवी मुंबई उरण येथील युवतीवर अत्याचार करून खुन केला. तर तिच्या मृतदेहाची विटंबना केल्यामुळे महिला म्हणजे प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे लाडकी बहीण सुरक्षित कधी असणार? याबाबत चिंता व्यक्त होत आहे. प्रत्येक तालुक्यात महिला सुरक्षा व कायदे याची माहिती सर्वांना व्हावी, यासाठी जनजागृती करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

या निवेदनावर जिल्हाध्यक्ष ॲड. मनीषा पाटील, जिल्हा उपाध्यक्षा मंजुषा खळदकर, उमरगा तालुकाध्यक्षा संगीता सलगर, कळंब तालुका उपाध्यक्षा सुमती तोरमले, धाराशिव उपाध्यक्षा नागिनी कांबळे, शिलावती देशमुख, शबाना शेख, राजनंदिनी शिंदे, यशोदा पवार, संगीता कटारिया यांच्या सह्या आहेत.

## सक्षम ग्रामपंचायत योजनेंतर्गत कोंबडवाडी गावात बैठक

**तभा वृत्तसेवा**
**कसबे तडवळे, दि.२ ऑगस्ट-**

ग्रामीण समुदायांचे सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने एक महत्वपूर्ण पाऊल उचलत, कोंबडवाडी गावाच्या ग्रामपंचायतीने सक्षम ग्रामपंचायत योजनेंतर्गत एक प्रभावी बैठक जी पिरामल फाऊंडेशन टीमने आयोजित केली होती. या उपक्रमाचा उद्देश ग्रामपंचायतींची क्षमता वाढवून शाश्वत विकास आणि तळागाळातील सुधारित शासन व्यवस्था घडविणे हा आहे. ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या या बैठकीत स्थानिक रहिवासी, पंचायतीचे सदस्य आणि पिरामल फाऊंडेशनचे प्रतिनिधी यांनी उत्साहाने भाग घेतला. सरपंचांनी सत्राचे उद्घाटन केले आणि समुदायामध्ये सकारात्मक बदल घडविण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

मुख्य वक्ते पिरामल फाऊंडेशनचे प्रीती राज आणि अंकित कुमार यांनी सक्षम ग्राम पंचायत योजनेच्या उद्दिष्टांबद्दल सखोल माहिती दिली, ज्यामध्ये मजबूत स्थानिक शासन प्रणाली तयार करणे, सेवा वितरण सुधारणे आणि समावेशक विकासास प्रोत्साहन देणे यावर भर देण्यात आला आहे.

टीमने ग्रामपंचायतींना त्यांच्या कार्यप्रणाली सुधारण्यासाठी विविध रणनीती आणि साधनांची ओळख करून दिली, ज्यात प्रभावी नियोजन, संसाधन व्यवस्थापन आणि समुदाय सहभाग यांचा समावेश आहे. ज्येष्ठ सदस्य दिगंबर जी आणि पंकज जी यांनी मराठीतून संकल्पनांचे सुंदर स्पष्टीकरण दिले. या उपक्रमाचा उद्देश तांत्रिक साधनांचा वापर करून प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करणे, स्थानिक शासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करणे आहे. पिरामल फाऊंडेशन टीमने निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत महिलांच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले.



शिक्षणाला प्रोत्साहन देणारे उपक्रम तसेच मुलभूत साक्षरता आणि अंकज्ञान यावर लक्ष केंद्रित करणारे उपक्रम, जसे की ड्रॉपआउट फ्री पंचायत, VWSC बैठका, GPPFT मंचाचे गठन, बालपण काळजी आणि शिक्षण, लिंग समानता आणि महिलांना त्यांच्या गावाच्या विकासात सक्रिय भूमिका घेण्यासाठी सक्षमीकरण करण्यासाठी विशेष लक्ष देण्यात आले.

आपल्या समारोपाच्या भाषणात, सरपंच मुकुंद सोखांडे यांनी पिरामल फाऊंडेशनचे ग्रामीण विकासासाठीच्या त्यांच्या दृढ पाठिंब्यासाठी आणि समर्पणासाठी आभार मानले. त्यांनी बैठकीतून मिळालेल्या शिकवण लागू करण्याची आणि अधिक समृद्ध आणि आत्मनिर्भर कोंबडवाडी घडविण्याच्या गावाच्या वचनबद्धतेची पुनरावृत्ती केली.या कार्यक्रमासाठी गावातील सरपंच मुकुंद सोकांडे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

## स्तनपानामुळे आईचा कर्करोगाचा धोका कमी होतो : डॉ.कुलदीप मिटकरी

### जिल्हा स्त्री रुग्णालयात स्तनपान सप्ताहाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ ऑगस्ट-**

बाळाला आईचे पहिले घटट पिवळे दुध देणे आवश्यक आहे.बाळाच्या वाढीसाठी प्रसुतीनंतर ताबडतोब स्तनपान केल्याने बाळाची रोगप्रतिकारक शक्ती वाढते.तसेच आईसाठी रक्तस्राव कमी करण्याचेही काम करते.स्तनपानामुळे आईचा कर्करोगाचा धोका कमी होतो. असे प्रतिपादन जिल्हा बालसंगोपन अधिकारी डॉ.कुलदीप मिटकरी यांनी केले.

जिल्हा स्त्री रुग्णालय येथे १ ऑगस्ट रोजी आयोजित स्तनपान सप्ताह उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते.



सप्ताहाचे उद्घाटन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ.शिल्पा दोमकुंडवार यांनी केले. यावेळी बालरोग तज्ञ डॉ.अभय शहापूरकर, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. कुलदीप मिटकरी, डॉ.गरड, डॉ. देशपांडे, डॉ.स्वामी, डॉ.मुळे, डॉ.राजगुरू,डॉ. जिंतूरकर, डॉ. राहुल वाघमारे, डॉ. रामढवे स्त्री रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षक डॉ.स्मिता सरोदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ.मिटकरी म्हणाले की, बाळाला आवश्यकत्यानुसार किंवा किमान दर दोन-तीन तासांनी स्तनपान करावे. रात्रीच्या वेळी देखील स्तनपान द्यावे . बाळ मध्येच झोपी जात असेल तर त्याला जागे करावे.

चांगली स्थिती असते तेव्हा बाळ आईचे स्तन तोंडात धरताना मोठे तोंड उघडते. स्तनाग्र आणि भोवतालचा काळा भाग बाळाच्या तोंडात असावा. खालचा ओठ बाहेरच्या दिशेला असतो. हनुवटी स्तनास चिकटून असते. नाक मोकळे असते लक्षात ठेवण्यासारखे मुद्दे प्रत्येक वेळी दोन्ही स्तनातून दूध पाजा एक स्तन रिकामे होईपर्यंत दूध पाजा नंतर स्तन बदला दुसऱ्या स्तनातून पाजण्यापूर्वी बाळाची ढेकर काढा. जर स्तनाचा काळा भाग दिसत असेल तर याचा अर्थ चुकीच्या पद्धतीने धरलेले आहे.

बाळ फक्त स्तनाग्र चोखेल त्याला पुरेसे दूध मिळणार नाही. आईच्या स्तनाग्रांना दुखापत होऊ शकते. स्तनपान संबंधित इतर कोणतेही माहितीसाठी तुमच्या आशा,ए.एन.एम नर्स किंवा डॉक्टरांशी संपर्क करावा,असेही त्यांनी सांगितले.

या वर्षी स्तनपानाला समर्थन देऊया ...निसर्गाची पहिली लस आईचे पहिले दूध कोलोस्ट्रम जन्मानंतर पहिल्या तासात बाळाला स्तनपान द्या.हे घोषवाक्य घेवून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

डॉ.स्मिता सरोदे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. स्तनपानाचे महत्त्व त्याचे टप्पे व स्त्री रुग्णालयात स्तनपानबाबत मातेस दिले जाणारे प्रशिक्षण याविषयी माहिती दिली. स्तनपानाचे महत्त्व सांगितले. डॉ.अभय शहापूरकर यांनी बाळाची काळजी,आईचे दूध किती महत्त्वाचे आहे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

डॉ.शिल्पा दोमकुंडवार यांनीही स्तनपान सप्ताहाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.आपण करत असलेल्या कामाचे कौतुक केले. स्तनपानाविषयी फक्त महिलांना जागृत करून चालणार नसून पुरुषांमध्येसुद्धा याबाबत जागृती करणे गरजेचे आहे,असे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ.सौ.देशपांडे व डॉ. सौ.जिंतूरकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या सप्ताहानिमित्त ए एन एम यांनी एक स्तनपानाविषयी नाटिका सादर केली.

तसेच स्त्री रुग्णालयातील असिस्टंट मेट्रन,इन्चार्ज सिस्टर व सिस्टर यांनी स्तनपानाविषयी गीत सादर केले.या कार्यक्रमाचे संचालन संतोष पोतदार यांनी केले. आभार डॉ.रामढवे यांनी मानले.या कार्यक्रमास स्त्री रुग्णालयामधील सर्व अधिकारी व कर्मचारी,रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### निलंगा येथे अण्णा भाऊ साठे जयंती साजरी

**निलंगा, दि.२ ऑगस्ट-**

निलंगा शहरात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती साजरी करण्यात आली. त्यानिमित्ताने शहरातील विविध ठिकाणी ध्वजारोहण व प्रतिमा पूजन करण्यात आले. शिवाजीनगर येथील म्हाडा कॉलनी मध्ये अरविंद पाटील-निलंगेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण व प्रतिमेचे पूजन करुन अन्नदान करण्यात आले. वीर लहुजी साळवे नगर येथे अशोकराव पाटील निलंगेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण व प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर अण्णाभाऊ साठे नगर मध्ये लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष पंडितरावजी धुमाळ यांच्या हस्ते ध्वजारोहण व प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर अन्नदान करण्यात आले . आनंदमुनी चौकातील जि.प.केंद्रीय शाळेमध्ये प्रा. डॉ. भगवान वाघमारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज चौकात रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. सायंकाळी चार वाजता शहरातील मुख्य रस्त्यावरून साहित्यरत्न लोकशाहीर डॉक्टर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. त्यामध्ये हजारो बांधवांनी सहभाग नोंदविला. हाडगा नाका येथून सुरू झालेल्या या मिरवणुकीचे छत्रपती शिवाजी महाराज चौक, आनंद मुनी चौक व वीर लहुजी साळवे नगर येथे विसर्जन करण्यात आले. या मिरवणुकीसाठी पोलीस प्रशासन व नगरपालिका प्रशासन व अनेकांनी सहकार्य केल्याबद्दल जयंती मंडळाचे अध्यक्ष रवींद्र कांबळे, उपाध्यक्ष बजरंग कांबळे, कोषाध्यक्ष रमेश कांबळे, श्रीधर कांबळे, शुभम हरिभाऊ कांबळे, माजी नगरसेवक भगवान अण्णा कांबळे , डाकरे, बालाजी कांबळे, नागनाथ घोलप, शिवप्रसाद कांबळे ,प्रदीप थोरात विजय कांबळे, पवन कसबे व अनेक पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. प्रेमनाथ गायकवाड यांनी आभार व्यक्त केले.



### वलांडी येथे अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त अभिवादन

**वलांडी, दि.२ ऑगस्ट-**

देवणी तालुक्यातील वलांडी येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती अण्णा भाऊ साठे साभाग्रहाच्या प्रांगणात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली. प्रथमता अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन व्यंकटराव पाटील, माजी सरपंच राम भंडारे, महेश बंग यांच्या हस्ते पुष्पहार व श्रीफल अर्पण करून अभिवादन करण्यात आले व ध्वजारोहण वलांडीचे सरपंच सौ राणीताई भंडारे, जनाबाई सूर्यवंशी यांच्या हस्ते करून अभिवादन करण्यात आले. यावेळी वलांडीचे व्यंकटराव पाटील, सरपंच राणी भंडारे, उपसरपंच महेमुद सौदागर, माजी सरपंच राम भंडारे, नवनाथ सोंनकवडे,दिनेश पाटील आदी तर जयंती समितीचे अध्यक्ष रवी गायकवाड, उपाध्यक्ष श्याम सूर्यवंशी,सचिव उद्धव गायकवाड, रवि सूर्यवंशी व समस्त मातंग समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

**शिरूर अनंतपाळ, दि.२ ऑगस्ट-**

विधायक कृती समिती शिरूर अनंतपाळ यांच्या वतीने दि १ ऑगस्ट गुरुवार सकाळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०४ व्या जयंतीनिमित्त थोर साहित्यीक अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच मान्यवरांनी आपले मनोगत मांडले. याप्रसंगी कृती समितीचे कार्याध्यक्ष तथा संजय गांधी निराधार योजनेचे सदस्य उत्तमराव कदम, सेवानिवृत्त उपसचिव सहसंचालक मुंबई ट्रेझरी जगताप डी.व्ही, सेवानिवृत्त मुख्याध्यापक बालाजी जगताप आरी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक बालाजी जगताप रापका, ग्रंथपाल निवृत्ती सूर्यवंशी, भिकाजी मधमुरे, नागनाथ कदम, अमर जगताप, माधव गायकवाड, जाफर शेख, गिरीधर आरी, राजू दिवेकर, मच्छिंद्र लोंढे, सुरेश जाधव, अविनाश जगताप, द्रुपद कांबळे व अन्य मान्यवर उपस्थित होते.

### शालेय क्रीडा स्पर्धा आयोजनाबाबत क्रीडा शिक्षकांच्या बैठकीत चर्चा

**लातूर, दि. २ ऑगस्ट-**

क्रीडा व युवक सेवा संचलनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२४-२५ मध्ये शालेय क्रीडा स्पर्धा आयोजनाविषयी २९ जुलै, रोजी दयानंद महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये क्रीडा शिक्षकांच्या बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे होते. जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लगडे यांनी प्रास्ताविकामध्ये क्रीडा शिक्षकांनी जास्तीत जास्त खेळाडू घडविण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत क्रीडा शिक्षकांना आवाहन केले. उपसंचालक डॉ. गणपत मोरे यांनी क्रीडा शिक्षकांनी आपल्या सेवेच्या कालावधीमध्ये किमान एक तरी राष्ट्रीय खेळाडू घडावावा, असे आवाहन केले. बैठकीसाठी लातूर जिल्ह्यातील सुमारे ५०० क्रीडा शिक्षक उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये बानवलेकर यांनी ऑनलाईन प्रवेशिका भरेणे, खेळाडू ओळखपत्र तयार करणे याबाबतचे सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी अर्जुन पुरस्कार प्राप्त खेळाडू तथा तालुका क्रीडा अधिकारी सारिका काळे, निलंगा तालुका क्रीडा अधिकारी सुरेंद्र कराड, रेणापूर क्रीडा मार्गदर्शक जयराज मुंडे, चंद्रकांत लोदगेकर, क्रीडा अधिकारी कैलास लटके, कृष्णा केंद्रे, बाळासाहेब इंगोले, धीरज बावणे उपस्थित होते.

# शिरुर अनंतपाळमध्ये व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची लूट

## सोयाबीनची खरेदी हमीभावापेक्षा कमी दरात; रयत क्रांती संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**शिरुर अनंतपाळ, दि.२ ऑगस्ट-**

शिरुर अनंतपाळ तालुक्यासह जिल्ह्यातील सर्व बाजार समित्याकडून शेतकऱ्यांच्या सोयाबीन शेतमाल शासनाने ठरवून दिलेल्या हमीभावा पेक्षा कमी भावाने खरेदी करून शेतकऱ्यांची आर्थिक लूट केली जात आहे.

शासनाने ठरवून दिलेल्या हमीभावा पेक्षा कमी भावाने कायदाने सोयाबीन शेतमाल खरेदी करता येत नाही तरीसुद्धा सरकारचे नियम धाब्यावर बसवून व्यापा-याकडून सोयाबीन शेतमाल हमीभावा पेक्षा कमी दराने खरेदी करून शेतकऱ्यांची आर्थिक लूट केली जात आसल्याची भावना शेतकरी व्यक्त करीत आहेत.

सध्या सोयाबीनचे दर दररोज कमी होत आहेत शेतीसाठी खर्चाचे व आर्थिक आडचणीचे दिवस असल्याने शेतकऱ्यांनी अनेक वर्षे घरात साठवून ठेवलेले सोयाबीन बाजारात विक्रीसाठी येत आहेत. याचा फायदा घेत व्यापारी शेतकऱ्यांना खुलेआम लुटत आहेत तरी हमीभावा पेक्षा कमी दराने खरेदी करणा-या व्यापा-यावर योग्य ती कारवाई करावी.अन्यथा सरकारने ज्या शेतकऱ्यांचा माल कमी भावाने विकला त्या शेतकऱ्यांना फरकांची रक्कम देण्याची घोषणा केली आहे ते पैसे तात्काळ देण्यात यावे जेणेकरून शेतकऱ्यांची होणारी लूट थांबेल व बाजारात होणारी अवक कमी होईल व सोयाबीन दर टिकून राहातील. सरकारने प्रति हेक्टरी ५००० रुपये शेतकऱ्यांना देण्याची घोषणा केली आहे ती घोषणा केलेली रक्कम शेतकऱ्यांना तात्काळ देण्यात यावे अशी मागणी रयत क्रांती संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.यावेळी रयत क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी पेठे, प्रभाकर चोचंडे, धोंडिबा बसपुरे, भागवत गड्डिमे,विनोद कुंभार यांच्यासह शेतकरी, पदाधिकारी उपस्थित होते.



> शेतकरी सध्या अडचणीत सापडला आहे. पेरणीसाठी घेतलेले पैसे औषध फवारणी, खत, तन काढण्यासाठी जवळ पैसे नाहीत वर्षांपासून सोयाबीनला भाव नसल्यामुळे घरात साठवून ठेवलेले सोयाबीन आपल्या आर्थिक अडचणी भागवण्यासाठी बाजारपेठेत विक्रीसाठी आणले असता व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची आर्थिक लूट होत आहे.
>
> **-शिवाजीराव पेठे,**
> रयत क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा ओबीसी नेते



### विवेकानंद तांदळे यांनी स्विकारला मुख्याध्यापक पदाचा पदभार

**शिरूर अनंतपाळ, दि.२ ऑगस्ट-**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील थेरगाव येथील प्रेमनाथ विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक संजय शिंदे सेवानिवृत्त झाले. त्यांच्या रिक्त जागी नेताजी विद्यालय शिंदाळा (लो) येथील मुख्याध्यापक विवेकानंद तांदळे यांची संचालक व पालकांच्या आग्रहास्तव बदली करून थेरगाव येथील प्रेमनाथ विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हणून नियुक्ती करण्यात आली. या अगोदर तांदळे विवेकानंद यांची १ एप्रिल रोजी श्री प्रेमनाथ विद्यालय थेरगाव येथून पद्दोन्नतीद्रारे श्री नेताजी विद्यालय शिंदाळा (लो) ता.औसा जि.लातूर येथे मुख्याध्यापक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. प्रेमनाथ विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हणून नियुक्ती करण्यात आली या बद्दल संस्थेचे सचिव बाबुराव पेठे, उपाध्यक्ष नारायणराव पाटील, सहसचिव नंदकुमार पाटील संचालक शंकर पाटील, संचालक तथा माजी मुख्याध्यापक संजय शिंदे, कोषाध्यक्ष देवशेटवार , बापूराव हांगर्गे अक्षय पाटील, धनराज पाटील शाळेतील सहशिक्षक पवार, कसपटे, बेल्लेवाड, चिमणशेट्टे, कांबळे, सदांनंदे, माडे, तसेच विद्यार्थी व पालकांनी तांदळे यांचे अभिनंदन केले.

# जीपॅट, नायपर परीक्षेत महाराष्ट्र फार्मसीचे यश

### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि.२ ऑगस्ट-**

महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी निलंगा येथील १८ विद्यार्थ्यांनी जीपॅट, नायपर या राष्ट्रीय पातळीवरील नामांकित परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. त्यानिमित्ताने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी संस्थेचे अध्यक्ष विजय शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. जीपॅट ही राष्ट्रीय स्तरावरील पदव्युत्तर पदवी तसेच पीएचडी व फेलोशिप प्राप्त करण्यासाठी सर्वोच्च परीक्षा आहे तसेच नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासूटिकल एज्युकेशन अँड रिसर्च ही भारतातील सर्वोच्च फार्मासूटिकल संशोधन संस्था आहे.ही संस्था रसायन आणि खते मंत्रालयाच्या फार्मासूटिकल्स विभागाच्या अधिपत्याखाली स्वायत्त संस्था म्हणून कार्य करते.



या दोन्ही परीक्षेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मागील २० वर्षापासून ची यशस्वी परंपरा कायम राखत यावर्षीही उत्तुंग यश संपादन केले आहे या गुणगौरव सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एस. एस. पाटील सर, प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर भागवत पोळ, प्राचार्य महाराष्ट्र पॉलिटेक्निक डी. फार्मसी इन्स्टिट्यूट निलंगा तसेच डॉक्टर ज्ञानेश्वर चौधरी आय. क्यू.ए.सी.सम न्वयक, महाराष्ट्र महाविद्यालय व मोहन नटवे, मुख्याध्यापक महाराष्ट्र विद्यालय हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे डॉ. भागवत पोळ म्हणाले की सदरील परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी भारतातील सर्वोत्तम शैक्षणिक गुणवत्ता व नौकरीच्या विविध संधी उपलब्ध करून देणाऱ्या संस्थांम ध्ये प्रवेश घेऊन आपले फार्मसी क्षेत्रातील उत्तम करिअर करण्याचा प्रयत्न करावा यासोबतच विविध कौशल्य विकास आधारित कोर्सेस पूर्ण करावेत. डॉ. ज्ञानेश्वर चौधरी यांनी मार्गदर्शन करताना नमूद केले की या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांनी उत्तम महाविद्यालयाची निवड केल्यामुळेच यश संपादन करू शकले. रॉबर्ट फोस्टर या नाम ांकित इंग्लिश कविच्या एका प्रसिद्ध कवितेचा उल्लेख त्यांनी यावेळी केला. प्रास्ताविक प्राध्यापक डॉक्टर शरद उसनाळे यांनी केले व डॉ. चंद्रवदन पांचाळ यांनी जी पॅट व नायपर परीक्षेचे संदर्भातील विविध स्कॉलरशिप व त्याबद्दल सध्या चालू असलेल्या घडामोडी बद्दल सखोल मार्गदर्शन केले. प्रा. सुनील गरड यांनी महाविद्यालयातील जीपॅट नायपर सेल कडून पुरवल्या जाणाऱ्या शैक्षणिक सुविधांबाबत माहिती दिली.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. एस. एस. पाटील यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आलेख अधोरेखित करत सर्व यशस्वी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल समाधान व्यक्त केले. सर्व यशस्वी विद्यार्थी व पालक यांचा यथोचित सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला व महाविद्यालयातून दरवर्षीप्रम ाणे जीपॅट परीक्षेत प्रथम द्वितीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांस स्व. डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर, माजी मुख्यमंत्री तथा संस्थापक अध्यक्ष महाराष्ट्र शिक्षण समिती यांच्या स्मरणार्थ रोख रुपये अनुक्रमे ५०००/-, ३०००/- व २०००/- देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी डॉ. संतोष कुंभार, डॉ. माधव शेटकर, प्रा. सुजित पवार, प्रा. शिवराज हुनसनाळकर, प्रा. परवेज शेख, प्रा. सुरज वाकोडे, प्रा. नंदा भालके, प्रा. सानुली पौळकर, प्रा. विनोद उसनाळे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. इरशाद शेख तर आभार प्रदर्शन प्रा. रविराज मोरे यांनी केली कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

### दैठणा येथे साठे यांची जयंती साजरी

**दैठणा, दि.२ ऑगस्ट-**

दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी दैठणा (ता.शिरूर अनंतपाळ) येथे अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली याप्रसंगी अण्णाभाऊ साठे यांच्या सोबतच छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेलाही पुष्पहार घालून वंदन करण्यात आले याप्रसंगीत दैठणा येतील तंटामुक्तीचे अध्यक्ष रामेश्वर बिरादार यांच्याकडून सर्वप्रथम पूजा करून पुष्पहार घालण्यात आला आणि ध्वजारोहणही करण्यात आला. याप्रसंगी रामराव पाटील विद्यालयाचे माजी शिक्षक व्यंकटरावजी मुळे यांनी मनोगत व्यक्त के. बाळू भुरे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी गावातील सरपंच शेषराव कांबळे, माजी सैनिक लक्ष्मण सांगवी, आदर्श नागरिक विश्वनाथ तोटे, प्रसाद पाटील, सदानंद पाटील, प्रताप बिरादार, सुरेश बिरादार, बाबू टिपराळे, शामराव भुरे, बाबुराव भुरे, रामलिंग पटनाईक, भुरे व्यंकट, मधुकर कोंडीराम, बिरादार कल्याणराव, बिरादार, शहाजी कांबळे, संभाजी कदम, ज्ञानबा कांबळे, दयानंद वाघमारे, रमेश कांबळे, मधुकर कांबळे, अभंग कांबळे, दयानंद सूर्यवंशी, नरसिंग सूर्यवंशी, सतीश कांबळे, व्यंकट शिंदे, विठ्ठल शिंदे, बापूराव टेलर, सुरेश भुरे, करण भुरे, अंतेश्वर भुरे उपस्थित होते.

### बजरंग कांबळे यांचे निधन

**निलंगा, दि.२ ऑगस्ट-**



तालुक्यातील सावणगिरा येथील ज्येष्ठ नागरिक तथा सामजिक कार्यकर्ते बजरंग गोविंद कांबळे (वय ७५) यांचे आजाराने दि.२ ऑगस्ट रोजी उपजिल्हा रुग्णालय निलंगा येथे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि.२ ऑगस्ट रोजी सायंकाळी ३:३० वाजेच्या सुमारास सावणगिरा येथे त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले , एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# विविध मागण्यांसाठी निलंगा वकील संघाचे उपोषण

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि.२ ऑगस्ट-**

मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या विविध मागण्यांसाठी निलंगा वकील संघाच्या वतीने उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर गुरुवार दि १ ऑगस्ट रोजी लाक्षणिक उपोषण करण्यात आले.

या आंदोलनात निलंगा वकील संघाकडून पुढील मागण्या करण्यात आले. त्यात प्रामुख्याने न्यायालयाची जुनी इमारत पाडून आहे त्याच ठिकाणी नवीन इमारतीचे बांधकाम करून मि ळणे,दुय्यम निबंधक कार्यालय निलंगा हे शासकीय कार्यालय मागील अनेक वर्षापासून खासगी इमारतीमध्ये भाड्याने चालू असून ते दूर असल्याकारणाने गैरसोयीचे आहे. त्यामुळे सदरील कार्यालय हे मंजूर झालेल्या जागेवर स्थलांतरित करण्यात यावे.

निलंगा दुय्यम निबंधक कार्यालयाचे दुय्यम निबंधक अशोक शिंदे यांची बदली होऊन त्यांचा कार्यकाळ संपलेला आहे तरीही त्यांचे बेकायदेशीर रित्या शासकीय कामकाज चालू आहे. त्यांची तत्काळ बदली करण्यात यावी.

कोर्ट डिक्रीप्रमाणे फेर घेण्यास तलाठी नकार देत आहेत. हे गरीब शेतकरी, नागरिकांना परवडणारे नाही त्यामुळे कोर्ट डिक्री प्रमाणे फेर घेण्याचे आदेश द्यावेत. या आंदोलनाला काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अशोकराव पाटील निलंगेकर यांनी भेट देऊन आंदोलनाला पाठिंबा दिला.

यावेळी वकील बार असोसिएशनचे ॲड. चंद्रकांत भोसले, ॲड. एस.व्ही.कुरले, ॲड. डी.एन.पाटील, ॲड. एस.एम.मातोळे, ॲड.बी.आर. सोमवंशी, ॲड. दाताळ, ॲड. तिरुपती शिंदे, ॲड. मोरे पाटील, ॲड. व्ही.बी.क्षीरसागर, ॲड. प्रवीण भोसले, ॲड. हर्षवर्धन धुमाळ, ॲड. बंडप्पा कोकणे, ॲड. उमेश जाधव, ॲड. बळीराम जाधव, ॲड. वासुदेव जाधव, ॲड. गजानन मंठाळे, ॲड. अमोल धैर्य, ॲड.सुलक्षण धैर्य, ॲड. दत्ता जाधव, ॲड. हेमंत गायकवाड, ॲड. यु.एस.जाधव, ॲड.पौळ, ॲड. व्ही.एस.शिंदे, ॲड. रामदास सूर्यवंशी, ॲड. किरण घाडगे, ॲड.दयानंद बिराजदार, ॲड. सलगर, ॲड. तानाजी पाटील, ॲड. डी.जी.मोरे, ॲड. एस.व्ही. मुळजे, ॲड. अमोल सगरे उपस्थित होते.



# जिल्ह्यातील गुन्हेगारी आटोक्यात आणण्यासाठी उपाययोजना करा

## पालकमंत्री गिरीश महाजन यांच्याकडे आ.अमित देशमुख यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २ ऑगस्ट-**

शांत, सुरंक्षीत म्हणून ख्याती असलेल्या आणि शिक्षण, व्यापार औद्योगिक तसेच कृषी विकासाच केंद्र म्हणून सुप्रसीध्द झालेल्या लातूर जिल्ह्यात सध्या वाढत चाललेली गुन्हेगारी चिंताजनक असुन या जिल्हयातील कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी उपाययोजना आखून ताबडतोब त्यावर कार्यवाही करण्यासाठी पोलीस प्रशासनाला आदेश दयावेत, अशी मागणी करणारे निवेदन माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी जिल्हयाचे पालकमंत्री गिरीश महाजन यांना दिले आहे.

जिल्हयाचे पालकमंत्री असलेले गिरीश महाजन बऱ्याच आवधी नंतर काल जिल्हा नियोजन समिती बैठकीच्या निमीत्ताने लातूर जिल्हा दौऱ्यावर आले होते. बैठकी दरम्यान लातूर शहर व जिल्हयातील विकास योजना संदर्भात आमदार अमित देशमुख यांनी पालकमंत्री गिरीश महाजन यांना अनेक निवेदणे सादर केले आहेत. यात लातूर जिल्हयातील कायदा सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी करणारे निवेदण दिले आहे. या निवेदनात आमदार देशमुख यांनी म्हटले आहे की, लातूर जिल्हयात सामाजीक सलोखा राखून येथे कायम शांतता व सुरंक्षततेचे वातावरण निर्माण केले गेले आहे. त्यामुळे येथे शिक्षणाचा आदर्श पॅटर्न निर्माण होऊ शकला आहे. संपूर्ण महाराष्ट्रभरातून हजारो विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येत असतात येथील सुरंक्षीत वातावरणामुळे त्यांच्या पालकांना कसलीही चिंता वाटत नाही. या सुरक्षीततेच्या वातावरणामुळे लातूर आता उदयोग, व्यापार आणि आरोग्य सेवेचे केंद्र म्हणून परीचीत होत आहे. मागच्या काही महिन्यापासून मात्र लातूर जिल्हयात अनेक गुन्हेगारीच्या घटना घडल्या आहेत. खुन, चोऱ्या हे प्रकार वाढत आहेत शस्त्रसाठा सापडत आहे. मंगळसुत्र चोरी महीलावर हल्ले हे प्रकार नित्याचे झाले आहेत. विदयार्थ्यावर हल्ले होत आहेत. वसतीगृहातील विदयार्थीनीवर अत्याचार होऊन खुन झाल्याचे प्रकरण घडले आहे. बंदी असलेल्या गुटख्याचे साठे सापडले आहेत हे प्रकार त्वारीत थांबणे आवयक आहे. जिल्हयाच्या पालकमंत्री यांनी पोलीस यंत्रणेच्या कामकाजाचा आढावा घेऊन लातूर जिल्हयातील वाढती गुन्हेगारी आटोक्यात आणण्यासाठी उपाययोजना करण्याच्य सूचना दयाव्यात, अशी मागणी या निवेदनात आमदार देशमुख यांनी केली आहे.

या मागणी सोबतच लातूर जिल्हा रुग्णालयासाठी कृषी महाविद्यालयाची जमीन हस्तांतरित होण्यासाठी जिल्हा नियोजन समिती मधून ३ कोटी २८ लाखांचा निधी उपलब्ध करून द्यावा. पुणे येथे खून झालेल्या हरंगुळ येथील भाग्यश्री सुडे या विद्यार्थिनीच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा होण्यासाठी नामवंत विशेष सरकारी वकिलाची नियुक्ती करावी व यासाठी लातूर येथे जलद गती न्यायालयाची



स्थापना करावे. लातूर जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना मागच्या वर्षातील पीक विमा मिळण्यासाठी शासनाच्या वतीने प्रयत्न करावेत. लातूर एमआयडीसीमधील उद्योजकांना त्यांना हव्या असलेल्या प्रमाणात वीज मिळण्यासाठी आवश्यक त्या प्रमाणे रोहित्र उपलब्ध करून द्यावेत. लातूर येथील जिल्हा न्यायालयाच्या नवीन इमारत बांधकामाचा आराखडा तयार असून बांधकाम सुरू होण्यासाठी येत असलेल्या अडचणी त्वरित दूर कराव्यात. लातूर येथील विलासराव देशम ुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील इमारत बांधकाम व इतर सोयीसुविधांसाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून द्यावा आदी मागण्याचे निवेदणे माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी पालकमंत्री ना. गिरीश महाजन यांच्याकडे दिले आहेत. या बैठकीदरम्यान केलेल्या या मागण्याची नोंद घेऊन त्याची पूर्तता करण्यात येईल, अशी ग्वाही पालकमंत्र्यांनी या बैठकीदरम्यान दिली आहे.

लातूर
# दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल



## काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मधुकरराव चव्हाण यांनी घेतली आ.देशमुख यांची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २ ऑगस्ट-**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख बाभळगाव निवासस्थानी भेट घेऊन विविध विषयावर चर्चा केली.

यावेळी मुकुंददादा डोंगरे, प्रकाश चव्हाण, अशोक कदम, विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन रवींद्र काळे, दिलीप सोमवंशी, ऋषिकेश मगर, भालचंद्र मगर, ढवळे, रशीद बुलंगे, शिवाजी गायकवाड, बालाजी बंडगर आदी उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त



### राजीव गांधी पॉलिटेक्निक येथे अण्णा भाऊ साठे जयंती साजरी

**औसा, दि. २ ऑगस्ट -**

साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निक लातूर येथे अभिवादन करण्यात आले. तसेच लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त आदरांजली वाहण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष भिमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, कोषाध्यक्ष शिवलिंग जेवळे, उपप्राचार्या योगिता बावगे, आयटीआयचे प्राचार्य एम.जी.सोनहिवरे, सांस्कृतिक विभाग प्रमुख बी.आर.गवळी उपस्थित होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष भिमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, कोषाध्यक्ष शिवलिंग जेवळे उपप्राचार्या योगिता बाव उपस्थित होते.



### येरोळ येथे साठे यांची जयंती साजरी

**शिरुर अनंतपाळ, दि. २ ऑगस्ट -**

येरोळ (ता.शिरूर अनंतपाळ) येथे येथील विठ्ठल रखुमाई मंदिर सभागृहात साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली यावेळी उपसरपंच सतिश सिंदाळकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून पुष्प हार अर्पण करण्यात आले. याप्रसंगी शिक्षक प्रकाश नागटिळक यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगिताने झाली यावेळी उपसरपंच सतिश सिंदाळकर, प्रा.प्रभाकर चोचंडे, भिवाजी लोकरे, संदीप पाटील,भागवत तोंडारे, अमर माडजे-पाटील, विनोद लोंढे, रामलिंग लोंढे, पप्पू बनसोडे, अब्दुल मुजेवार, गुडू लोंढे, अंकुश लोंढे उपस्थित होते.




### मंगेशकर महाविद्यालयात वृक्षारोपण

**निलंगा, दि.२ ऑगस्ट-**

तालुक्यातील औराद शहाजनी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रीन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.प्रदीप पाटील यांच्या हस्ते अण्णाभाऊंच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. रासेयो च्या स्वयंसेवक सानिया मुल्ला, प्रीतम कल्याणे व रेणुका गाडे या विद्यार्थिनींनी अण्णा भाऊ साठे यांच्या व्यक्तित्व आणि साहित्य यावर आपल्या भाषणातून प्रकाश टाकला. याप्रसंगी डॉ.शंकर कल्याणे, प्रा. विकास पाटील, प्रा. विजय हांडे, डॉ.विनोद चिंते, एनएसएस प्रतिनिधी धनराज निंगाले, गजानन पाटील, मोईन आळंदकर, रुपेश मोरे, राजू बेलूरे उपस्थित होते. या वृक्षारोपणामध्ये रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. अशोक नारनवरे, ग्रीन क्लबच्या प्रमुख डॉ.सुचिता किडीले, संध्या उमाटे, रेशमा खामकर, सना शेरीकर, साक्षी पौळ, ज्योती मरगणे, अंकिता कांबळे, वैशाली धुमाळ, रेणुका शिंदे, देवानंद रामतीर्थे आदी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

### शिंदीजवळगा येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**निलंगा, दि.२ ऑगस्ट-**



साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त डॉ अरविंद भातांब्रे यांच्या पुढाकाराने तालुक्यातील शिंदीजवळगा येथे मोफत मधुमेह, रक्तदाब, नेत्ररोग तपासणी व चष्मे वाटप शिबीर संपन्न झाला. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त निलंगा विधानसभा मतदारसंघातील शिंदीजवळगा येथे-मोफत मधुमेह, रक्तदाब नेत्ररोग तपासणी व चष्मे वाटप आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला आलेल्या शिंदीजवळगा व परिसरातील नागरिकांना काँग्रेस डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ.अरविंद भातांब्रे साहेब यांनी मार्गदर्शन केले. येणाऱ्या काळात आपल्याला आरोग्या बद्दल कसलीही अडचन आली तरी मी रात्रंदिवस आपल्या सेवेत आहे असा शब्द .शिंदीजवळगा व परिसरातील नागरिकांना डॉ.भातांब्रे यांनी दिला.या शिबिरात १४६ रुग्णांनी सहभाग घेतला. ८९ रुग्णांनी नेत्र तपासणी केली. या शिबिरात तज्ञ डॉ. अरविंद भातांब्रे, डॉ.स्नेहा कांबळे, राहुल गावकरे, संतोष सातपुते, आंग्रे अप्पा, विनायक थोरमोठे आदींनी रुणाची सेवा केली.

## अण्णा भाऊंचे विचार नव्या पिढीसाठी प्रेरणादायी : आ. बाबासाहेब पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**चाकूर, दि. २ ऑगस्ट-**

थोर साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांचे साहित्यातील विचार हे नव्या पिढीसाठी प्रेरणादायी असून ते विचार सर्वांनी आत्म सात करावे असे प्रतिपादन आ. बाबासाहेब पाटील यांनी केले. लोकशाहीर डॉ अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीदिनी आयोजित केलेल्या जाहीर सभेत उदघाटन प्रसंगी ते बोलत होते.

जाहीर सभा गुरुवारी अण्णाभाऊ साठे चौक येथे संपन्न झाली.यावेळी प्रमुख पाहुणे उत्तमराव वाघ प्रतिष्ठानचे उत्तमराव वाघ, प्रथम नगराध्यक्ष मिलिंद महालिंगे,

नगरसेवक अभिमन्यू धोंडगे, काँग्रेस शहराध्यक्ष पप्पूभाई शेख, राकॉपा शहराध्यक्ष बाबुभाई दापकेवाले, राकॉपा सेवादल तालुक्याध्यक्ष शिवदर्शन स्वामी, स्वागताध्यक्ष रामेश्वर कसबे, लक्ष्मण तिकटे,सरपंच सुनील कांबळे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आ. पाटील यांनी अण्णाभाऊंनी आपल्या साहित्य लेखनातून वास्तव सामाजिक जीवनचित्र रेखाटले आहे,त्यांची साहित्यकृती संपूर्ण देश, परदेशात पसरली आहे. त्यांचे विचार सामान्य तळागाळातील लोकांपर्यंत



पोहचवून शैक्षणिक प्रगती साधावी असे विचार व्यक्त केले. यावेळी गुरुवारी सकाळी चाकूर शहरात डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त लक्ष्मी नगर, साठे नगर, इंदिरा नगर, राजीव गांधी नगर येथे अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अण्णाभाऊ साठे चौकातील मुख्य ध्वजारोहन करण्यात आले. दरम्यान डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या चौकाच्या सुशोभीकरणाचे आ. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते फीत कापून अनावरण करण्यात आले. यावेळी जि. प. शाळेतील मोहन साबणे आणि दीपांश खडके या विद्यार्थ्यांनी डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर पोवाडा गायीला. त्यास उपस्थितानी दाद देऊन त्या विद्यार्थ्यांचे कलाकार सचिन वैरागे यांचाही आ. पाटील यांनी कौतुक केले.

सायंकाळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेची विविध देखावे सादर करुन भव्य मिरवणूक काढण्यात आली.यावेळी पोलीस निरिक्षक दत्तात्रय निकम यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि कपिल पाटील, योगेश मरपल्ले आदी पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

या कार्यक्रमाला अनिल वाडकर, सुभाष काटे, आबा कवठे, नगरसेवक साई हिप्पाळे,संदीप शेटे,जयंती समितीचे अध्यक्ष नितीन डांगे, सचिव बालाजी मोठेराव, पवन मोठेराव, रवी कांबळे,परमेश्वर गायकवाड, चंदू औसेकर, पप्पू वैरागे, बाबुराव गायकवाड, सचिन वैरागे, दिवाकर मोठेराव, सोनू वाघमारे, राम मोठेराव, संतराम मोठेराव उपस्थित होते.




## विशाल सहकारी संस्थेच्यावतीने शेतकऱ्यांसाठी उपक्रम

**तभा वृतसेवा,**
**शिरुर आनंतपाळ, दि. २ ऑगस्ट-**

शिरुर आनंतपाळ मंगल कार्यालय शिरूर अनंतपाळ येथे शेतकऱ्यांची बैठक घेऊन कृषीभिमुख कार्यक्रम राबवण्यात आला. शिरूर अनंतपाळ तालुक्यातील सर्वात मोठी संस्था म्हणजे विशाल विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित शिरूर अनंतपाळ ही आहे.

या संस्थेचे विद्यमान चेअरमन शिरूर अनंतपाळ तालुक्याचे आर्थिक हितचिंतक म्हणून राम किसनजी गड्डीमे हे आहेत यांच्या कल्पक व्यक्तिमत्वामुळे या सहकारी संस्थेकडून शेतकऱ्यांसाठी अनेक उपक्रम नेहमीच राबवले जातात त्यातीलच एक ऑगस्ट रोजी राबवण्यात आलेला उपक्रम म्हणजे या संस्थेच्या अंतर्गत असलेल्या २१०० शेतकऱ्याला प्रत्येकी एक आंब्याचे झाड देऊन त्या शेतकऱ्याचा सन्मान करण्यात आला अशा प्रकारचा अभिनव उपक्रम या संस्थेकडून राबवण्यात आल्यामुळे माननीय संस्थेचे चेअरमन रामकिसनजी गड्डीमे व त्यांचे कार्यकारी मंडळ या सर्वांचे शिरूर अनंतपाळ तालुका भरातून अभिनंदन करण्यात येत आहे

कार्यक्रमाचे अध्यक्ष कृषीनिष्ठ म्हणून ओळख असलेले काशिनाथजी देवंगरे हे होते तर या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर अनमोल सागर हे होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. संभाजीराव पाटील, शिक्षण महर्षी म्हणून प्रभाकरराव कुलकर्णी, एल.बी.आवळे, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक व्यंकटराव पाटील, जिल्हा मध्यवर्तीचे संचालक जयेश माने, अनुप शेळके, दत्तात्रेय गिरी-बदनाळे, विडबाग, गोविंद पेद्देवाड, विठ्ठल दराडे, बि.टी. चव्हाण, व्ही.व्ही.घुले, तालुका कृषी अधिकारी खताळ या संस्थेचे व्हाईस चेअरमन या सर्वांना निमंत्रित करण्यात आले होते. याप्रसंगी या कार्यक्रमाची या संस्थेच्या संचालक मंडळाकडून विशेष अशी काळजी घेण्यात आली संचालक मंडळ या संस्थेचे व्हाईस चेअरमन रामलिंग शिवणे गट सचिव नवनाथ गिरी संचालक औदुंबर शिंदाळकर बब्रुवान इंद्राळे नारायण नरवटे फक्रुद्दीन मुज्जेवार शबीर पटेल हिरालाल दूरगकर अरविंद चेवले नामदेव लोखंडे मुरलीधर दिवेकर, कुसुम शिवकुमार तोंडारे, सूर्यकांता बिराजदार आणि या संस्थेचे लिपिक म्हणून संजय देवंगरे सहलिपिक अनंत गुगळे गणेश कामगुंडा या सर्वांकडून सहकार्य करण्यात आले.

## धनेगांव ग्रामपंचायतीच्या वतीने तणनाशक फवारणी

**तभा वृत्तसेवा,**
**वलांडी, दि.२ ऑगस्ट-**

सततच्या पाऊसामूळे गावात मोठ्या प्रमाणात गवत वाढले होते. डासांचा वाढत्या प्रार्दुभावामूळे आरोग्य धोक्यात आले होते, डासाचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी ग्रामपंचायतीच्या वतीने दरवर्षी प्रमाणे तणनाशक फवारणी करण्यात येत आहे.

पावसाळ्याचे दिवस असल्यामूळे धनेगांवात ठिकठीकाणी गाजरगवत, पाला, मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे डासांचे प्रादुर्भाव वाढला आहे. यामूळे नागरिकाचे आरोग्य धोक्यात आले असून विविध साथीचे आजार उद्भवण्याची भिती लक्षात घेवून ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने संपूर्ण गावात तणणाशक



फवारणी मोहीम व गटार साफ करण्याचे काम प्रगतिपथावरती आहे. धनेगांव गावात सगळीकडे नुकतीच तणनाशक फवारणी केलेली असल्यामूळे जनावरांच्या खाण्यात आल्यास, त्यापासून त्यांना विषबाधा होऊ शकते. म्हणून ग्रामस्थांनी आपले गुरे, ढोरे, शेळ्या, मेंढ्या यांना चरण्यासाठी मोकाट सोडू नये, असे आवहान ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने उपसंरपच रामलिंग शेरे यांच्या वतीने करण्यात आले आहे.




## संस्कारित नागरिक घडावा हेच नेतृत्व गुण विकास शिबिराचे फलित : डॉ. हेमंत वैद्य

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि.२ ऑगस्ट-**

लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयाचे नेतृत्व गुण विकास शिबीर भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालयात संपन्न झाले. नेतृत्वगुण विकास शिबिरातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला उजाळा मिळून हीच मुले भविष्यात संस्कारित नागरिक म्हणून समाजात जबाबदारीने वागून नेतृत्व करीत असतात असे उद्गार भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य यांनी नेतृत्व गुण विकास शिबीरामध्ये विद्यार्थ्यांना संबोधित करताना काढले.

शास्त्री विद्यालयात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा व त्यांच्यात नेतृत्व गुणांची भर पडावी या हेतूने शिबिराचे आयोजन केले होते. शिबिराचे उद्घाटन तहसीलदार राम बोरगांवकर यांच्या हस्ते पार पडले.

व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, शंकरराव लासुणे, विजयराव चाटुफळे, उमेश जगताप, सतीशराव कुलकर्णी, सतनप्पा कुलकर्णी, संतोष कुलकर्णी, डॉ. संजय कुलकर्णी, शिबीर निरिक्षक प्रल्हाद माले, मुख्याध्यापक अनंतराम कोपले, उपमुख्याध्यापक अरूण पत्की उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट, माधव मठवाले, आशा गौतम, विजया गोविंदवाड आदी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## कर्जबाजारीपणामुळे आंबेगाव येथील शेतकऱ्यांची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. २ ऑगस्ट -**

निलंगा तालुक्यातील आंबेवाडी (म) येथील शेतकरी उमाकांत पांडुरंग जावळे वय ४० वर्ष यांनी दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी सहा वाजता आपल्या राहत्या घरी नापिकीला व कर्जबाजारी पणामुळे गळफास घेऊन आत्महत्या केली.



त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी अनुसया उमाकांत जावळे व तीन मुले आहेत.

## जगद्गुरुंच्या उपस्थितीत भक्तांनी घेतली शिवदिक्षा

### उज्जेन पिठाधिपतींच्या उपस्थितीत हिरेमठ संस्थानचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. २ ऑगस्ट -**

औसा येथील हिरेमठ संस्थानच्या ८४ व्या वार्षिक महोत्सवानिमित्त उज्जैन पीठाचे श्रीमद् जगद्गुरु डॉ. सिद्धलिंग राजदेशीकेंद्र शिवाचार्य महाराज यांच्या दिव्य सानिध्यामध्ये महाराष्ट्र कर्नाटक तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातील हजारो शिवभक्तांनी इष्टलिंग महापूजा करून शिव दीक्षा घेतली.

हिरेमठ संस्थानचे लिंगैक्य गुरु निरंजन शिवाचार्य महाराज यांनी आठ दशकापूर्वी वार्षिक महोत्सव आणि शिव दीक्षा सोहळ्याचे सुरुवात केली होती. वीरशैव भक्तामध्ये धर्मजागृती व्हावी. म्हणून त्यांनी सुरू केलेली अखंड परंपरा कायम राखत संस्थानचे मार्गदर्शक डॉ.शांतिवीर शिवाचार्य महाराज व विद्यमान पिठाधिपती बाल तपस्वी



निरंजन शिवाचार्य महाराज यांनी अविरतपणे चालू ठेवली आहे. गुरु पौर्णिमेपासून सुरू झालेल्या महारुद्राभिषेक शिवभजन, शिवकथा शिव कीर्तन, आणि नित्य महाप्रसाद आदी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. धर्मानेच विश्वाला शांती मिळेल या उद्देशाने हिरेमठ संस्थानच्या वतीने सुरू असलेल्या धर्मजागृती अखंड परंपरेमुळे संस्थांचा नावलौकिक वाढला आहे. या निमित्त आयोजित केलेल्या ईस्टलिंग महापूजा व शिव दीक्षा सोहळ्यानिमित्त मागील आठ दिवस संगीतमय शिव कथेतून एक भक्तांना मंत्रमुग्ध करणारे स्वरसम्राट श्री अमृतेश्वर शिवाचार्य महाराज जिंतूर,आमदार अभिमन्यू पवार, अर्चनाताई पाटील-चाकूरकर , वीरसेवा समाजाचे अध्यक्ष सुभाष मुक्ता, जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य संतोष मुक्ता यांनी श्रीमद जगद्गुरु यांचे आशीर्वाद घेतले. संस्थांनचा वार्षिक महोत्सव व शिव दीक्षा सोहळा यशस्वीपणे पार पडवा यासाठी वीरशैव समाज औसा वीरशैव युवक संघटना औसा, विजयकुमार मिटकरी, रमेश अप्पाराव राचट्टे, नागेश टिळेकर, रेवनसिद्ध भागुडे, शांतीरप्पा मुरगे, राजाभाऊ नागराळे, चंद्रशेखर कुरले यांच्यासह वीरशैव समाजाचे पदाधिकारी यांनी पुढाकार घेतला आहे.



## शिवाजी महाविद्यालयात किसान वार्षिक अंकाचे प्रकाशन

**तभा वृतसेवा,**
**उदगीर, दि. २ ऑगस्ट-**

शिवाजी महाविद्यालयामध्ये किसान वार्षिकांकाचा प्रकाशन सोहळा नुकताच पार पडला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील एकंबेकर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव पी.टी. शिंदे, पृथ्वीराज पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरविंद नवले,उपप्राचार्य डॉ. आर.एम.मांजरे, अंकाचे कार्यकारी संपादक डॉ. नरसिंग कदम, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य व्ही आर भोसले, ग्रंथपाल डॉ.व्ही.एम. पवार, प्रबंधक बालाजी पाटील, व्हि.डी. गुरुनाळे, आर.एम.लाडके यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी दरवर्षी वार्षिकांक काढला जातो. २०२३-२४ साठी संपादक मंडळांनी भारतीय स्वातंत्र्य लढा हा विषय दिलेला होता. मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, संस्कृत या विषयामध्ये विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्वक लेखन केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन कार्यकारी संपादक डॉ. नरसिंग कदम, संपादक मंडळ सदस्य डॉ. एम. एफ. नदाफ, डॉ. पी.डी.माने,प्रा.बालाजी सूर्यवंशी, डॉ एन.डी.शिंदे यांनी केले. या अंकाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य व उपप्राचार्य यांनी मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या.

सोलापूर तरुण भारत

वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

शुभेच्छुक

सोलापूर जिल्हा शरीर सौष्ठव संघटना

राजकुमार सुरवसे
अध्यक्ष

प्रमोद काटे
सचिव

राजकुमार सुरवसे



सोलापूर तरुण भारतच्या ४० व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..

SHREERAM
SPORTS CLUB SSC KBD
SOLAPUR

श्रीराम स्पोर्टस क्लब कबड्डी, सोलापूर

संस्थापक अध्यक्ष : मरगु जाधव राष्ट्रीय कबड्डी खेळाडू

उपाध्यक्ष : सोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशन

मो. ९८९०५६११७१

मार्गदर्शक : प्रा.सुवर्णा सिद्राम कांबळे

एन.आय.एस. प्रशिक्षिका

विशेष : मुलींना मोफत कबड्डी प्रशिक्षण

मो. ९८८१६९१७७९

स्थळ : श्री स्वामी विवेकानंद प्रशाला, जुळे सोलापूर

वेळ : सायं. ५ ते ७.३०



मराठा समाज सेवा मंडळ संचलित

छत्रपती शिवाजी रात्र कनिष्ठ महाविद्यालय व छत्रपती शिवाजी रात्र कला व वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर

जिमखाना विभाग

'सोलापूर तरुण भारत' वर्धापनदिन

चिरायु होवो..!

मा.मनोहरपंत ग. सपाटे

अध्यक्ष व माजी महापौर



दैनिक तरुण भारत च्या

कर्मयोगी

श्रद्धेय कै. सुधाकरपंत परिचारक

वर्धापन दिनानिमित्त

हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

युटोपियन शुगर्स लि.

पंतनगर, कचरेवाडी, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर

An ISO 9001:2015 & ISO 22000:2018 Certified Company

UTOPIAN SUGARS LTD

इंडीयन फेडरेशन ऑफ ग्रीन एनर्जी, दिल्ली यांचा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त

६० केएलपीडी आसवानी प्रकल्प



'सोलापूर तरुण भारत'

वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

शुभेच्छुक

सुरज शिवशरण

बुधवार पेठ, सोलापूर



वाढेगांव ता.सांगोला येथील तीन नद्यांच्या संगमावरील काशीसमान असणाऱ्या शिवमंदिरात श्रावण महिन्यात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत असते. वाढेगांव येथील माण,कोरडा आणि अफुका या तीन नद्यांचा संगम आहे.या तिन्ही नद्या उत्तरवाहिनी असून नद्यांच्या संगमाच्या ठिकाणी ७०० ते ८०० वर्षापूर्वीचे ऐतिहासीक कोरीव दगडी बांधकाम केलेले शिवमंदिर होते, ५०/६० वर्षापूर्वी हे मंदिर पूर्णपणे पडल्याने दगडामध्ये शिवलिंग आणि चार नंदी हे त्या स्थळाची साक्ष देणाऱ्या दगडी मूर्ती उभ्या होत्या.मात्र हे ठिकाण दुर्लक्षित झाल्यामुळे सभोवती काटेरी झाडे,गवताने मंदिराला वेढले होते.तशाही अवस्थेत श्रावण मासानिमित्त विशेषतः श्रावणी सोमवारी भाविक संगमावरील महादेवाच्या दर्शनासाठी येत होते.हे पाहून वाढेगांव पंचक्रोशीतील शिवभक्तांनी मंदिराचा जीर्णोद्धार केला. मंदिर परिसरात वड,पिंपळ,उंबर,चिंच,लिंब इ.सह अनेक मोठे वृक्ष नव्याने लागवड केले असून पिण्याच्या पाण्याची ही सोय करण्यात आली आहे. वाढेगावातील नागरीक दिनक्रम सुरु करण्याआधी शिवलिंगाचे दर्शन घेतात,हे येथील वैशिष्ट्य.

# वाढेगांव येथील त्रिवेणी संगमावरील पवित्र शिवमंदिर





प्रविण घोंगडे
मो. ९५२७७०१६७१


या संगमस्थळावर १९९ वर्षापूर्वी म्हणजेच अंदाजे १८९२ साली एक साधू वास्तव्यास होते. आयुष्याचा उत्तरार्ध काशीच्या पवित्र स्थळावर कारणी लागावा आणि तिथेच शेवटचा श्वास सोडावा अशी त्यांची इच्छा होती. परंतू काशी क्षेत्री उत्तरवाहिनी नद्यांचा पवित्र त्रिवेणी संगम आणि पवित्र मंदिर आहे तसेच स्थळ इथेही आहे. इथेच मला काशी भेटली आहे,तर मला इथेच राहू द्या,अशी गावकऱ्यांना विनंती करुन ते येथे राहिले होते.'आप्पा' महाराज या नावाने लोक त्यांना ओळखत होते. आपले मरण कोणत्या दिवशी, कुठल्या वेळेला आहे हे या महाराजांनी लोकांना सांगितले होते आणि त्याप्रमाणे त्यांचे निधन झाले. त्यांचा मृत्युही आश्चर्यकारक व गांवातील नागरीकांपुढे प्रश्न निर्माण करणारा ठरला. या साधूनी ग्रामस्थांना संगमावर बोलावून सांगितले होते की, माझ्या मृत्युनंतर माझ्या शरीराचे दहन किंवा दफन करु नका. आसपास कुठेही मोकळ्या रानात माझे प्रेत टाकून द्या. पशुपक्षांना माझ्या शरीराचे मांस खावू द्या. त्यामुळे पशुपक्षांची एकवेळची भूक भागेल आणि माझे जीवन सत्कारणी लागेल, अशी लोकांना त्यांनी विनंती केली होती. मात्र, साधूच्या या बोलण्यावर लोकांनी विश्वास न ठेवता त्यांच्या मृत्युनंतर लोकांनी साधूचे प्रेत, कमंडलू व चिमटा संगामावर दफन केले.

त्यानंतर धर्मशास्त्राप्रमाणे तिसऱ्या दिवशी धार्मिक विधी करण्यासाठी सकाळीच काही नागरीक संगमावर गेले आणि तिथला प्रकार पाहून गर्भगळीतच झाले. ज्या ठिकाणी साधूचे दफन केले होते. त्या खड्ड्यावरील मातीचा ढिग जसाच्या तसाच होता. मात्र, साधूच्या डोक्याच्या जठा, दाढीचे केस आणि त्यांच्याबरोबर दफन केलेले कमंडलू आणि चिमटा या वस्तू वर येवून पडल्या होत्या. तेथे गेलेल्या लोकाना प्रश्न पडला की तिसऱ्या दिवसाचा विधी कसा काय करायचा? तेंव्हा काही लोकांनी मार्ग काढला की, प्रेत दफन केलेला खड्डा परत उकरुन काढायचा आणि त्या खड्यात साधूचे प्रेत आहे का पहायचे आणि त्यानंतर तिसऱ्या दिवसाचा विधी करायचा असे ठरवून ग्रामस्थांनी तो खड्डा पूर्णपणे परत खोदून काढला तेंव्हा आंतमध्ये साधूचे प्रेत नव्हते. लोकानी आसपासच्या परिसरात फिरुन शोध घेतला परंतू साधूचे प्रेत किंवा त्याचे अवशेष कुठेच मिळाले नाहीत. अशी या साधूची अख्यायिका असून गांवातील लोकानी त्या खड्ड्यावर दगडी समाधी बांधली आहे. शिवलिंगाची प्रतिष्ठापना करुन मंदिरावर शिखर बांधून कळसरोहण व साधूच्या समाधीचा जीर्णोद्धार करण्यात आला असून श्रावण महिन्यात भाविकांची दर्शनासाठी गर्दी होतअसते.

---

मध्ययुगीन काळात सोलापूरला जे ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले त्यास सोलापूरचा किल्ला हे एक प्रमुख कारण होते. हा सोलापूरचा किल्ला भुईकोट स्वरूपाचा आहे. या किल्ल्याचे बांधकाम विविध राजवटींच्या काळात घडून आलेले आहे. काही जणांच्या मते हा किल्ला १४व्या शतकात बांधला गेला तर काहींच्या मते हा किल्ला १२व्या शतकामध्ये बांधला गेला आहे. पुढे बहामनी शाही, आदिलशाही व निजामशाही राजवटींनी या किल्ल्याची बांधकामे वेळोवेळी केली. सोलापूरचा किल्ला हा खंदकाने संरक्षित केलेला होता.

# सोलापूरच्या किल्ल्याची अखेरची लढाई





प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण
मो. ९८५०३३६३३८

या किल्ल्याने पेशवाईची अखेरची लढाई इंग्रजांच्या बरोबर सन १८१८ मध्ये दिली. दुसरे बाजीराव पेशवे हे छत्रपती प्रतापसिंह महाराजांबरोबर सोलापूर जिल्ह्यात असताना इंग्रजांनी त्यांचा पाठलाग करून आष्टी या ठिकाणी त्यांच्याशी युद्ध केले. छत्रपती प्रतापसिंह महाराजांना मागे सोडून बाजीराव पेशवे हे पुढे गेले. आष्टीची लढाई झाल्यानंतरही सोलापूर हे पुढे तीन महिने पर्यंत रणक्षेत्र बनले होते. या सोलापूरच्या किल्ल्याच्या आश्रयानेच पेशवाईतील अखेरची लढाई लढली गेली. सोलापूरच्या किल्ल्यावर भरपूर शिबंदी व दारूगोळा होता. किल्ल्याच्या बाहेर अरब, रोहिले, सिद्दी, गोसावी यांचे पायदळ व घोडदळ होते. मेजर डी पिंटो हा मराठी पायदळांवरील मुख्य अधिकारी होता. मराठी सैन्याच्या तोफखानाच्या प्रमुख सरदार गणपतराव पानसे हा देखील तोफखान्यासह यावेळी सोलापुरात होता. इंग्रजांकडे प्रिझलर व मनरो असे दोन सेनानी होते. त्यांनी एकत्रित येऊन किल्ल्यावर समोरासमोर हल्ला करणे टाळले. कारण त्यांना माहिती होते की किल्ल्यावर जर समोरून हल्ला केला तर आपणास अपयशी व्हावे लागेल. म्हणून त्यांनी भेदनीतीचा वापर करून येथील लोकांमध्ये फितुरी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी सुभेदार चैनसिंहाला सोलापूरच्या किल्लेदाराकडे पाठविले. परंतु किल्ल्यातील अरबांनी किल्ल्याच्या भिंतीखाली चैन सिंहाला ठार मारले. अशा रीतीने किल्ला फितुरीने जिंकण्याचा मार्ग बंद झाल्यानंतर इंग्रजांनी सर्वप्रथम सोलापूर शहर जिंकण्याचे ठरविले. शहरा भोवती मजबूत अशा प्रकारचा तट होता. १० मे१८१८ रोजी सूर्योदयावेळी इंग्रज सैन्यांनी शहराच्या तटाला शिड्या लावून आत प्रवेश केला. त्यांनी वेशीचे दार उघडले. त्याबरोबर इंग्रजी सैन्य आत घुसले

गणपतराव पानसेंनी किल्ल्याजवळील आपल्या आपली जागा सोडून पूर्वेच्या बाजूने वळसा घेऊन सात तोफा पायदळ, घोडेस्वार यांच्या साह्याने इंग्रजांच्या राखीव फौजेवर हल्ला केला. हा हल्ला इतका जबरदस्त होता की इंग्रजांना प्रतिकार करणे शक्य झाले नाही. जनरल मनरोने आपले राखीव सैन्य हलवून शहराच्या तटाच्या आश्रयाला नेले. किल्ला लढविण्याच्या गणपतराव पानसेंच्या निर्धारामुळे व त्याच्या पराक्रमाने विजयाचे पारडे मराठ्यांच्या बाजूला झुकले.

परंतु दैव मात्र मराठ्यांना अनुकूल नव्हते. पानसे तोफांचा भडीमार चालू असतानाच त्यातील एक तोफ फुटली. त्यामुळे सैन्यात गोंधळ निर्माण झाला. त्यातच इंग्रजांकडील एक गोळी गणपतराव पानसेंच्या उजव्या हातात शिरून ते जखमी झाले. त्यामुळे काही काळ ते बाजूस जाऊन बसले. त्यांच्या हाताखालील एक अधिकारी ही इंग्रजांच्या गोळीमुळे मरण पावला. या घटनांमुळे मराठ्यांचा तोफखाना थंडावला. परिणामी इंग्रजांना हुरुप येऊन त्यांनी किल्ल्याच्या दक्षिणेकडे मोर्चे उभारले. किल्ल्याच्या तटावर तोफांचा मारा सुरू केला. १४ मे रोजी दुपारी किल्ल्याच्या बाहेरील भिंतीस खिंडार पडण्यामध्ये ते यशस्वी झाले. इंग्रजांनी मिळविलेल्या या यशानंतर किल्लेदार त्यांना शरण आला. ३७ मोठ्या तोफ्यांसह किल्ला इंग्रजांच्या हाती पडला. अशा तऱ्हेने सोलापूरच्या किल्ल्याने व तोफखाना प्रमुख गणपतराव पानसे यांनी इंग्रजांना अत्यंत कडवी अशी दिलेली झुंज सोलापूरकरासाठी अभिमानास्पद अशी गोष्ट आहे.

---

शब्दातून संघर्षाची प्रेरणा त्याचे मार्गदर्शक अश्विन व अंजना कडलासकर यांच्याकडून २०२१ पासून मिळाली. खेळामुळे मन व बुद्धी या दोन्ही गोष्टी कशा पद्धतीने बळकट करता येतील याचे मार्गदर्शन त्यांच्याकडून मिळाले. स्पर्धा म्हणजे यश-अपयश नव्हे तर स्पर्धा म्हणजे लढण्याची जिद्द. ही जिद्द उरात बाळगून लाठी असोसिएशन सोलापूरचे शिवराम भोसले नवनवीन उपक्रम घेत विद्यार्थ्यांना लढण्याची प्रेरणा व संघर्षातून यश कसे मिळते याची प्रेरणा देत असतात. याचेच उदाहरण म्हणजे प्रतोष संतोष आळंद.



# प्रतोषची दक्षिण आशियाई लाठी स्पर्धेत सुवर्ण भरारी

अजितकुमार संगवे
मो. ९८८११३३१०३



प्रतोष इंडियन मॉडेल स्कूल सीबीएससी मध्ये आठव्या इयत्तेत शिकतो. नेपाळमध्ये २०२२ मध्ये झालेल्या पहिल्या दक्षिण आशियाई लाठी चॅम्पियनशिप स्पर्धेत त्याने एक सुवर्ण आणि एक रौप्यची कमाई केली. त्यानंतर २०२४ मध्ये गोव्यातील दुसऱ्या दक्षिण आशियाई लाठी चॅम्पियनशिप

### प्रतोषची लाठी स्पर्धेतील कामगिरी

राज्य :
२०२१- एक रौप्य, एक ब्राँझ.
२०२३- एक सुवर्ण, दोन रौप्य.
तांग सू -एक रौप्य
राष्ट्रीय :
२०२२- एक सुवर्ण, एक ब्राँझ.
२०२४- एक सुवर्ण
२०२३- मार्शल आर्ट्स - एक सुवर्ण, एक रौप्य.
२०२४- पार्सल आर्ट्स गेम्स - दोन सुवर्ण.
सायन्स ऑलिम्पियाड फाउंडेशन एसओएफ- एक सुवर्ण.



स्पर्धेत २ सुवर्णपदके पटकावीत आपली कामगिरी उंचावली आहे.

अभ्यास व खेळ या दोन्ही गोष्टींची योग्य रीतीने सांगड घालत तो यश संपादन करत आहे. लहानपणापासूनच अष्टपैलू. वेगवेगळे खाद्यपदार्थ करण्याची आवड. टेक्निकली हुशार, मनमिळाऊ व आदरार्थी असा आहे. विज्ञान हा त्याचा आवडता विषय आहे. जमिनीवर घट्ट पाय रोवून उभं राहायचं आणि तरीही क्षितिजाचं स्वप्न पाहायचं भान खेळच आपल्याला देतात. या प्रेरणेतूनच ७ ऑक्टोबर २२ रोजी महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर कळसुबाई. ज्याला महाराष्ट्राचा एव्हरेस्ट म्हणतात व ज्याची उंची ५६०० फूट एवढी आहे या शिखरावर अश्विन कडलासकर व त्यांची टीम. ज्यामध्ये प्रतोषचाही सहभाग होता. भारत मातेचा अभिमान असलेला तिरंगा ध्वज फडकवत लाठीकाठी युद्ध कलेचे चित्तथरारक प्रात्यक्षिक करत एक आगळावेगळा विक्रम त्यांनी रचला. आणि यातच नवीन एका विक्रमाची भर पडली. 'सोने पे सुहागा' म्हटलं तर ते वावग ठरणार नाही. कारण १५ ऑगस्ट २०२३ रोजी सिंदखेडराजा (जि. बुलढाणा) येथे ५ तास ५ मिनिटे ५ सेकंद वेगवेगळी शस्त्रास्त्रे चालवून वर्ल्ड रेकॉर्ड केले. त्यामध्ये प्रतोषने परसू कुऱ्हाड चालवली. त्याला अश्विन व अंजना कडलासकर यांच्याकडून प्रेरणा मिळत गेली की ज्यामुळे त्याने एवढ्या लहान वयात हे यश संपादन केले. लाठी स्पर्धेतच आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगिरी करण्याचा त्याने ध्यास घेतला आहे.

---

# क्रिकेटपटू ते प्रशिक्षक प्रकाश कंपली

## आंतरराराष्ट्रीय अनघा देशपांडे, स्वरूपा कदम घडले

**ज्यांनी आपल्या क्रिकेट कारकिर्दीमध्ये १६, १९ वर्षाखालील गटात तीन वेळा महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व केले आहे. उजव्या हाताचा, मध्यमगती आघाडीचा गोलंदाज म्हणून त्याची खरी ओळख. ते आहेत प्रकाश चंद्रप्पा कंपली. त्यांनी या कारकिर्दीमध्ये त्यांनी बरीच बक्षिसे मिळवली.**



क्रिकेट विश्वामध्ये १९९६मध्ये त्यांची खरी कारकीर्द सुरु झाली ती म्हणजे क्रिकेट प्रशिक्षक म्हणून. त्यावेळेस हरिभाई देवकरण प्रशालेत क्रिकेट प्रशिक्षक म्हणून कार्यरत असताना शाळेतील माजी विद्यार्थ्यांना पार्क मैदान येथे स्वतः मैदान भाडे देऊन ते खेळाडूंचा सराव करून घेतं असत. त्यावेळी विद्याप्रभा स्पोर्ट्स फाउंडेशनच्या नावाने जयंत दळवी व प्रकाश भुतडा यांच्या मार्गदर्शनाखाली पाच वर्षे त्यांनी क्रिकेट अकॅडमी चालवली. हे करत असताना त्यांच्या अकॅडमीतील अनेक मुलांना आणि मुलींना महाराष्ट्र आणि विद्यापीठस्तरावर खेळण्याची संधी मिळाली.

२००१ मध्ये व्हि.के.जी क्रिकेट अकॅडमी या नावाने गुलबर्गा येथील माजी आमदार मलकया गुत्तेदार यांच्या मार्गदर्शनाखाली व रोहित गुत्तेदार यांच्या सहकार्याने तब्बल १५ वर्ष पार्क मैदान येथे क्रिकेट अकॅडमी चालविली. त्यानंतर २०१६मध्ये त्यांनी ह.दे. प्रशालेचे उपमुख्याध्यापक व अकादमीचे चेअरमन हणमंत मोतीबने यांच्या मार्गदर्शनाखाली व क्रीडशिक्षक प्रमोद चुंगे यांच्या सहकार्याने कंपली प्रकाश क्रिकेट अकॅडमी (के. पी. क्रिकेट अकॅडमी) या नावाने क्रिकेट अकॅडमी सुरु केली. आतापर्यंत १९९६ पासून कंपली यांच्या मार्गदर्शनाखाली क्रिकेट प्रशिक्षण घेऊन अनेक खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर सरकारी नोकरी मिळविली.

२०१७ मध्ये ५ खेळाडू महाराष्ट्र संघाकडून खेळले. ह्यामध्ये महेश हिप्परकर, विवेक अणची, ऋषिकेश गावडे, वैष्णव जावळे व धनश्री भोसले आणि २०२३ मध्ये पुन्हा पाच खेळाडूंनी महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व केले. या यामध्ये प्रतिभा माशाळ,आर्या उमाप, संचिता सपाटे, अथर्व काळे व नारायण डोके यांचा समावेश होता. यातून नारायण डोके व अथर्व काळे यांची एम.सी.ए.च्या संघात सुद्धा निवड झाली होती. अकॅडमीमध्ये त्यांचे सहकारी राष्ट्रीय खेळाडू समीर वजीरकर, विद्यापीठ खेळाडू चंद्रकांत जाधव, ऐश्वर्या गिरे तसेच क्रीडा शिक्षक माणिक साळसकर, प्रमोद चुंगे व अक्षय गवळी यांचे सहकार्य असते.

मानाचा सोलापूर जिल्हा परिषद व बहुविध जिल्हा क्रीडा परिषद यांच्या मार्फत देण्यात येणारा सोलापुरातील सर्वोत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक ''हुतात्मा क्रीडा पुरस्कार'' २००२ मध्ये जिल्हाधिकारी यांच्या हस्ते गौरविण्यात आले. तसेच त्यांना स्पोर्ट्स पॅव्हेलियनचा पुरस्कार व इतर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

त्यांनी स्वतःच्या अकॅडमीतून अनेक खेळाडू आंतरराष्ट्रीय संघातून खेळावेत, आपल्या सोलापूरचे नाव व अकॅडमीचे नाव देशभर करावे, हाच त्यांचा ध्यास आहे.

### ह.दे.चे एकाच वेळी ७ खेळाडू महाराष्ट्र संघात

कंपली यांच्या मार्गदर्शनाखाली अनघा देशपांडे आंतरराष्ट्रीय खेळाडू व स्वरूपा कदम आंतरराष्ट्रीय राखीव खेळाडू व तसेच राज्यपातळीवर २००हून अधिक खेळाडूंना, तर ५० हून अधिक खेळाडूंना राष्ट्रीय पातळीवर खेळण्याची संधी मिळाली. तसेच २५हून जास्त खेळाडूंनी विद्यापीठ संघाचे प्रतिनिधित्व केले. हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे २००२ मध्ये एकाच वर्षात त्यांच्या मार्गदर्शनाखाली सात खेळाडूंची निवड महाराष्ट्र संघात झाली होती. यामध्ये अनघा देशपांडे, स्वरूपा कदम, किरण सोनी, वर्षा हक्के, सारिका कुरनूरकर, वैशाली बिराजदार व सोनिया शिंदे हे खेळाडू होते. एकाच वर्षात ७ खेळाडूंनी महाराष्ट्र संघात खेळण्याची ही आजपर्यंतची एकमेव ऐतिहासिक नोंद आहे.

# सोलापूरच्या साहित्य, नाट्य, संगीत, शिल्प आणि सांस्कृतिक क्षेत्रातील वाटचाल





**सोलापूर हे शहर तसं महाराष्ट्राच्या एका कडेला आहे. कर्नाटक आणि आंध्र प्रदेश हे सोलापूर पासून हाके एवढ्या अंतरावर पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट, आणि गाणगापूर ही भक्ती आणि शक्तीपीठं सोलापूरपासून तासाभराच्या अंतरावर आहेत, आता बंद पडलेल्या कापड गिरण्या यंत्रमाग आणि क्षीण झालेले हातमाग, विडी उद्योग आणि असंच काही फारसं लक्षात न येणारी बरीच वस्ती मजुरांची, कामगारांची, मराठी बोलणारे मोठ्या संख्येने असले, तरी तेलुगु, कन्नड आणि हिंदी बोलणारे ही संख्येने कमी नाहीत. संस्कृत अध्ययन आणि मातृभाषा मराठी यांचा संगम होऊन राम जोशी नावाचा प्रतिभासंपन्न शाहीर कवी सोलापूरने महाराष्ट्राला दिला. आप्त स्वकीयांशी बंड करून राम जोशी यांनी स्वतःचा तमाशा फड उभा केला. एकाहून एक ललित सुंदर आणि रसमधुर लावण्यांनी स्त्री रूपविभ्रमाचा त्यांनी गौरव केला त्यांनी शृंगारिक लावण्या तर लिहिल्याच पण नंतर जे आध्यात्मिक प्रबोधन पर काव्यलेखन केलं त्याला तोड नाही.**



पद्माकर कुलकर्णी

मो. ९९२२४२४५३७

'माय कुणाची व्याली । गगनाखाली । ऐशी कविता सोलापुरी' ।। असं आवाहन हा कवी त्याकाळी करायचा सोलापुरी कवितेचा अभिमान बाळगणारे कविराय राम जोशी हे आमच्या सोलापूरचा मानबिंदू आहे. त्यानंतर स्वातंत्र्य संग्रामात ज्यांनी आपलं सर्वस्व अर्पण केलं लेखणीचा मंत्र सामर्थ्य किती प्रेरक असतं हे त्यांनी जगाला दाखवून दिलं, व्यक्तिगत संसाराकडे पाठ फिरवून समाज आणि देश यांचं वाण हाती घेणे हे त्या काळाचं धगधगतं दिव्य होतं ती एक लखलखती वीज होती. या कवीने असंख्य कविता लिहिल्या त्यापैकीच भेटेन नऊ महिन्यांनी आणि मुळशीचा पाळणा या कविता अख्ख्या महाराष्ट्रात चौकाचौकातून जथ्या-जथ्यानं घुमू लागल्या ही गीतं गाऊन सत्याग्रह होऊ लागले. हे अद्भुत रसायन रक्तात मिसळले आणि मराठी मुलखातील तृणपथ्यालाही तलवारीची धार आली, ती हरिहर गुरुनाथ सलगरकर म्हणजेच कवी कुंजविहारी यांच्या मूळेच त्यांचे नाव तेंव्हा हिंदुस्थानभर अविस्मरणीय झालं. महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवी डॉ. वि. म. कुलकर्णी हे जरी पुण्यात राहत होते, तरी त्यांनी आपल्या उमेदीची दोन तपे सोलापुरात काढली होती. त्यांनी काव्यलेखन केले साधी-सोपी कौटुंबिक तरी सामाजिक झालर असलेली त्यांची कविता शारदेच्या दरबारात समईतील संथ ज्योती सारखी तेवत राहिली. पन्नास वर्षांपेक्षा अधिक काळ पटावर आपल्या कवितांचा आणि गीतांचा मनावर ठसा उमटवणारे कृ. ग. दीक्षित म्हणजेच कवी संजीव यांनी विपुल काव्यलेखन केले. राम जोशी नंतर कवी संजीवांच्या कविताने पायात चाळ बांधून लावणीचं मोहिनी स्वरूप धारण केलं होतं, 'अत्तराचा फाया, तुम्ही मला आणा राया' ही लावणी कवी संजीव यांचीच 'गोरं-गोरं पान जस केवड्याचं रान', अशा लावण्यांनी कवी संजीव यांनी रसिकांची मनं जिंकली 'सोनियाच्या ताटी उजळल्या ज्योती ओवाळीते भाऊराया वेड्या बहिणीची वेडी ही माया', या त्यांच्या भावगीतांनी घराघरात प्रवेश मिळवला त्यांनी बारा चित्रपटांसाठी गाणी लिहिली, त्यांची ही गाणी लता मंगेशकर, आशा भोसले, सुमन कल्याणपूर, सुधीर फडके आदी श्रेष्ठ गायकांनी गायली आहेत.

सावळ्या विठ्ठला तुझ्या दारी आले, क्षणभर उघड नयन देवा' ही गाणी आपण आकाशवाणीवरून नेहमीच ऐकतो. ही गाणी आहेत, सोलापूरच्या कवी रा. ना. पवारांची, रा. ना. हे रेल्वे खात्यात नोकरीला होते. तरीही कलासक्त मन, रसिकता आणि सदैव लेखनाची धुंदी घेऊनच ते जगले त्यांनी सुरुवातीला मेळ्यात गाणी लिहिली, समरगीतं लिहिली, त्यांच्या भावगीतांच्या रेकॉर्डस् निघाल्या केवळ परिस्थितीमुळे त्यांच्या हयातीत त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित होऊ शकला नाही. त्यांच्या मृत्यूनंतर 'सावळ्या विठ्ठला'हा कविता संग्रह प्रसिद्ध झाला. कवी मा.गो. काटकर यांनी आजन्म काव्यलेखन केलं जय-जयवंती, मधूधारा, मनमाधवी आणि भैरवी हे त्यांचे काव्यसंग्रह त्यांनी बालसाहित्याची ८० पेक्षा जास्त पुस्तके लिहिली तर 'आरपार नगरात' या त्यांच्या बालकविता संग्रहाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. 'बखर एका राजाची', 'उच्छाद', 'डांगोरा एका नगरीचा' या कादंबऱ्या गडकऱ्यांची संसारनाटके शारदीय चंद्रकला, अंधार यात्रा, आदी ग्रंथाचे लेखक महाराष्ट्रातले थोर समीक्षक प्रा. त्र्यं. वि. सरदेशमुख हे एके काळी 'वैशाख' या नावाने कविता लिहीत होते. 'उत्तररात्र'आणि 'कविता चंद्र केतूची' हे त्यांचे रसिकमान्य कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. बार्शीच्या अमरशेख या शाहिराने आपल्या बुलंद आवाजात ज्वालाग्राही कविता महाराष्ट्राला सादर केली देशभक्तीचा मंत्र असलेली त्यांची कविता अजून काही जणांच्या ओठावर आहे. करमाळ्यात शीघ्रकवी डांगे नावाचे एक आश्चर्यकारक व्यक्तिमत्व होऊन गेले विषय कुठलाही असो डांगे एका क्षणात कोणत्याही विषयावर कविता रचून म्हणायला सुरुवात करीत असत. प्रा. प्रभाकर बिडवे हे करमाळ्यातील त्यांची 'जीवनलहरी' ही सुंदर कविता त्यांच्या चिंतनशीलतेची साक्ष देते.

डॉ निर्मलकुमार फडकुले हे तर महाराष्ट्रात उत्तम वक्ते, विचारवंत, समीक्षक आणि लेखक म्हणून ख्यातनाम आहेत संत साहित्याचा आधुनिक जीवनाशी सांधा जुळवीत त्यांनी निरनिराळ्या पद्धतीने हा विचार मराठी माणसांसमोर आणला आहे. त्यांची शब्दप्रभु म्हणून ख्याती होती त्यांनी अनेक विषयांवर हजारो व्याख्याने दिली आहेत.



डॉ. फडकुले हे मराठी संत साहित्यातले विद्वान होते. त्यांचा जन्म सोलापूर येथे एका संस्कृत विद्वानाच्या (न्यायतीर्थ, पंडित जिनदासशास्त्री फडकुले यांच्या) घरी झाला. त्याच्या लोकहितवादी काल आणि कर्तृत्व ह्या संशोधन प्रबंधास डॉक्टरेट मिळाली होती. त्यांनी नांदेडमध्ये (इ.स.१९५४ ते५५ या काळात) व नंतर संगमेश्वर कॉलेजमध्ये मराठी विभाग प्रमुख म्हणून काम केले. ललित लेखन आणि संतसाहित्याच्या लेखनाबरोबरच त्यांची आस्वाद समीक्षा साहित्य जगतात कौतुकास पात्र ठरली होती. अमृतकण कोवळे, अश्रूंची कहाणी, आनंदाची डहाळी, कल्लोळ अमृताचे, काही रंग, काही रेषा, चिंतनाच्या वाटा, परिवर्तनाची चळवळ, प्रिय आणि अप्रिय, मन पाखरू पाखरू, संतकवी तुकाराम : एक चिंतन, संत चोखामेळा आणि समकालीन संतांच्या रचना, संत तुकारामांचा जीवन विचार, संत वीणेचा झंकार, संत सहवास, संत साहित्य : सौंदर्य आणि सामर्थ्य, संतांचिया भेटी, साहित्यातील प्रकाशधारा, सुखाचा परिमळ, हिरव्या वाटा, चिपळूणकरांचे तीन निबंध डॉ.निर्मलकुमार फडकुले ह्यांची आंबेडकर, कवी कुंजविहारी, ना. सी. फडके, प्रल्हाद केशव अत्रे, महात्मा फुले, सावरकर ह्यांच्यावरील व्याख्याने प्रसिद्ध आहेत. पंढरपूरचे ग्रामीण कथाकार आणि समीक्षक प्रा डॉ. द. ता.भोसले यांचीही विपुल साहित्य संपदा आहे. सांगोला येथील डॉ कृष्णा इंगोले यांची सहित्य परंपरा मोठी आहे.

ज्यांची बाग फुलून आली, त्यांनी दोन फुले द्यावीत, असे म्हणणारे कविवर्य दत्ता हलसगीकर यांनी गिरणीत काम करत असताना महाराष्ट्राला अनेक कविता दिल्या त्यांची काव्यसंग्रह आणि विविध विषयावर पुस्तक प्रसिद्ध आहेत, तसेच सोलापुरातले तेलुगू भाषिक कवी लक्ष्मीनारायण बोल्ली यांनी मराठी कविता केल्या त्यांची कविता सहजता आणि अर्थघनता घेऊन येते, अनुवादित कथासंग्रह, साहित्य अकादमीने प्रकाशित केलेली 'एका पंडिताचे मृत्यूपत्र', ही कादंबरी हा त्यांचा ठळक लेखन ऐवज आहे. प्रा.चंद्रभूषण कुलश्रेष्ठ यांच्या 'आत्मे घ्या आत्मे' या संग्रहातील कवितांना वास्तवतेचा दाहक स्पर्श आहे. कुर्डूवाडीचे प्रा.राजेंद्र दास हे आज वैचारिक आणि भावनिक पातळीवरून अर्थ सघन अशी कविता लिहितात कवितेचं प्रयोजन समजलेला कवी अशी त्यांची प्रतिमा काव्याच्या क्षेत्रात आहे. ज्ञानपीठ पुरस्काराचे मानकरी मानकरी द.रा. बेंद्रे हे सोलापूरच्या दयानंद महाविद्यालयात प्राध्यापक होते त्यांचे वाङ्मय त्यांच्या प्रगाढ व्यासंगाचे दर्शन घडवते, त्यांच्या लिखाणाला तत्व चिंतनाची डूब होती. त्यांच्या तीन कादंबऱ्यांना कर्नाटक साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. डॉ. य. दि. फडके, डॉ.भा. दि. फडके, प्रा.अ.दि.फडके, डॉ. यु. म.पठाण यांची नाळ सोलापूरशी जोडलेली आहे. डॉ. नरेंद्र कुंटे यांनीही संत वाङ्मयाचा सखोल अभ्यास केलेला आहे. प्रा.निशिकांत ठकार यांनी काही साहित्यकृतीचा अनुवाद केला आहे त्याबद्दल त्यांना साहित्य अकादमीने अनुवादक म्हणून गौरविले आहे. डॉ गो.मा. पवार हे साक्षेपी समीक्षक तर आहेतच पण त्यांनी अखंड परिश्रमानंतर लिहिलेल्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जीवनावरील ग्रंथाने अनेक पुरस्कार मिळवले आहेत शशिकला साळगावकर ह्या कवयित्री म्हणून ख्यातनाम आहेतच पण त्यांनी अनेक कादंबऱ्या लिहून एके काळी मराठी साहित्यसृष्टीत आपली वेगळी मुद्रा उमटवली आहे. डॉ.द्वारकानाथ कोटणीस हे तर सोलापूरचे भूषण आहे. द मा मिरासदार यांचीही साहित्य परंपरा मोठी असून त्यांनी महाराष्ट्रात कथाकथनाचे खूप कार्यक्रम केले आहेत. वि. आ. बुवा हे सोलापूर जिल्ह्यातील असून त्यांनीही विनोदी लेखन मोठ्या प्रमाणात केले आहे. बार्शीचे व्यंगचित्रकार खलील खान यांनी आपल्या विनोदी शैलीतल्या चित्रांनी महाराष्ट्राला खळखळून हसवले, तर शिल्पकार भगवान रामपुरे यांनी आपली सर्व शिल्पे आंतरराष्ट्रीय पातळीवर नेऊन ठेवली आहेत. चित्रकार अलमेलकर हे सोलापूरचेच,

कवी दिवाकर दुनाखे यांनी परमार्थ बोध आणि श्रीरंगलीलामृत या ग्रंथांचे संपादन केले. तरल हळव्या स्वभावाच्या कवी दिवाकर दूनाखे यांचे गझलवंती आणि दि वाणा हे दोन काव्य, गझल संग्रह प्रसिद्ध आहेत. तर वसुधा दुनाखे यांनी अनेक कथा, कविता, बाल साहित्य महाराष्ट्रातल्या अनेक नामांकित मासिकातून, दैनिकातून लेखन केले आहे त्यांचा वसुधा गीत हा एक कविता संग्रह प्रसिद्ध झाला आहे. बार्शीचे प्रा. मिलिंद जोशी हे महाराष्ट्राला वक्ते म्हणून माहीत आहेतच परंतु त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित आहेत. रानावनातला कवी पक्षीतज्ञ मारुती चित्तमपल्ली यांची अनेक पुस्तके प्रकाशित आहेत सोलापूर येथे झालेल्या ७९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. निसर्गतज्ज्ञ बी. एस. कुलकर्णी, डॉ. अच्युत गोडबोले, डॉ. अरुण टिकेकर, प्रा. गजानन भिडे, डॉ. इरेश स्वामी, आनंद कुंभार, भाई पन्नालाल सुराणा. यांच्यासह अलीकडच्या काळात लेखिका विजया जहागीरदार यांचे बालसाहित्य मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध




झाले असून त्या सोलापूर येथे झालेल्या बालकुमार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा होत्या त्यांच्या स्त्री-नक्षत्र,



रातवा, आदी कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. कवी हेमकिरण पत्की हे एक मनस्वी कवी असून त्यांची 'पाऊस फुले' आणि 'एकांत वाटेने' हे कवितासंग्रह चांगलेच गाजले. साहित्यिक, श्रीमती निर्मला ठोकळ यांनी तर सोलापुरात सन २००६ला ७९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरवलं होते. प्रा. डॉ. सुहास पुजारी हे साहित्यात आणखीन काही उगवतीच्या नावापैकी एक नावं सोलापूरच्या मराठी साहित्याच्या क्षेत्रात सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत. सोलापूरचे समकालीन कविवर्य नारायण कुलकर्णी यांनी स्फुट कविता बरोबरच ज्ञानेश्वरीचं सुबोध मराठीत लेखन करून ओवीबद्ध प्रसाद ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहिला आहे. वास्तवाचे दर्शन घडवणारे त्यांचे मिस्कील 'दुभंग' ही त्यांची खासियत आहे. डॉ. शे. दे. पसारकर हे आणखीन एक अध्यात्माच्या विषयाला वाहिलेले लेखक आहेत. त्यांनी ज्ञानेश्वरी व साक्षेपी लेखन केलेले आहे. वीरशैव साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी यापूर्वी भूषवले आहे. सुरेखा शहा त्यांच्या जोहड या कादंबरीमुळे महाराष्ट्रात प्रतिष्ठित लेखिका म्हणून ख्यातनाम झालेले आहेत पण कथा या प्रकारात त्या गेल्या तीस वर्षापासून सर्वांनाच परिचित आहेत. डॉ. भगवानदास तिवारी या प्रकांड पंडिताने आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संशोधन केले. साहित्य महामहोपाध्याय, शिक्षा विशारद आणि तत्वभूषण या पदव्यांनी ते सन्मानित झाले. त्यांनी पन्नास वर्षात हिंदीमध्ये चाळीस, मराठी मध्ये तीन, इंग्रजीत दोन, असे एकूण ४५ ग्रंथ लिहिले आहेत. प्रा.डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनीही स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास हे पुस्तक लिहिले असून सोलापूरच्या मार्शल-लॉ वर त्यांचा दांडगा अभ्यास आहे. त्यांनी आकाशवाणीच्या माध्यमातून वेगवेगळ्या विषयावर व्याख्यानं दिली आहेत. कवी माधव पवार यांचा शुभशकुनाचे पक्षी हा काव्यसंग्रह चांगलाच गाजला त्यांच्या अनेक लावण्या सुरेखा पुणेकर यांनी गायल्या आहेत. कवी गिरीश दुनाखे यांनी आतापर्यंत अनेक दिवाळी अंकातून आणि वर्तमानपत्रातून कथा, कविता आणि बालसाहित्य लेख प्रसिध्द झाले आहेत. सध्या त्यांचे स्फुट लेखन चालू आहे. साने गुरुजी कथामालेच्या माध्यमातून अवधूत म्हमाने यांनी बालसाहित्याची चळवळ उभी केली. त्यांची बाल सहित्यावर त्यांची अनेक पुस्तके प्रसिध्द आहेत. ग्रामीण कथाकार योगिराज वाघमारे, कवी वैभव जोशी, सायली जोशी, कवी मुबारक शेख, अंजुम मोमीन, डॉ अजीज नदाफ, कवी मारुती कटकधोंड, राजेंद्र भोसले, मोडनिंबचे कवी सुरेशकुमार लोंढे, दत्ता गोसावी, पुरुषोत्तम नगरकर, डॉ. नसीमा पठाण, गंगाधर वाघमोडे, भरतकुमार मोरे, राजेंद्र भोसले, मंजिरी सरदेशमुख, डॉ. श्रुती वडगबाळकर, निर्मला मठपती, व्यंकटेश कामतकर, सिंधुताई कुलकर्णी, रेणुका बुधाराम, वंदना कुलकर्णी, डॉ स्मिता पाटील, बार्शीचे मुकुंदराज कुलकर्णी, श्रीकांत मोरे, देवेंद्र औटी, प्रमोद लांडगे, डॉ महादेव देशमुख, डॉ शिवाजीराव देशमुख, बाबुराव मैंदरगीकर, लता अध्यापक, शिवाजी सातपुते, श्याम सावजी, बार्शीचे सुरेश पाठक, प्रकाश गव्हाणे, जेऊरचे नागराज मंजुळे, पंढरपूरचे संभाजी अडगळे, सुनील जवंजाळ, सूर्याजी भोसले, वैशाली अघोर, रामकृष्ण अघोर, सुनेत्रा पंडित, शांताबाई क्षीरसागर, शोभना सागर, चंद्रकांत झुंजे, सुनील शिनखेडे, स्नेहा शिनखेडे, ना. मा.कांबळे, अनंत वेणेगुरकर, नागेश सुरवसे, डॉ.अपर्णा कल्याणी, शशिकांत जोशी, सौ.दुर्गा जोशी, डॉ.शिवकन्या कोंजारी, पिंपळ खुंटेचे कवी नारायण सुमंत, डॉ.ऋचा कांबळे, गोविंद काळे, ल.सि. जाधव, भ. वा. अघोर, शंकरराव पटवर्धन, रजनी थिगळे, रा. श्री.पंचवाघ, नितीन वैद्य, बदिउज्जमा बिराजदार, पंडित गुलामदस्त गीर बिराजदार, सुषमा देशपांडे, प्रभावती कुलकर्णी, योगीराज वाघमारे, सुषमा हिरेकेरुर, शाहीर विश्वासराव फाटे, डॉ. रा. ल. जोशी, डॉ. राजा ढेपे, आपल्या वक्तृत्वाने पुरळ पाडणारे प्रा.लक्ष्मणराव ढोबळे, मंगळवेढ्याचे प्राचार्य सुरेश शिंदे, प्रा. प्रकाश जडे, कवी शिवाजी सातपुते, इंद्रजीत घुले सांगोल्याचे प्राचार्य प्रबुद्धचंद्र झपके, प्रा. धनाजी चव्हाण, आशा पाटील, रामचंद्र धर्मसाले, जोतिराम फडतरे, अक्कलकोटच्या शैलशिल्पा जाधव अशा अनेक कवींची सोलापुरसह जिल्ह्यात काव्यांची चांगली परंपरा आहे, कविराय राम जोशी यांच्यापासून या परंपरेचा मागोवा घेतला असता असे लक्षात येते की सोलापूर नगरीने मराठी सारस्वताला एका पेक्षा एक असे दर्जेदार कवी आणि साहित्यिक दिले आहेत. शहरातून काव्याच्या अनेक मैफिली नेहमीच होत असतात. त्यामुळे काव्य निर्मितीला सोलापूर शहरासह ग्रामीण भागात अजूनही अनुकूल वातावरण आहे. अजूनही जिल्ह्यात खूप कवी आणि साहित्यिक परंतु मला फारशी नावं लक्षात नाहीत, अनेक ताज्या दमाचे नवकवी या सोलापूरची कीर्ती बुलंद करीत आहेत. सोलापुरात पूर्वी साहित्यिक वातावरण मोठ्या प्रमाणात असले तरी साहित्य संस्था एकच होती. कलांतराने ज्यांनी गेली ४२ वर्ष साहित्याची सेवा केली, असे साहित्य सेवक पद्माकर कुलकर्णी यांनी सोलापूर शहरासह जिल्ह्यात महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या १६ शाखा उभ्या केल्या. त्यामुळे सोलापूर शहरासह जिल्ह्यामध्ये नवकवी आणि नवोदित साहित्यिक निर्माण झाले आहेत. त्यामुळे विविध साहित्याच्या कार्यक्रमातून विभागीय आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातून सोलापूरच्या कवी आणि लेखकांनी बाजी मारली आहे.

### संगीत,नाटक आणि सांस्कृतिक वारसा

सोलापूरचे सांस्कृतिक विश्व विशेष उल्लेखनीय असेच आहे. साहित्यकांची परंपरा या शहराला मोठया प्रमाणात लाभली असून काव्य कथा कादंबऱ्या आणि नाट्य कृतींची मनस्वी निर्मिती या भूमीमध्ये अखंड चालू आहे नाटक हा साहित्यप्रकाराचा एक विशेष घटक असून सोलापूरच्या नाटककाराने रंगभूमीसाठी विशेष असे मौलिक योगदान दिले आहे. अनेक नाटककाराने सोलापुरात नाटकांची एक यशस्वी परंपरा निर्माण केली आहे. ती प्रामुख्याने हौशी रंगभूमीसाठी. सोलापूरकरांनी साहित्यावर प्रेम केलं तसंच नाटक आणि सांस्कृतिक जीवनावरही प्रेम केलं आहे सोलापूरच्या मातीमध्ये अनेक नाट्य कलाकार, सिनेकलाकार होऊन गेले, सोलापूरच्या रंगभूमीची विविधता अनेक प्रवृत्ती आणि प्रवाह यामधून पहावयास मिळतो संगीत, कामगार , प्रायोगिक, लोक , विद्रोही, दलित, बाल, एकपात्री आणि पंचवाषिक अशा अनेक प्रवाहांचा संक्षिप्त आढावा त्यावेळी रंगकर्मींनी घेतला आहे. अशा पडद्या मागच्या कलावंतांना ही विसरून चालणार नाही. सोलापुरी नाटककारांचा हा इतिहास सुमारे सहा दशकांचा आहे या साठ वर्षात दोन कालखंड येतात, नाट्य, चित्रपट, सृष्टी आणि राजकारण या क्षेत्रात उगवत्या सूर्याला सलाम केला जातो पण गेली ४५ वर्ष मराठी नाट्यसृष्टीत स्वकर्तृत्वाने लखलखणारी एक तारका म्हणजे कलावती फैय्याज यांचं नाट्यक्षेत्रातील कर्तुत्व फार मोठं आहे. हे सोलापूरकर विसरू शकत नाहीत, सारंगमामा कुलकर्णी, डॉ.जब्बार पटेल, भारताचे माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, अभिनेत्री शशिकला साळगावकर, सरला येवलेकर, अभिनेता अतुल कुलकर्णी, पद्माकर देव, विद्या काळे, प्रकाश यलगुलवार, गुरुराज अवधानी, पांडुरंग काळे, शिरीष देखणे, शरदकुमार एकबोटे, लक्ष्मण काटे, मोहम्मद इसहाक मणियार, राजा सलगर, अभिनेता अतुल जोशी, शशिकांत लावणीस, सुशीला व्हनसाळे, कमलप्रभा हावळे, किशोर महाबोले, अक्षत कोठारी, अश्विनी तडवळकर, अमीर तडवळकर, वनमाला किणीकर, राजा सलगरकर, लक्ष्मीनारायण बोल्ली आणि शोभा बोल्ली, रजनीश जोशी, मीरा शेंडगे, जयप्रकाश कुलकर्णी, अशोक किल्लेदार, कमल ढसाळ, आनंद खरबस, साहिर नदाफ, अनुजा मोडक, गुरू वठारे, लक्ष्मण उपरे, राजू मोडक, सुनील गुरव, सुमित फुलमामडी, अपर्णा जोशी, समीर परांजपे, अमोल धाबळे, रेवण शाबादे, प्रा. अजय दासरी, आशुतोष नाटकर, मोहन आंग्रे, विजय साळुंके, लक्ष्मीनारायण आकेन, अमोल देशमुख, डॉ विलास सलगरकर, नागेश कन्ना, यतीराज वाकळे, पं. ना. कुलकर्णी, विठ्ठल अवशेट्टी, वसंत एकबोटे, संजीवनी काळे, मंदार काळे, अपर्णा रामतीर्थकर, सुहास वर्तक, नंदलाल भैया, चंदुलाल श्रावण, बंडेश पांढरे, रवी मालपुरी, शशिकांत बटाने, उमेश बटाने, डॉ.राजीव मोहोळकर, रामप्रसाद दुबे, राजा राजेशचंद्र, किर्तीपाल गायकवाड, विजयालक्ष्मी कोकणे, अशा अनेक कलावंतांनी विविध नाटकातून चित्रपटातून आपल्या भूमिका पार पाडल्या आहेत तर काहींनी टीव्ही मालिका मधून काम केले आहे. तर दीपक देशपांडे यांनी आपल्या हास्य जत्रेतून महाराष्ट्रात हास्यसम्राट किताब मिळवला. सोलापूरच्या नाट्यलेखनाचा आलेख हा असा चढता आहे केवळ नाट्य लेखनाची परंपराच या प्रतिभावंतांनी जपली आहे. असे नाही तर सोलापूरच्या उज्वल साहित्य परंपरेत मानाचा तुरा खोवला आहे. महाराष्ट्राच्या साहित्य आणि सांस्कृतिक परंपरेत मोलाची भर टाकली आहे, असंच मला म्हणावे लागेल.

संगीत क्षेत्रात प्रभुदेव सरदार, श्रीराम पुजारी, सुलभा पिशवीकर, डॉ अश्विनी वळसंगकर, डॉ.सुलभा ठकार,भालचंद्र पंचवाडकर, गिरीश पंचवाडकर, नानासाहेब चक्रदेव, प्रशांत देशपांडे, अतुल बेले, सुरेखा गणपुले, रागिणी म्हैसकर, श्रीकृष्ण खाडिलकर, डॉ माधवी रायते, डॉ वासुदेव रायते, गोविंद दाते, वाय जे कुलकर्णी, मनीषा जोशी, ममता बोल्ली, ऋषिकेश पागे, डॉ संध्या जोशी, मोहम्मद आयाज, अशा सर्व कलावंतांनी मराठी रंगभूमी हा महाराष्ट्राच्या अभिमानाचा विषय ठरवला या सर्वांचा रंगभूमीवरील संगीताचा, नाटकाचा, संगीत नाटकाचा, शास्त्रीय संगीताचा, नृत्याचा, विनोदाच्या क्षेत्रात सिंहाचा वाटा आहे. मराठी रंगभूमी गाजवली आणि गाजते आहे. ती प्रामुख्याने या संगीत क्षेत्रातल्या सर्व मान्यवरांमुळेच, चित्रकलेच्या आणि पोस्टरच्या माध्यमातून बार्शीच्या खलिल-खान आणि सोलापूरच्या यल्लादासी आणि आलमेलकर यांनीही महाराष्ट्रात आपलं नाव मोठं करून ठेवलं आहे. शिल्पकार भगवान रामपुरे यांचा जन्म सोलापूर येथे एका गरीब कुटुंबात त्यांनी अनेक शिल्प आंतरराष्ट्रीय हॅपीचे शिल्प तयार करून सोलापूरचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्याचे काम रामपुरे यांनी केला आहे त्यांनी अनेक महत्त्वाच्या तसेच अनेक महाराजांचे पुतळे तयार करून दिले आहेत नुकतेच त्यांनी आदि शंकराचार्यांचे १०८ फुटी पुतळा मध्य- प्रदेशातील भोपाळ जवळ असलेल्या ओंकारेश्वर डोंगरावर उभा करून आंतरराष्ट्रीय पातळीवर रामपुरे यांनी सोलापूरचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर नेऊन ठेवले आहे.

सोलापुरातल्या अशा अनेक कलावंतांनी आपआपल्या क्षेत्रात ठसा उमटवला आहे. हे लेखन करत असताना अनेक कलावंतांची नावे राहिले असतील कदाचित ती मला माहीतही नसतील परंतु ज्यांची नावे राहिली आहेत त्या सर्वांना गृहीत धरून हा लेखन प्रपंच केला आहे. आपल्या सर्वांना शुभेच्छा !!





सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!
-: शुभेच्छुक :-
ॲड. मिलिंद थोबडे
मा.अध्यक्ष तथा विद्यमान सदस्य
बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अॅन्ड गोवा
ॲड. रितेश थोबडे
उच्च न्यायालय मुंबई


दैनिक तरुण भारत
वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा
HONDA
Happy 1st Shine versary
धन्यवाद महाराष्ट्र
₹ 1
Shine 100cc
डाऊन पेमेंट भरा
Shine 100cc
घेऊन जा....
कायझन होंडा
हेड : एम्प्लॉयमेंट चौक, सोलापूर. मो. 8380027004 / 03 / 02
ब्रँच : अक्कलकोट रोड, सोलापूर मो. 909611492/ 7020345630


समाजहित, ज्ञान, माहितीसोबत कला क्रीडा, परंपरा, आधुनिकता
जपलेले दैनिक तरुण भारतच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा
।। कर्मयोगी ।।
स्व.सुधाकरपंत परिचारक (मालक)
बहुजन हृदयसम्राट
मा.आ.प्रशांतराव परिचारक (मालक)
बहुजन हृदयसम्राट
आ.गोपीचंद पडळकर साहेब
मार्गदर्शक
मा.सुभाष मस्के सर
भाजपा जिल्हा उपाध्यक्ष
समर्थसाथ
मा.माऊली हळणवर
भाजपा किसान मोर्चा प्रदेश सचिव
शुभेच्छुक :
लोकनेते आ.गोपीचंद पडळकर समर्थक,
हितचिंतक सोलापूर जिल्हा


दैनिक सोलापूर 'तरुण भारत' च्या
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !
Dattatray S. Mule
Govt. Contractor
• DIGVIJAY READYMIX CONCRETE
• DIGVIJAY CONSTRUCTION & HOT MIX
• DIGVIJAY TRADERS
• DIGVIJAY INFRACON
DIGVIJAY RMC
DIGVIJAY R.M.C.
DIGVIJAY RMC
2, Smruti Prakash Towers, Opp. Kinara Hotel, Solapur. datta.mule99@gmail.com M. 9822023939


२० वर्षे यशाची, गौरवाची
आणि ज्ञानदानाची...
उज्ज्वल यशाची परंपरा राखणारी
सोलापुरातील
अग्रगण्य ॲकॅडमी
कामतकर क्लासेस
बदल हा आपल्याच हातात आहे...
आताच भविष्याला आकार देऊया...
इयत्ता २ री ते १० वी सेमी इंग्रजी आणि इंग्रजी माध्यम
इयत्ता ५ वी ते १० वी CBSE
इयत्ता २ री, ३ री, ४ थी, ६ वी आणि ७ वी MTS
इयत्ता ५ वी आणि ८ स्कॉलरशीप
इयत्ता ११ वी आणि १२ वी PCMB
CET / NEET / JEE Preparation
इयत्ता ८ वी, ९ वी आणि १० वी Foundation Course
V.K. अॅकॅडमी स्पर्धा परीक्षा केंद्र : MPSC, PSI, STI, ASO.
Police Bharti, SSCGD, Banking, Railway
डिग्री कॉलेज ऑफ सिव्हील सर्व्हिसेस
करिअर कौन्सिलिंग सेंटर (Neuflex Talent Solution Pune)
जुळे सोलापूर शाखेत विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी AC अभ्यासिका
उत्कृष्ट निकालाची परंपरा
kamatkarclasses kamatkarclasses Web : www.kamatkarclasses.com
राजेश काथवटे 9822448830
शाखा क्र. १
कामतकर क्लासेस
जुना एम्प्लॉयमेंट चौक, कामत हॉटेल मागे, सोलापूर
शाखा क्र. २
कामतकर ॲकॅडमी
वि. मो. मेहता शाळेजवळ, जुळे सोलापूर, सोलापूर
शाखा क्र. ३
कदम सरांची सुयोग ॲकॅडमी व कामतकर ॲकॅडमी
सम्राट चौक, नीलकंठ बँकेच्या मागे, सोलापूर,
9975962000, 9970609155
कामतकर सर, मोबा. 9822448890

# श्रीपूरच्या वैभवाची साक्ष देणारा ब्रिमा सागर डिस्टिलरी उद्योग






**श्रीपूर म्हटले की पुढे उभी राहते ती कै. चंद्रशेखर आगाशे यांची प्रतिमा. याला कारण म्हणाजे त्यांनी सन १९३४ साली स्थापन केलेला दि. बृहन्महाराष्ट्र शुगर सिडिकेट हा साखर उद्योग श्रीपूर येथे आगाशे परिवाराने कारखान्याची मुहर्त मेढ रोवली व माळरान म्हणून प्रसिद्ध असलेला हा परिसर बघता बघता समृद्ध झाला . सर्व परिसर ऊस शेतीने बहरला १९३४ ते १९८९ हा सुमारे ५५ वर्षाचा कालखंड आगाशे परिवारा मुळे आर्थिक, शैक्षणीक व सामाजिक क्षेत्रात अग्रेसर राहीला.**



सन १९५६ मध्ये चंद्रशेखर आगाशे यांचे देहावसान झाले . त्यानंतर कै . चंदशेखर व कै . ज्ञानेश्वर आगाशे यानी या उद्योगाची भरभराट करताना साखर उद्योगा पुढील अडचणी पाहता उपपधार्त निर्माती म्हणून डिस्टलरीची उभारणी केली .

कालपरत्वे बदलत्या शासन धोरणाचा अनिष्ट परिणामा मुळे सन १९८९ साली साखर उद्योग अवसायानात आल्याने पढरपुरचे आ . सुधाकरपंत परिचारक यांना कै. ज्ञानेश्वरजी आगाशे यांना विकला तोच आज कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना म्हणून नावारूपाला आला.

ज्ञानेश्वरजी आगाशे याचे पश्चात डिस्टलरी उद्योग आशुतोष आगाशे यांनी उदयजी कोठारी यांना विकला. तोच उद्योग आज ब्रिमा सागर डिस्टलरी या नावाने चालवला जात आहे . आज कार्यकरी संचालक म्हणून भरतकुमार सेठीया व व्यवस्थापक दिनकर बेंबळकर हे या उद्योगाची धुरा सांभाळत आहेत . या उद्योगानेही डिस्टलरी क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवला आहे . मळी पासून बनवलेले तसेच द्राक्ष व सातू (माल्ट ) पासून बनवलेल्या आल्कोहोलला बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर मागणी आहे . तसेच त्यांचे वसुधा नामक सेंद्रीय खतांचा पिकांचे वाढीवर विशेष करून ऊस या पिकाच्या वाढीवर उत्तम परिणाम दिसून येत आहे . या बरोबरच कंपनीचे मालक दिपकजी कोठारी व संचालक उदयजी कोठारी यांचे दूरदृष्टीतून द्राक्ष व सातू पासून तयार होणारे माल्ट प्लॅन्ट चे विस्तारणी करण होणार आहे . या उद्योगाचे माध्यमातून काळाची गरज तसेच पर्यावरण रक्षणाचे महत्व ओळखून मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड केली जाते . परिसरातील विविध सामाजीक संघटनांच्या समाज उपयोगी कार्यास मदत केली जाते . तर कंपनीचे माजी संचालक यश कोठारी यांच्या स्मृती निमित्त रक्तदान शिबीर व कामगारां मध्ये खिलाडू वृत्ती व आरोग्य संप्पनेसाठी व्हॉलीबॉल स्पर्धा , नियमित आरोग्य तपासणी तर सुरक्षा सप्ताहा मध्ये कामगारां मधील सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून विविध स्पर्धा , सुरक्षेचे महत्व समजणे साठी प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते . एकूणच कार्यकारी संचालक भरतकुमार सेठीया व व्यवस्थापक दिनकर बेंबळकर याच्या सुयोग्य नियोजनातून उद्योगाची भरभराट होत असताना श्रीपुरच्या अर्थकारणास गती मिळून रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत .








# बॅडमिंटनपटू मृण्मयी देशपांडेचा आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णचा ध्यास

**सोलापूरची धावपटू वंदना शानबाग व बार्शीची टेनिसपटू प्रार्थना ठोंबरे यांनी ऑलिंपिक स्पर्धेत प्रतिनिधित्व करून सोलापूरचे नाव जागतिक पातळीवर पोचविले आहे. त्यानंतर सोलापूरची आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनपटू मृण्मयी अतुल देशपांडे हिने फेब्रुवारी २०२४ मध्ये झालेल्या पहिल्याच आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत पदक मिळवून तिने सोलापूरला पहिली आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडूचा मान मिळवून दिला आहे. गुडघ्याची शस्त्रक्रिया होऊन सुद्धा तिने केलेली कामगिरी कौतुकास्पद आहे. बॅडमिंटनमध्येच जिद्दीने करिअर करण्याचे मृण्मयी ठरविले आहे. तिचे आता पुढील लक्ष आहे आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्ण पदक मिळविण्याचे. मृण्मयीची सुरुवातीपासून आतापर्यंतची कामगिरीची केलेली बातचीत...**

अजितकुमार संगवे

मो. ९८८११३३१०३

लहान असताना सोसायटीमध्ये बॅडमिंटन खेळायची. थोडक्यात गल्लीमधलं बॅडमिंटन. अर्धवट नियम माहीत होते. त्यामुळे आपल्या साईडला शटल पडू द्यायचं नाही हे इतकच डोक्यात असायचं. मग आई-बाबांच्या लक्षात आलं की हिला खेळात आवड आहे. मग त्यांनी विचारलं टेनिस की बॅडमिंटन? आणि मी बॅडमिंटन असं म्हणाले. तिथून माझ्या खेळाची सुरुवात झाली, असे सांगून मृण्मयी म्हणाली, ''बाबानी मला गफुर शेख आणि गुलाणी सरांकडे घेऊन गेले. तिथे काही दिवस खेळल्यानंतर मला अजून चांगल्या प्रशिक्षणाची गरज निर्माण झाली. त्यामुळे मी सुनील देवांग यांच्याकडे माझं पुढचे ट्रेनिंग सुरू केले. तिथे गेल्यावर मला बेसिक बॅचमध्ये घातलं. तेव्हा बेसिक बॅच सीमा जोग घेत होत्या. एक महिना तिथे खेळल्यानंतर देवांग सरांनी मला मोठ्या मुलांच्या म्हणजेच ॲडव्हान्स बॅचमध्ये शिफ्ट केले. मी जिल्हा स्पर्धेमध्ये भाग घेतला आणि अंडर १० आणि १३ अशा दोन वयोगटात प्रथम आणि द्वितीय स्थान मिळवले. हळूहळू माझ्या खेळात सुधारणा व्हायला लागली. माझ्यापेक्षा मोठ्या आणि सुरुवातीपासून ॲडव्हान्स बॅचमध्ये खेळत असणाऱ्या मुला-मुलींना मी हरवले. हे बघून देवांग सरांना माझ्यात काहीतरी वेगळे दिसलं. बॅडमिंटन सुरू करताना मी पाचवीमध्ये होते.

ह. दे. प्रशालेत शिकत होते. आठवीपासून मी राज्य व राष्ट्रीय पातळीवर खेळण्यास सुरुवात केली. तेव्हा माझं ठरलं की मला बॅडमिंटनमध्येच करिअर करायच आहे आणि मला ऑलम्पिकमध्ये प्रतिनिधित्व करण्याचे स्वप्न पूर्ण करायचे आहे. माझ्या या निर्णयाला माझ्या आई-बाबांचा पूर्णपणे पाठिंबा मला मिळाला. ते दोघेही राष्ट्रीय पातळीवरचे खेळाडू. आईला व्हॉलिबॉलमध्ये छत्रपती क्रीडा पुरस्कार मिळाला आणि बाबा रणजीपटू आहेत. त्यामुळे त्यांना अंदाज होता की खेळात करिअर करणं खूप अनिश्चित आहे तरीसुद्धा त्यांनी मला अजिबात असं म्हटलं नाही की अभ्यासावर लक्ष दे. त्यांनी मला पूर्ण सूट दिली. त्यामुळेच मी आज जे काय करते ते शक्य झालं. संगमेश्वर महाविद्यालयामध्ये शिकत होते. दोन वर्षानंतर मला देवांग सरांनी पाच इव्हेंटमध्ये भाग घ्यायला सांगितले आणि त्या जिल्हा स्पर्धेत मी पाचही प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला. माझ्यापेक्षा तीन ते पाच वर्ष वयाने मोठ्या असलेल्या मुलींना मी सहज हरवलं. सुरुवातीची काही वर्ष माझी राज्य व राष्ट्रीय पातळीवरची कामगिरी म्हणावी तशी होत नव्हती, आत्मविश्वासाचा अभाव होता. पण माझ्या आई-बाबांचा माझ्यावर तेवढाच विश्वास आहे की जेवढा माझा स्वतःवर सुद्धा नाही. हाच विश्वास मला या करिअरमध्ये पुढे घेऊन गेला.''

**तंत्रशुद्ध प्रशिक्षणासाठी ठाण्यास जाण्याचा गुरूंचा सल्ला**

२०१६ला सोलापूर मी कशामुळे सोडलं हे सांगताना मृण्मयी म्हणते, ''देवांग सरांचं म्हणणं होतं की अजून चांगलं आणि पुढचं शिकण्यासाठी तुला ठाण्याला जावे लागेल, माझ्याकडचं सगळं शिकवून झालंय. मी तुला एवढंच शिकवू शकतो आणि त्यावेळेस सोलापूरच्या बॅडमिंटन कोर्टची कंडिशनसुद्धा खूप वाईट होती. त्यामुळे मी ठाण्याला गेले असे तिथे मी पाच वर्ष होते. प्रॅक्टिस खूप चांगले होत होती. २०१८मध्ये दुहेरी चार आणि एकेरीत एक विजेतीपदे अशी कामगिरी, मी खुश होते. सगळं छान सुरू होतं. मी माझ्या आयुष्यातली पहिली राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा खेळणार होते. यासाठी मला सहा वर्ष मेहनत घ्यावी लागली आणि त्याआधी एक राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा खेळताना माझ्या गुडघ्याला दुखापत झाली. एक महिन्यानंतर मी पुन्हा खेळायला सुरू केलं आणि पश्चिम विभागीय संघातून खेळताना एकेरी व दुहेरीमध्ये जिंकले आणि त्यानंतर परत बरोबर एक महिन्यानंतर प्रॅक्टिस करताना परत माझ्या गुडघ्याला दुखापत झाली. परत नव्या दमाने खेळायला सुरू करीत राष्ट्रीय स्पर्धेसाठी खेळायला गेले आणि परत गुडघ्याला दुखापत झाली. एम.आर.आय. काढल्यानंतर कळाले की गुडघ्याला फार मोठी दुखापत झाली. असं वाटलं माझं बॅडमिंटनमधले करिअर संपलं. एक वर्ष खेळायला न मिळणे हे मी कधीच कल्पना करू शकत नाही आणि केलं नव्हतं. असं वाटलं वाड सरांचं ऐकून तेव्हाच एम.आर.आय. काढला असता तर किती बरं झालं असतं. इतकं मोठ्ठं झालं नसतं, असं वाटत होतं की सगळे पुढे जातायत आणि मी थांबली आहे एकाच जागेवर.''

**फिजिओ डॉ. संदीप भागवत, सर्जन डॉ. अनंत जोशी यांचेमुळे माझे पुनरागमन**

४ जानेवारी २०१९ला माझी गुडघ्यावर शस्त्रक्रिया झाली, असे सांगताना मृण्मयी म्हणते,''खूप त्रासदायक होते पण त्या वेळेत माझ्याबरोबर माझं संपूर्ण कुटुंब होतं. त्यांनी माझी खूप काळजी घेतली. सुरुवातीचे दहा-पंधरा दिवस तर मला बेडरेस्ट होती आणि मी कोणाच्यातरी पाठिंब्याशिवाय उठू शकत नव्हते. त्यानंतर २० दिवसानंतर बाबा मला रोज गुडघ्याचे पुनर्वसन करण्यासाठी न चुकता घेऊन जात होते. माझे फिजिओ डॉक्टर संदीप भागवत आणि सर्जन डॉक्टर अनंत जोशी यांच्यामुळे मी परत खेळणं सुरु केलं ते माझ्या कुटुंबाच्या पाठिंब्यामुळे. पाया सूप, चिकन, राईस, ड्रायफ्रूट असा माझा आहार असायचा. आमच्या घरी सगळे व्हेज खातात. त्यामुळे चिकन कोणाला बनवता येत नाही. त्यामुळे बाबांचे एक दोन मित्र मला आठवड्यातनं एकदा-दोनदा चिकन बनवून द्यायचे आणि अजूनही आणून देतात. कारण मला चिकन आवडतं हे त्यांना माहित होतं आणि मला ते खूप छान वाटायचं. माझं वजन वाढू नये यासाठी मी जितकं जास्त स्वतःला मेंटेन करता येईल तितकं केलं आणि वजन वाढू दिलं नाही, माझं वजन स्टेबल होतं. मार्च २०१९पासून मी स्टँडिंग प्रॅक्टिस सुरू केली आणि जूनपासून मी थोडं थोडं खेळायला सुरुवात केली. मी रोज खूप उत्साहित असायचे. इतके दिवस न खेळता राहणं माझ्यासाठी सोपं नव्हतं. त्यानंतर नोव्हेंबरमध्ये माझ्या गुडघ्यावरील शस्त्रक्रियानंतरची पहिली स्पर्धा मी खेळले. त्या ऑल इंडियामध्ये मी टॉप १६मध्ये आले. शस्त्रक्रियेनंतर माझा आत्मविश्वास कमी झाला होता. पण मी त्याचा विचार न करता खेळत राहिले. पहिला सामना खेळताना मला खूप दडपण आलं होतं आणि भीती पण वाटत होती की परत काही झालं तर आणि ज्युनिअरशी हरले तर. पण असं काही होणार नाही, असं मी स्वतःला समजावलं आणि खेळत गेले. त्यानंतर एक दोन महिने सगळं नीट सुरू होतं आणि अचानक लॉकडाऊन लागलं. आधी वाटलं की एक दोन महिन्यात सगळं होईल नीट, पण नाही. दोन काय नऊ महिन्यांनी आम्ही सगळ्यांनी खेळायला सुरुवात केली. त्या काळात मी ऑनलाईन फिटनेस सेशन्स करायचे. सकाळी दीड तास, संध्याकाळी दीड तास आणि मधल्या वेळात वॉल प्रॅक्टिस. कारण सगळं बंद करून चालणार नव्हतं. आता घरी सगळे साहित्य उपलब्ध नव्हते. मग तांदळाचं पोत आणि भरपूर पुस्तकं एका बॅगमध्ये भरून स्कॅट्स, लुंजेस आणि असे बरेच व्यायाम करणं सुरू केलं आणि नोव्हेंबर पासून मार्चपर्यंत परत खेळले आणि पुन्हा लॉकडाऊन लागलं. त्यामुळे २०२० आणि २०२१अशी माझी महत्त्वाची दोन वर्ष वाया गेली. २०१९ मध्ये गुडघ्यावरील शस्त्रक्रियेमुळे गेलं ते वेगळंच.''

**पुण्यात खानविलकर यांच्याकडे २०२१ पासून प्रशिक्षण**

२०२१ ऑक्टोबरमध्ये मी पुण्याला वरूण खानविलकर यांच्याकडे शिफ्ट झाले. सराव करताना शिक्षणाकडे दुर्लक्ष केले नाही, असे सांगून मृण्मयी म्हणाली, ''पुण्याच्या सिद्धिविनायक महिला महाविद्यालयात एम. ए. इंग्लिश ही पदव्युत्तर पदवी घेतली. आता पुण्यातच सराव करते. तिथे प्रॅक्टीस खुप चांगली होत आहे. मधलं एक वर्ष माझी खूप चांगली कामगिरी नव्हती. २०२३ सप्टेंबरमध्ये मला टायफॉईड झाला आणि माझी इम्युनिटी कमी झाली आणि दहा दिवसांवर माझी नागपूरला राज्य स्पर्धा होती. मी जास्त आशा ठेवली नव्हती. कारण मला माहित होतं की मला श्वास घ्यायला त्रास होतोय आणि बऱ्याचशा गोष्टी होत होत्या. आणि त्या स्पर्धेत मला दुहेरीमध्ये द्वितीय क्रमांक मिळाला. त्यामुळे माझी आणि माझी पार्टनर प्रेरणा आळवेकर हिची नॅशनल गेमसाठी निवड झाली. तिथे महाराष्ट्राला द्वितीय क्रमांक मिळाला.




त्यानंतर लगेच बेंगलोरला आमची आंतरराष्ट्रीय स्पर्धा होती. तिथे आम्ही पहिल्यांदा क्वार्टर फायनल खेळलो, हरलो. परंतु या स्पर्धेतील आमची एकूणच कामगिरी चांगली होती. राज्याच्या कामगिरीवर आम्हाला राष्ट्रीय स्पर्धेसाठी संधी मिळाली. पहिली सीनियर चॅम्पियनशिप असल्यामुळे मी खूप खुश होते आणि महाराष्ट्राच्या महिला संघात सुद्धा माझी निवड झाली होती. मी त्या संघाची भरवशाची खेळाडू होते, याचा मला खूप आनंद आहे. कारण २८ वर्षानंतर महाराष्ट्राला विजेतेपद मिळाले. त्यानंतर लगेच वैयक्तिक स्पर्धा सुरू झाल्या. त्यात आम्ही म्हणजे मी आणि प्रेरणानी दोन चांगल्या पॅरिसला हरवून सेमी फायनल मध्ये प्रवेश केला. मला हे ब्रांझ पदक मिळवायला अकरा वर्ष वाट बघावी लागली आणि खूप मेहनत करावी लागली. परंतु त्याचं फळ आम्हाला मिळालं. श्रीलंकेला आंतरराष्ट्रीय स्पर्धा खेळण्यास गेलो. पहिल्याच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत ब्रांझ पदक. माझ्या या प्रवासामध्ये माझे सध्याचे कोच वरुण खानविलकर आणि माझे या आधीचे कोचेस वाड सर, मयूर सर आणि सुनील देवांग सर आणि माझं संपूर्ण कुटुंब यांचा मला खूप पाठिंबा मिळाला. मी यापुढे अजून जास्त मेहनत करून सोलापूरचे आणि आपल्या देशाचे नाव मोठं करीन. तसेच माझं ऑलम्पिकमध्ये प्रतिनिधित्व करण्याचे स्वप्नही पूर्ण करीन.''

**मृण्मयीचे सध्याचे मानांकन**
**राष्ट्रीय एकेरी -५७ , दुहेरी - ११.**
**जागतिक : दुहेरी १७४, एकेरी -५४१**

---

**माढा शहर व तालुक्याचे ग्रामदैवत म्हणजे अर्थातच श्री माढेश्वरी देवी. सतराव्या शतकात मंदिराची उभारणी झाली असुन माढा शहरातील मनकर्णा नदीच्या काठावर असलेल्या ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या माढेश्वरी देवीला मानणारा बारा बलुदेतार वर्षभर येथे दर्शनासाठी अलोट गर्दी करतो. माढेधीपती श्रीमंत रावरंभाजी निंबाळकर यांनी १७२७च्या कालखंडात उभारलेल्या या मंदिरास आज २९७ वर्ष पुर्ण झाली आहेत. मनकर्णा नदीच्या काठावर असलेल्या ऐतिहासिक श्री माढेश्वरी देवीचा यात्रोत्सव कोजागिरी पौर्णिमेला असतो.**

## ग्रामदैवत माढेश्वरी देवी विशेष

# सतराव्या शतकातील ऐतिहासिक वारसा लाभलेली श्री माढेश्वरी देवी

शेखर म्हेत्रे

मो. ८६६९०८९४०७

सतराव्या शतकातील दक्षिण भारतीय वास्तू स्थापत्य असा ही या मंदिराचा इतिहास तज्ञ उल्लेख करत आहेत. रावरंभाराजे निंबाळकर हे पुणे जहागिरी जप्त झाल्यानंतर करमाळ्याकडे आले व तेथे स्थायीक झाल्यानंतर त्यांनी माढ्यातील देवीचे मंदिर १७२७ मध्ये उभारले. अगोदर या मंदिराची किल्लेवजा/गढीची बांधणी करुन घेतली व तद्नंतर अतिशय लहान असलेल्या या मंदिराचा जिर्णोध्धार करुन भव्य असे रुप दिले. या हेमाडपंथी मंदिराची रचना सुबक आकर्षक अशीच आहे. संपुर्ण मंदिर हे सुबक व रेखीव दगडात बांधले आहे. प्रवेशद्वाराच्या समोरच रावरंभाराजे निंबाळकर यांची समाधी देखील आहे.

मंदिरात प्रवेश करताच भव्य अशी कमान असुन कमानीवरचा कळस मंदिराची भव्यता दर्शवतो. मंदिरात पाऊल ठेवताच डाव्या हाताला दोन आणि उजव्या हाताला एक अशी दिपमाळ आहे.गाभाऱ्याच्या समोरच सभामंडप व होमकुंड ही आहे.

मंदिराच्या उजव्या व समोरच्या बाजूला ओवऱ्या बांधण्यात आल्या आहेत. या ठिकाणी दर्शनासाठी आलेल्या भाविकांना भोजन व विश्रांतीसाठी व्यवस्था करण्यात आली आहे. जागृत व नवसाला पावणारी देवी अशी देवीची ख्याती असल्याने माढा शहर व परिसरातील कोणत्याही विवाह कार्यक्रमाची पहिली भोगी देवीला केल्या खेरीज लग्नाच्या तयारीला सुरुवात केली जात नाही. माढेश्वरी देवीचा वर्षभरात फक्त एकच उत्सव असतो. तो म्हणजे कोजागिरी पोर्णिमा यात्रोत्सव. माढेश्वरी हे पार्वतीचे रुप मानलं जात असल्याने तिचं वाहन असलेल्या हत्तीला यात्राकाळात मोठा मान असतो. नवरात्रीच्या उपवासानंतर दसऱ्याला देवीची संबळच्या निनादात पालखी निघते. तद्नंतर देवी निद्रेस जाते आणि कोजागिरी पौर्णिमेपासुन देवीचा यात्रोत्सव सुरु होतो. नोकरीनिमित्त बाहेर गावी स्थलांतरित झालेली कुटूंब यात्रेनिमित्त आवर्जुन





**मंदिराचे विश्वस्त म्हणुन सुभद्रा पुजारी व डॉ. उदय पुजारी हे आहेत. तर मंदिराच्या गाभाऱ्यात सावित्रीबाई पुजारी या आहेत. देवीची सकाळची व संध्याकाळ ची पुजा ही गोविंद पुजारी यांच्या हस्ते होते.**

माढ्याला येतात. याच दिवशी रात्री बारा वाजता देवीचा छबिनोत्सव निघतो. परंपरागत बुलतेदारांना वाटुन दिलेली आठ देवीची वाहने या छबिना उत्सवा मध्ये पुढे मानकरी नाचवतात.

माळी समाजाला हत्ती, भांगे घराण्याला घोडा, मारकड यांना नंदी, जाधव याना गरुड, रणदिवे घराण्याला वाघ, काटे घराण्याला मोर, माने घराण्याला सिंह, खोत यांना काळवीट, चवरे यांचा कलगीतुरा या वाहनांचा माढेश्वरी देवीच्या उत्सव यात्रेत मानाचे स्थान असुन या वाहनाचे वाजत गाजत मिरवणुक काढली जाते. हा छबिना मातंगाई देवीची भेट घेऊन पहाटे पाच वाजता मंदिरात येऊन विसावतो. तीन दिवसीय यात्रोत्सवाकरिता माढ्यात हजारो भाविकांची मंदियाळी असते. यात्रा कमिटी कडून मंदिराच्या कळस, शिखर तटबंदीवर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येते. त्यामुळे मंदिर लखलखुन जाऊन मंदिराच्या सौंदर्यात भर पडते. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी कलगी तुऱ्याचा मनोरंजनातुन प्रबोधनाचा कार्यक्रम असतो व यात्रेच्या शेवटी कुस्त्यांच जंगी मैदान व मनोरंजन कार्यक्रमाने यात्रोत्सवाची सांगता होते.

**श्री माढेश्वरी देवीच्या मुर्तीची रचना**

गाभाऱ्यात सिंहासनावर श्री माढेश्वरी मातेची वालुकाश्मापासुन बनविलेली मुख्य मुर्ती आहे. त्याच्या शेजारी उत्सव मुर्ती आहे. माढेश्वरी ही चतुर्भुज असुन एका हातात ढाल, दुसऱ्या हातात शंख चक्र, तिसऱ्या हातात महशासुरांची शेंडी तर चौथ्या हातात त्रिशुल आहे. हा त्रिशुल महशासुराच्या पोटात मारत असल्याचे मुर्तीचे मुळ रुप असून तिला नेसलेल्या साडी मुळे ते दिसुन येत नाही.

देवीच्या मुर्तीची उंची ही तीन फुट असुन मुकूटाजवळ चंद्र सुर्य असुन कपाळावर लाल रंगाचा चकचकीत मणी आहे. मुर्तीच्या मागच्या बाजुला मोर, नाग, दैत्य कोरीव प्रभावळ आहे. मुख्य मंदिराच्या उजव्या बाजूस श्री गणेशाचे व महादेवाचे तर डाव्या बाजूस श्री विष्णूचे मंदिर आहे.

**यात्रेची परंपरा...**

माढ्याचे राजे रावरंभा निंबाळकर यांच्या काळा पासुन सुरु असलेल्या साधारण ३०० वर्षांपासून कोजागिरी पौर्णिमेला देवीच्या यात्रेची मोठी परंपरा आहे. ही यात्रा मोठ्या प्रमाणात व उत्साहात साजरी व्हावी यादृष्टीने माढ्यासह शेजारील दोन तीन गावांना समावून घेत मानाची वाहने दिली आहेत. यात्रेदिवशी सर्व मानाच्या वाहनांची सजावट करून मोठ्या उत्साहात छबिना काढण्यात येतो.

माढ्यातील माळी समाज्यातील श्री तुळजाभवानी देवीचा एक निस्सीम भक्त होते. देवीने त्या भक्ताला प्रसन्न होऊन आशीर्वाद देऊन माढ्यात प्रगट झाल्याची आख्यायिका आहे त्याच बरोबर या संदर्भात अनेक आख्यायिका आहेत. त्यामुळे माढेश्वरी देवीच्या यात्रेत माळी समाजाच्या हत्ती या वाहनाला यात्रेत पहिला मान आहे. हत्ती या वाहनावर माढेश्वरी देवीच्या मूर्तीची मिरवणूक निघते.

माढेश्वरी देवीच्या नवरात्र उत्सवाला घटस्थापने पासून सुरुवात होते. या कालावधीत देवीच्या दर्शनासाठी हजारोंच्या संख्येने भाविक मोठी गर्दी करतात.

सोलापूर नगरी दिवसेंदिवस धार्मिक नगरी होत आहे.अनेक जाती-धर्मांचे लोक या ठिकाणी गुण्यागोविंदाने आपापल्या धर्माचे मनोभावे पालन करीत आहेत. त्याला जैन धर्मीय बांधव सुद्धा अपवाद नाहीत. सोलापूर शहरात आणि आसपासही अनेक जुनी जैन मंदिरे आहेत. येथील दिगंबर व श्वेतांबर समाज एकत्र येऊन आपापल्या अभिषेक पूजेच्या पद्धतीप्रमाणे जैन धर्मातील सण, उत्सव, पर्व साजरे करतात.

# ओळख सोलापुरातील जैन मंदिरांची





अरुणकुमार धुमाळ

मो. ९८९०९०२९२३

श्री आदिनाथ महाराज दिगंबर जैन मंदिर थोरले मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे. त्याच्या शेजारीच रत्नत्रय दिगंबर जैन मंदिर आहे. ही दोन्हीही मंदिरे सोलापुरातील शुक्रवार पेठेतील अतिशय सुंदर बांधकाम असलेली जुनी मंदिरे आहेत. शुक्रवार पेठपासून थोड्याशाच अंतरावर, झुंजे बोळात श्री चिंतामणी पार्श्वनाथ दिगंबर जैन कासार मंदिर आहे. या मंदिरातील पार्श्वनाथांची नयनरम्य अशी मूर्ती दर्शनार्थींचे लक्ष वेधून घेते.

भुसार पेठेत आणखी एक अतिशय पुरातन असे दिगंबर जैन मंदिर आहे, माणिक स्वामी दिगंबर जैन मंदिर. नुकताच या मंदिराचा जीर्णोद्धार झाला असून या जैन मंदिरातील प्रसन्नता, शांतता, येणाऱ्या श्रावक-श्राविकांच्या मनात भक्तीचा जागर निर्माण करते.

या मंदिरात तीन मूर्ती आहेत. मध्यभागी पार्श्वनाथांची, डाव्या बाजूला अनंतनाथांची तर उजवीकडे शांतिनाथ तीर्थंकरांची मूर्ती आहे. या मंदिरात जी छोटी मूर्ती आहे ती, माणिक स्वामींची म्हणजेच भगवान आदिनाथांची मूर्ती आहे. इथे भव्य असा मंडप असून या मंडपामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम नेहमीच आयोजित केले जातात.

चाटी गल्लीत श्री दिगंबर जैन बुबणे मंदिर आहे. हेही मंदिर खूप जुने असून या ठिकाणी भगवान आदिनाथांची अतिशय मनोज्ञ अशी मूर्ती आहे. वरच्या मजल्यावरही प्रसन्न अशी मूर्ती आहे. या मंदिरात नेहमीच विधानादी कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. बहुतेक मंदिरे दगडी बांधकाम केलेली आहेत.

विजापूर रोडवर या परिसरातील जैन बांधवांची सोय व्हावी म्हणून, येथे भगवान बाहुबली मंदिराची निर्मिती करण्यात आली आहे. याचे वैशिष्ट्य असे की, हे मंदिर फक्त १०८ दिवसात तयार झाले असून २००१ साली प.पू.१०८ आचार्य देवनंदीजी महाराजांच्या उपस्थितीत या मंदिराचा पंचकल्याणक महोत्सव संपन्न झाला होता. या मंदिरात खालील बाजूस विसावे तीर्थंकर मुनिसुव्रतनाथ भगवंताची मूर्ती असून मंदिराच्या वरच्या भागात भगवान बाहुबली स्वामींची भव्य अशी मूर्ती आहे. या मूर्तीचा प्रतिवर्षी ११ नोव्हेंबरच्या आसपास महामस्तकाभिषेक आयोजित केला जातो. अमावस्येच्या दिवशी मुनिसुव्रत भगवंताच्या अभिषेकाचा लाभ घेण्यासाठी पंचक्रोशीतील जैन-अजैन बांधव येथे एकत्र येतात.

सोलापूर जवळच असलेल्या कुमठे गावात असेच एक पुरातन मंदिर आहे. हे दिगंबर जैन मंदिर ग्रामीण भागातअसून सुद्धा येथे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. या गावात कासार समाजाची अधिक घरे असली तरी जैन-अजैन बांधव एकत्र येऊन सण, उत्सव साजरे करतात. सध्या या मंदिराचे जीर्णोद्धाराचे काम सुरु आहे.

अशा मोठ्या व जुन्या भव्य अशा मंदिरांबरोबरच श्राविकाश्रम, नाथा रंगजी जैन बोर्डिंग, वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय तसेच वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नित्यनेमाने दर्शनाचा, पूजेचा, अभिषेकाचा लाभ मिळावा म्हणून छोटी देवालयेही आहेत. विद्यार्थ्यांवर या ठिकाणी धार्मिक संस्कार केले जातात.

दिगंबर पंथीय समाजाप्रमाणेच श्वेतांबर पंथीय समाजाचीही मंदिरे सोलापुरात आहेत. ही मंदिरे सुद्धा खूप जुनी आणि अतिशय मनोज्ञ मूर्तींनी युक्त आहेत. त्यापैकी ज्या काही मंदिरांचा आवर्जून उल्लेख केला जातो, ती मंदिरे जोडभावी पेठ, जुनी मिल परिसर, सम्राट चौक आदी ठिकाणी स्थित आहेत.

श्वेतांबर जैन स्थानकवासी श्रावकांसाठी तुळजापूर वेस येथे भव्य असे स्थानक सेवेसाठी उपलब्ध आहे. बाहेर गावाहून येणाऱ्या जैन समाज बांधवांची निवासाची सोय व्हावी म्हणून, शुक्रवार पेठेतील महावीर सांस्कृतिक भवन, शिंगवी भवन,जैन श्वेतांबर स्थानक, जैन धर्मशाळा, आदी सर्व सोयींनी युक्त अशी निवासस्थानेही सेवेसाठी उपलब्ध आहेत. जैन भोजनालयेही आहेत. जैन समाजातील श्रावकांवर मूल्यवर्धन शिक्षणाचे संस्कार व्हावेत म्हणून, वीतराग विज्ञान सर्वोदय प्रतिष्ठान ही संस्था कार्यरत आहे.जैन मंदिरात गुरुकुल पद्धतीचे शिक्षण देण्यासाठी पाठशाळा चालविल्या जातात.

अशा प्रकारे जैन समाजातील श्रावक-श्राविकांवर उत्तम संस्कार होण्यासाठी वर्षभर कार्यक्रमांची रेलचेल असते. माझ्या अल्प बुद्धीच्या आधारे जैन मंदिरांचा थोडक्यात परिचय करुन देण्याचा मी प्रयत्न केला आहे.यात काही उणीवा, त्रुटी राहिल्या असतील तर वाचकांनी उदार अं:तकरणाने मला क्षमा करावी, ही विनंती. धन्यवाद !!

---

**सोलापुरातील भुईकोट किल्ला राज्यात प्रसिद्ध आहे. या किल्ल्यात श्री सिद्धरामेश्वर महाराजांनी श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन मंदिराची निर्मिती केली. श्री सिध्दरामेश्वर महाराज हे एक महाशिवयोगी योगीकुलचक्रवती होते. त्यांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर सोलापूर हे 'अभिनव श्रीशैल म्हणून प्रसिद्धीस आणले. श्रीशैल यात्रा करून सोलापूरात आल्यावर त्यांनी आपल्या परमदेवतेचे म्हणजे श्री मल्लिकार्जुनाच्या सुंदर मंदिराची निर्मिती केली. या मंदिराचे संपूर्ण वर्णन सिद्धरामेश्वराचे समकालीन कवी राघवांक यांनी आपल्या पुराणकाव्यामधून केले आहे. या मंदिरामध्ये स्वत: सिध्दरामेश्वरांनी स्वहस्ते शिवलिंगाची प्रतिष्ठापना केली. या मंदिराचे नाव श्री कपिलसिध्द मल्लिकार्जुन मंदीर असे ठेवले.**

# श्री कपिलसिध्द मल्लिकार्जुन मंदिर





नितीन अणवेकर

मो. ९४२३३२६५३८

या मंदिराची बैठक नक्षत्राकृती असून मंदिरात प्रवेश करण्यासाठी ११ पायऱ्या आहेत. सभामंडपात दोन्ही बाजूस बसण्यासाठी कक्षासने आहेत. त्यावर अर्धवट कोरीव नक्षीकाम केलेले १४ सुरेख खांब आहेत. अगदी समोरील बाजूस तळघरयुक्त गर्भगृह आहे. या गर्भगृहात उतरण्यासाठी एका बाजूस छोटीशी ओवरी आहे. परंतु आता पृष्ठभागावरील दगडी तुळईच्या झरोक्यातून शिवलिंगाचे दर्शन घ्यावे लागते. या मंदिराच्या संपूर्ण बाह्य भिंतीवर तुरळक प्रमाणात सुरसुंदरीचे शिल्पे, विविध व्याल शिल्पे, नागशिल्पे, विविध फुलांचे शिल्पे रेखाटलेली आहेत. काही प्रमाणात कामशिल्पेही शिल्पकारांनी साकारलेली आहेत. श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन मंदिरास अनेकांकडून देणग्यांचा वर्षाव झालेला आहे. त्यात देवगिरीचे यादव, कदंब राजे आणि त्यांचे अधिकारी, मोठे व्यापारी, श्रीमंत सावकार, अशा अनेक विविध वजनदार मंडळीकडून गावे, शेततळे वगैरे इनामे मिळाली आहेत. त्या सर्व घटनांची नोंद अनेक ठिकाणी सापडलेल्या शिलालेखातून करण्यात आलेली आहे. इ.स १८१८च्या मे महिन्यात इंग्रज व मराठ्यांमध्ये निर्णायक लढाई होऊन सोलापूरातील किल्ला इंग्रजांच्या ताब्यात आला. तरी देखील मंदिरात भक्त मंडळी दर्शन व पूजेसाठी किल्ल्यात सतत येत होते. परंतू पुढे इंग्रज किल्ल्याच्या सुरक्षिततेच्या कारणावरून भाविकांची अडवणूक करत असत. म्हणून किल्ल्यातील मंदिराचे पडलेले काही खांब व मुख्य शिवलिंग यांचे स्थालांतर गावकऱ्यांनी करून उत्तर कसब्यामधील बाळीवेस येथे इ.स.१८१९ साली नवीन मंदिर बांधले. पुढे काही काळाने किल्ल्यातील बुरूज ढासळून हे मंदिर मातीच्या ढिगाऱ्याखाली झाकले गेले. काही दिवसांनी मातीच्या ढिगातून एका छोट्याशा झरोक्यातून आतील बाजूने मंदिराचे खांब दिसले व बातमी तत्कालीन ब्रिटीश कलेक्टर सिम कॉंक्स यांना कळल्यानंतर त्यांनी १९१९ साली गव्हर्नर जॉंर्ज लॉंईड यांच्या परवानगीने मंदिराच्या साफसफाई केली. याच साफसफाई मोहिमेत सदरचे १२व्या शतकातील किल्ला बांधण्या पूर्वीचे चालुक्यकालीन मंदिर, एक नंदीची मूर्ती, एक पद्मावती देवीची मूर्ती, दोन मोठे शैव व्दारपाल, दोन हळ्ळे कन्नड लिपीतील महत्वपूर्ण शिलालेख सापडले. पण शिवलिंग मात्र आढळले नाही. मिळालेले दोन शिलालेख व दोन मोठे शैव द्वारपाल संरक्षित करण्याच्या हेतूने मुंबईच्या रॉंयल एशियाटिक सोसायटीच्या स्वाधीन करण्यात आले. नंतर शैवद्वारपाल व शिलालेख मुंबई येथील प्रिन्स ऑंफ वेल्स म्हणजे सध्याचे श्री छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयच्या निर्मितीनंतर त्यांच्याकडे सोपविण्यात आले आहेत. तर पद्मावती देवीची मूर्ती चंदीगडच्या वस्तुसंग्रहालयात सुरक्षित आहे. आजही श्री सिद्धरामेश्वर निर्मित कपिलसिद्ध मल्लिकार्जुन मंदिर भुईकोट किल्यात दृष्टीपथास पडते

---





**सूर्यापासून मानवाला उष्णता व प्रकाश या रूपाने मिळणाऱ्या ऊर्जेला सौर ऊर्जा म्हणतात. सौर ऊर्जेमुळे पृथ्वीवरील हवामानात बदल घडतात. सूर्यापासून पृथ्वीला १७४ पेटावॅट ऊर्जा मिळते. यातली सुमारे ३०% ऊर्जा परावर्तित होते तर उरलेली ऊर्जा वातावरणात शोषली जात असल्यामुळे वातावरण व जमीन तापते. वातावरण तापल्यामुळे समुद्र तापतो व पाण्याचे बाष्पीभवन होऊन वातावरणाचे चक्र सुरू राहते. सूर्यप्रकाश हा पृथ्वीवर प्रकाश मिळवण्यासाठीचा मुख्य स्रोत आहे.**

# सौर उर्जा

## नैसर्गिक उर्जास्त्रोताचे मानवाला वरदान



डॉ. मुरहरी केळे

मो. ७२०८०६६०००

भारत देश उष्णकटिबंधीय प्रदेशात येत असल्यामुळे इथे वर्षभर सूर्य तळपतो. त्यामुळे सौर ऊर्जा बऱ्याच मोठ्या प्रमाणात उपलब्ध असते. सौर ऊर्जेचा उपयोग माणसे रोजच्या व्यवहारांमध्ये नेमाने करत नसल्याने तिला अपारंपरिक ऊर्जा म्हणतात. सौर ऊर्जा ही अक्षय ऊर्जाचा एक मोलाचा स्रोत असून ती मिळवण्यासाठी फोटोव्होल्टेइक सिस्टिम, केंद्रीकृत सौर ऊर्जा आणि सौर वॉटर हीटरचा वापर होतो. सौर ऊर्जेचा प्रकल्प भांडवली गुंतवणुकीचा विचार करता थोडासा महाग असला तरी हरित आणि स्वच्छ उर्जा मिळत असल्यामुळे आणि जास्त दिवस टिकते आणि तिचा दुरुस्ती खर्चही खूप कमी असतो. सोलर मिशन अंतर्गत २०२२ पर्यंत २०,००० मेगावॅट वीज उत्पन्न व्हावी असा उद्देश असून त्यासाठी सूर्यप्रकाशाचा अवधी, सौर विकरण आणि दिशा यांच्या नोंदीचे विश्लेषण करून सौर प्रकल्पासाठी जागा ठरवली जाते.

महाराष्ट्रात सौर ऊर्जेचा वापर वाढवण्यासाठी भरपूर वाव आहे. सोलापूर, उस्मानाबाद आणि सातारा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर सौर ऊजचा वापर करणारे वीज निर्मिती प्रकल्प उभारले गेले आहेत. नागपूर, चंद्रपूर, लातूर, अहमदनगर, जळगाव, धुळे, पुणे या जिल्ह्यातही काही ठिकाणी असे प्रकल्प असून त्याचे उद्दिष्ट ७,५०० मेगावॅट इतके आहे .

सौर उर्जेच्या क्षेत्रात केंद्र सरकारच्या व राज्य सरकारच्या अनेक योजना असून त्याचा लाभ म्हणावा तेव्हढा शेतकरी आणि सामान्य नागरिकांना होतांना दिसत नाही, याची अनेक कारणे आहेत. महाराष्ट्रात सौर उर्जेसाठी आवश्यक असे साधारणत: ३०० दिवसापेक्षा जास्त दिवस चांगले ऊन असते आणि त्याची तीव्रता २२००-२४०० kWh/m2 एव्हढी असल्यामुळे सौर उर्जेला या जिल्ह्यातील वातावरण अत्यंत पोषक आहे. केंद्र सरकारच्या पंतप्रधान कुसुम-अ, कुसुम-ब आणि कुसुम-क या तीनही योजना सौर उर्जेवर वीज निर्माण करण्यासाठी आहेत. त्यामध्ये शेतकरी किंवा शेतकऱ्यांची संस्था हे आपल्या जागेत वीज तयार करून स्वत:साठी वापर करून उर्वरित वीज शासनाला विकू शकतात. महाराष्ट्र सरकारने नुकतीच मुख्यमंत्री सौर कृषी योजनेद्वारे शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा मिळावा म्हणून जवळपास ८००० मेगावाट क्षमतेचे वीज प्रकल्प हाती घेतले आहेत. त्यासाठी सरकारी जमिनी संपादित केल्या असून त्याची निविदा प्रक्रिया ही पूर्ण झाल्या आहेत. ही योजना यशस्वी झाली तर त्याचा राज्यातील शेतकऱ्यांना चांगला उपयोग होऊ शकतो. या व्यतीरिक्त प्रधानमंत्री सूर्य घर योजनेंतर्गत घराच्या छतावर सौर उर्जेचे प्यानल बसवून वीज बिल शून्य म्हणून व्हावे म्हणून देशभर अनुदान देऊन ती योजना चालू आहे. त्यामध्ये ७८००० रुपयापर्यंत अनुदानही मिळू शकते. शेतकऱ्यांना भारनियमनाचा किंवा खंडित वीज पुरवठा याचा त्रास होऊ नये म्हणू सौर ऊर्जेवरील लाखो शेती पंपासाठीचे लक्ष निर्धारित केले असून त्याचेही काम मोठ्या प्रमाणात चालू आहे. या योजनेमध्ये मागेल त्याला सौर उर्जा पंप देण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र शासनाचे उद्दिष्ट आहे. या व्यतिरिक्त खाजगी विकासकाकडून जागा विकत घेऊन अनेक प्रकल्प विकसित करण्यात आले आहेत व करण्यात येत आहेत. त्याचा उपयोग स्वत:च्या उपयोगासाठी किंवा बाजारात विकण्यासाठी केला जातो.

हरित ऊर्जेसारखे प्रकल्प कोणत्याही भागात स्थापित झाल्यामुळे जागतिक तापमानात प्रदूषणामुळे जी वाढ होत आहे ती कमी करण्यास मदत होते. पर्यावरणास अनुकूल नसलेले हरितगृह वायू उत्सर्जन तीव्रपणे कमी करते, हवामान बदलाशी लढा देते. नूतनीकरणीय संसाधने नैसर्गिक असल्यामुळे दीर्घकालीन आणि शाश्वत ऊर्जा पुरवठा सुनिश्चित करतात. एकदा पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्या की, अनेक हरित ऊर्जा स्रोतांसाठी ऑपरेटिंग खर्च कमी असतो. हरित ऊर्जेमुळे मर्यादित जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करते, ऊर्जा सुरक्षिततेला प्रोत्साहन देते. ज्या भागात असा प्रकल्प उभारला जातो त्या भागात रोजगार निर्मिती होते, पडीक जमिनी कामात येतात, विजेचा दाब सुधारतो, इत्यादी फायदे हरित ऊर्जेमुळे होतात. यामुळे असे प्रकल्प आपल्या जिल्ह्यात आले पाहिजेत आणि यासाठी लोकप्रतिनिधी आणि स्थानिक प्रशासन यांनी सहकार्य केले पाहिजे. त्याचबरोबर वीज निर्माण करणाऱ्या कंपन्यांनी ज्या शेतकऱ्यांची जमीन घेतली आहे त्यांच्या मुलांना प्राध्यान्याने रोजगार उपलब्ध करून द्यावा, त्याच्या जमिनीचा योग्य तो मोबदला द्यावा, अशी अपेक्षा असते.

ज्याप्रमाणे मानवाला अन्न, वस्त्र आणि निवारा या मुलभूत गरजा आवश्यक आहेत, त्याचप्रमाणे मानवाच्या विकासाला वीज, पाणी आणि रस्ते हे ही तेव्हढेच महत्वाचे आहेत. काही जिल्ह्यात औद्योगिक क्षेत्र म्हणावे तेवढे विकसित झाले नाही किंवा या जिल्ह्यातील शेती आणि त्यावरील पूरक धंदे, दुध पुरवठा असे व्यवसाय सुद्धा म्हणावे तेवढे विकसित झाले नसल्यामुळे सुशिक्षित तरुण वर्ग शहराकडे आकर्षित होत आहे. त्याच्या हाताला रोजगार मिळावा यासाठी स्थानिकांनी प्राधान्य देण्यात यावे अशी अपेक्षा ठेवणे काहीही गैर नाही. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा पारंपारिक आणि अपारंपरिक उर्जा स्त्रोताद्वारे स्वयंपूर्ण होऊ शकतो. परंतु जिल्ह्याची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी प्रामुख्याने औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक करणारे मोठे प्रकल्प आले पाहिजेत आणि त्यामुळे स्थानिक तरुणांना पूरक उद्योगधंदे मिळाल्यानंतर येथील विकासाच्या चक्राचा वेग तर कोणीही रोखू शकणार नाही. एव्हढेच नव्हे तर मागास जिल्हा म्हणून हिणवणारे लोक वीज, पाणी आणि रस्ते यातील प्रगतीमुळे हरित जिल्हा म्हणून गौरवाने उल्लेख केल्याशिवाय राहणार नाही, यात कसलीही शंका असण्याचे कारण नाही.

